जाण ॥४३॥ आणि ऋतु बरवा शारदु। शारदीं पुढती चांदु। चंद्रीं जैसा संबंधु। पूर्णिमेचा ॥४४॥ कां वसंतीं बरवा आरामु। आरामींही प्रियसंगमु। संगमीं आगमु। उपचारांचा ॥४५॥ नाना कमळीं पांडवा। विकासु जैसा बरवा। विकासींही यावा। परागाचा तो ॥४६॥ वाचे बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व। रसिकत्वीं परतत्त्व। स्पर्शु जैसा ॥४७॥ तैसी सर्ववृत्तिवैभवीं। बुद्धिचि एकली बरवी। बुद्धीही बरव नवी। इंद्रियप्रौढी ॥४८॥ इंद्रियप्रौढीमंडळा। शृंगारु एकचि निर्मळा। जैं अधिष्ठात्रियां कां मेळा। देवतांचा जो ॥४९॥ म्हणूनि चक्षुरादिकीं दाहें। इंद्रियां पाठीं स्वानुग्रहें। सूर्यादिकां कां आहे। सुरांचें वृंद ॥३५०॥ तें देववृंद बरवें। कर्मकारण पांचवें। अर्जुना एथ जाणावें। देवो म्हणे ॥५१॥ एवं माने तुझिये आयणी। तैसी कर्मजातांचि हे खाणी। पंचविध आकर्णीं। निरूपिली ॥५२॥ आतां हेचि खाणी वाढे। मग कर्मांची सृष्टि घडे। जिहीं ते हेतुही उघडे। दाऊं पांचै ॥५३॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः।
न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः ॥ १५ ॥

तरी अवसांत आली माधवी। ते हेतु होय नवपल्लवीं। पल्लव पुष्पपुंज दावी। पुष्प फळातें ॥५४॥ कां वार्षिये आणिजे मेघु। मेघें वृष्टिप्रसंगु। वृष्टीस्तव भोगु। सस्यसुखाचा ॥५५॥ नातरी प्राची अरुणातें विये। अरुणें सूर्योदयो होये। सूर्यें सगळा पाहे। दिवो जैसा ॥५६॥ तैसें मन हेतु पांडवा। होय कर्मसंकल्पभावा। तो संकल्पु लावी दिवा। वाचेचा गा ॥५७॥ मग वाचेचा तो दिवटा।

दावी कृत्यजातांचिया वाटा। तेव्हां कर्ता रिगे कामठां। कर्तृत्वाच्या ॥५८॥ तेथ शरीरादिक दळवाडें। शरीरादिकां हेतुचि घडे। लोहकाम लोखंडें। निर्वाळीजे जैसें॥५९॥ कां तांथुवाचा ताणा। ताथु घालितां वैरणा। तो तंतूचि विचक्षणा। होय पटु॥३६०॥ तैसें मनवाचादेहांचें। कर्म मनादि हेतुचि रचे। रत्नीं घडे रत्नाचें। दळवाडें जेवीं॥६१॥ एथ शरीरादिकें कारणें। तेचि हेतु केवीं हें कोणें। अपेक्षिजे तरी तेणें। अवधारिजो॥६२॥ आइका सूर्याचिया प्रकाशा। हेतु कारण सूर्युचि जैसा। कां ऊंसाचें कांडें ऊंसा। वाढी हेतु॥६३॥ नाना वाग्देवता वानावी। तैं वाचाचि लागे कामवावी। कां वेदां वेदेंचि बोलावी। प्रतिष्ठा जेवीं॥६४॥ तैसें कर्मा शरीरादिकें। कारण हें कीर ठाउकें। परी हेंचि हेतु न चुके। हेंही एथ॥६५॥ आणि देहादिकीं कारणीं। देहादी हेतुमिळणीं। होय जया उभारणी। कर्मजातां॥६६॥ तें शास्त्रार्थें मानिलेया। मार्गा अनुसरे धनंजया। तरी न्याय तो न्याया। हेतु होय॥६७॥ जैसा पर्जन्योदकाचा लोटु। विपायें धरी साळीचा पाटु। तो जिरे परी अचाटु। उपयोगु आथी॥६८॥ कां रोषें निघालें अवचटें। पडिलें द्वारकेचिया वाटे। तें शिणे परी सुनाटें। न वचती पदें॥६९॥ तैसें हेतुकारणमेळें। उठी कर्म जें आंधळें। तें शास्त्राचे लाहे डोळे। तैं न्याय्य म्हणिपे॥३७०॥ ना दूध वाढितां ठावो पावे। तंव उतोनि जाय स्वभावें। तोही वेंचु परी नव्हे। वेंचिलें तें॥७१॥ तैसें शास्त्रसाह्येंवीण। केलें नोहे जरी अकारण। तरी लागो कां नागवण। दानलेखीं॥७२॥ अगा बावन्ना वर्णापरता।

कोण मंत्रु आहे पांडुसुता। कां बावन्नही नुच्चारितां। जीवु आथी ॥७३॥ परी मंत्राची कडसणी। जंव नेणिजे कोदंडपाणी। तंव उच्चारफळ वाणी। न पवे जेवीं ॥७४॥ तेवीं कारणहेतुयोगें। जें बिसाट कर्म निगे। तें शास्त्राचिये न लगे। कांसे जंव ॥७५॥ कर्म होतचि असे तेव्हाही। परी तें होणे नव्हे पाहीं। तो अन्यायो गा अन्यायीं। हेतु होय ॥७६॥

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥१६॥

एवं पंचकारणां कर्मा। पांचही हेतु हे सुमहिमा। आतां एथें पाहें पां आत्मा। सांपडला असे ॥७७॥ भानु न होनि रूपें जैसीं। चक्षुरूपातें प्रकाशी। आत्मा न होनि कर्में तैसीं। प्रकटित असे गा ॥७८॥ पाहीं प्रतिबिंब आरिसा। दोन्ही न होनि वीरेशा। दोहींतें प्रकाशी जैसा। न्याहाळिता तो ॥७९॥ कां अहोरात्र सविता। न होनि करी पांडुसुता। तैसा आत्मा कर्मकर्ता। न होनी दावी ॥३८०॥ परी देहाहंमानभुली। जयाची बुद्धि देहींच आतली। जया आत्मविषयीं जाली। मध्यरात्री गा ॥८१॥ जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा। देहचि केलें परमसीमा। तया आत्मा कर्ता हे प्रमा। अलोट उपजे ॥८२॥ आत्माचि कर्मकर्ता। हाही निश्चयो नाहीं तत्त्वतां। देहोचि मी कर्मकर्ता। मानी तो साच ॥८३॥ जे आत्मा मी कर्मातीतु सर्वकर्मसाक्षिभूतु। हे आपली कहीं मातु। नायकेचि कानीं ॥८४॥ म्हणोनि उमपा आत्मयातें। देहचिवरी मविजे एथें। विचित्र काई रात्रि दिवसातें। डुडुळ न करी ॥८५॥ पैं जेणें आकाशींचा कहीं।

साचु सूर्य देखिला नाहीं। तो थिल्लरींचें बिंब काई। मानूं न लाहे ॥८६॥ थिल्लराचेनि जालेपणें। सूर्यासि आणि होणें। त्याच्या नाशीं नाशणें। कंपें कंपु ॥८७॥ अगा निद्रिता चेवो नये। तंव स्वप्न साच हों लाहे। रज्जु नेणतां सापा बिहे। विस्मो कवण ॥८८॥ जंव कवळ आथि डोळां। तंव चंद्रु देखावा कीं पिंवळा। काय मृगींही मृगजळा। भाळावें नाहीं ॥८९॥ तैसा शास्त्रगुरूचेनि नांवें। जो वाराही टेंकों नेदी सिंवे। केवळ मौढ्याचेनिचि जीवें। जियाला जो ॥३९०॥ तेणें देहात्मदृष्टीमुळें। आत्मया घापे देहाचें जाळें। जैसा अभ्राचा वेगु कोल्हें। चंद्रीं मानी ॥९१॥ मग तया मानणयासाठीं। देहबंदिशाळे किरीटी। कर्माच्या वज्रगांठी। कळासे तो ॥९२॥ पाहें पां बंधभावना दृढा। नळियेवरी तो बापुडा। काय मोकळेयाही चवडा। न ठकेचि पुंसा ॥९३॥ म्हणोनि निर्मळे आत्मस्वरूपीं। जो प्रकृतीचें केलें आरोपी। तो कल्पकोडीच्या मापीं। मवीचि कर्मे ॥९४॥ आतां कर्मामाजीं असे। परी तयातें कर्म न स्पर्शे। वडवानळातें जैसें। समुद्रोदक ॥९५॥ तैसेनि वेगळेपणें। जयाचें कर्मीं असणें। तो कीर ओळखावा कवणें। तरी सांगों ॥९६॥ जे मुक्तातें निर्धारितां। लाभे आपलीच मुक्तता। जैसी दीपें दिसे पाहतां। आपली वस्तु ॥९७॥ नाना आरिसा जंव उटिजे। तंव आपणपयां आपण भेटिजे। कां पाणी पावतां पाणी होइजे। लवणें जेवीं ॥९८॥ हें असो परतोनि मागुतें। प्रतिबिंब पाहे बिंबातें। तंव पाहणें जाउनी आयितें। बिंबचि होय ॥९९॥ तैसें हारपलें आपणपें पावे। तैं संतातें पाहातां गिंवसावें। म्हणोनि

वानावे ऐकावे। तेचि सदा ॥४००॥ परी कर्मी असोनि कर्मे। जो नावरे समें विषमें। चर्मचक्षूंचेनि चामें। दृष्टि जैसी ॥१॥ तैसा सोडवला जो आहे। तयाचें रूप आतां पाहें। उपपत्तीची बाहे। उभऊनि सांगो ॥२॥

यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते।
हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते॥ १७॥

तरी अविद्येचिया निदा। विश्वस्वप्नाचा हा धांदा। भोगीत होता प्रबुद्धा। अनादि जो ॥३॥ तो महावाक्याचेनि नांवें। गुरुकृपेचेनि थांवें। माथां हातु ठेविला नव्हे। थापटिला जैसा ॥४॥ तैसा विश्वस्वप्नेंसी माया। नीद सांडूनि धनंजया। सहसा चेइला अद्वया-। नंदपणें जो ॥५॥ तेव्हां मृगजळाचे पूर। दिसते एक निरंतर। हारपती कां चंद्रकर। फांकता जैसें ॥६॥ कां बाळत्व निघोनि जाय। तैं बागुल नाहीं त्राय। पैं जळालिया इंधन न होय। रंधन जेवीं ॥७॥ नाना चेवो आलिया पाठीं। तैं स्वप्न न दिसे दिठी। तैसी अहंममता किरीटी। नुरेचि तया ॥८॥ मग सूर्य आंधारालागी। रिघो का भलते सुरंगी। परी तो तयाच्या भागीं। नाहींचि जैसा ॥९॥ तैसा आत्मत्वें वेष्टिला होये। तो जया तया दृश्यातें पाहे। ते दृश्य द्रष्टेपणेंसीं होत जाये। तयाचेचि रूप ॥४१०॥ जैसा वन्हि जया लागे। तें वन्हिचि जालिया आंगें। दाह्यदाहकविभागें। सांडिजे तें ॥११॥ तैसा कर्माकारा दुजेया। तो कर्तेपणाचा आत्मया। आळु आला तो गेलिया। कांहीं बाहीं जें उरे ॥१२॥ तिये आत्मस्थितीचा जो रावो। मग तो देहीं इये जाणेल ठावो।

काय प्रलयांबूचा उन्नाहो। वोघु मानी ॥१३॥ तैसी ते पूर्ण अहंता। काई देहपणें पंडुसुता। आवरे काई सविता। बिंबें धरिला ॥१४॥ पै मथूनि लोणी घेपे। तें मागुती ताकीं घापे। तरी तें अलिप्तपणें सिंपे। तेणेंसीं काई ॥१५॥ नाना काष्ठौनी वीरेशा। वेगळाविलियां हुताशा। राहे काष्ठाचिया मांदुसा। कोंडलेपणें ॥१६॥ कां रात्रीचिया पोटाआंतु। निगाला जो हा भास्वतु। तो रात्री ऐसी मातु। ऐके कायी ॥१७॥ तैसें वेद्य वेदकपणेंसी। पडिलें कां जयाचे ग्रासीं। तया देह मी ऐसी। अहंता कैंची ॥१८॥ आणि आकाशें जेथें जेथुनी। जाइजे तेथ असे भरोनि। म्हणोनि ठेलें कोंदोनि। आपेंआप ॥१९॥ तैसें जें तेणें करावें। तो तेंचि आहे स्वभावें। मा कोणें कर्मीं वेष्टावें। कर्तेपणें ॥४२०॥ नुरेचि गगनावीण ठावो। नोहेचि समुद्रा प्रवाहो। नुठीचि ध्रुवा जावों। तैसें जाहालें ॥२१॥ ऐसेनि अहंकृतिभावो। जयाचां बोधीं जाहाला वावो। तऱ्ही देहा जंव निर्वाहो। तंव आथी कर्में ॥२२॥ अगा वारा जरी वाजोनि वोसरे। तरी तो डोल रुखीं उरे। कां सेंदें द्रुति राहे कापुरें। वेंचलेनी ॥२३॥ कां सरलेया गीताचा समारंभु। न वचे राहवलेपणाचा क्षोभु। भूमी लोळोनी गेलिया अंबु। वोल थारे ॥२४॥ अगा मावळलेनि अर्कें। संध्येचिये भूमिके। ज्योतिदीसी कौतुकें। दिसे जैसी ॥२५॥ पैं लक्ष भेदिलियाहीवरी। बाण धांवेचि तंववरी। जंव भरली आथी उरी। बळाची ते ॥२६॥ नाना चक्रीं भांडें जालें। तें कुंलालें परतें नेलें। परी भ्रमेचि तें मागिले। भोवंडिलेपणें ॥२७॥ तैसा देहाभिमानु गेलिया। देह जेणें स्वभावें धनंजया। जालें तें

अपैसया। चेष्टवीच तें॥२८॥ संकल्पेंवीण स्वप्न। न लाविता दांगीचें बन। न रचितां गंधर्वभुवन। उठी जैसें॥२९॥ आत्मयाचेनि उद्यमेंवीण। तैसें देहादिपंचकारण। होय आपणयां आपण। क्रियाजात॥४३०॥ पैं प्राचीनसंस्कारशेषें। पांचही कारणें सहेतुकें। कामवीजती गा अनेकें। कर्माकारें॥३१॥ तया कर्मामाजीं मग। संहरो आघवें जग। अथवा नवें चांग। अनुकरो॥३२॥ परी कुमुद कैसेनि सुके। तें कमळ कैसें फाकें। हीं दोन्हीं रवी न देखे। जयापरी॥३३॥ का वीजु वर्षोनि आभाळ। ठिकरिया आतो भूतळ। अथवा करू शाड्वळ। पर्जन्यवृष्टी॥३४॥ परी तया दोहींतें जैसें। नेणिजेचि कां आकाशें। तैसा देहींच जो असे। विदेहदृष्टी॥३५॥ तो देहादिकी चेष्टीं। घडतां मोडतां हे सृष्टी। न देखे स्वप्न किरीटी। चेइला जैसा॥३६॥ एऱ्हवीं चामाचे डोळेवरी। जे देखती देहचिवरी। ते कीर तो व्यापारी। ऐसेंचि मानिती॥३७॥ कां तृणाचा बाहुला। जो आगरामेरे ठेविला। तो साचचि राखता कोल्हा। मानिजे ना॥३८॥ पिसें नेसलें कां नागवें। हें लोकीं येऊनि जाणावें। ठाणोरियाचे मवावे। आणिकीं घाय॥३९॥ का महासतीचे भोग। देखे कीर सकळ जग। परी ते आगी ना आंग। ना लोकु देखे॥४४०॥ तैसा स्वस्वरूपें उठिला। जो दृश्येंसी द्रष्टा आटला। तो नेणे काय राहटला। इंद्रियग्रामु॥४१॥ अगा थोरी कल्लोळीं कल्लोळ साने। लोपतां तिरींचेनि जनें। एकीं एक गिळिलें हें मनें। मानिजे जऱ्हीं॥४२॥ तऱ्ही उदकाप्रति पाहीं। कोण ग्रसितसे काई। तैसें पूर्णा दुजें नाहीं। जें तो मारी॥४३॥

सुवर्णाचिया चंडिका। सुवर्णशूळेंचि देखा। सुवर्णाचिया महिखा। नाशु केला ॥४४॥ तो देवलवसिया कडा। व्यवहारु गमला फुडा। वांचूनि शूळ महिष चामुंडा। सुवर्णचि तें ॥४५॥ पैं चित्रींचे पाणी हुताशु। तो दृष्टीचाचि आभासु। पटीं आगीवोलांशु। दोन्ही नाहीं ॥४६॥ मुक्ताचें देह तैसें। हालत संस्कारवशें। तें देखोनि लोक पिसे। कर्ता म्हणती ॥४७॥ आणि तयां करणेयाआंतु। घडो तिहीं लोकां घातु। परी तेणें केला हे मातु। बोलोंचि नये ॥४८॥ तंव अंधारुचि देखावा तेजें। मा तो फेडी हें कें बोलिजे। तैसें ज्ञानिया नाहीं दुजें। मारील कायी ॥४९॥ म्हणोनि तयाची बुद्धी। नेणे पापपुण्याची गंधी। गंगा मीनलिया नदी। विटाळु जैसा ॥४५०॥ आगीसी आगी झगटल्या। काय पोळे धनंजया। कीं शस्त्र रुपे आपणया। आपणचि ॥५१॥ तैसें आपणपयापरतें। जो नेणे क्रियाजातातें। तेथ काय लिंपवी बुद्धीतें। तयाचिये ॥५२॥ म्हणोनि कार्य कर्ता क्रिया। हें स्वरूपचि जाहालें जया। नाहीं शरीरादिकीं तया। कर्मी बंधु ॥५३॥ जे कर्ता जीव विंदाणी। काढूनि पांचही खाणी। घडित आहे करणीं। आउतीं दाहे ॥५४॥ तेथ न्यावो आणि अन्यावो। हा द्विविधु साधूनि आवो। उभवितां न लवी खेंवो। कर्मभुवनें ॥५५॥ या थोराडा कीर कामा। विरजा नोहे आत्मा। परी म्हणसी हन उपक्रमा। हातु लावी ॥५६॥ तो साक्षी चिद्रूपु। कर्मप्रवृत्तीचा संकल्पु। उठी तो कां निरोपु। आपणचि दे ॥५७॥ तरी कर्मप्रवृत्तीहीलागीं। तया आयासु नाहीं आंगीं। जे प्रवृत्तीचेही उळिगीं। लोकुचि आथी ॥५८॥ म्हणोनि आत्मयाचें केवळ। जो

रुपचि जाहला निखिळ। तया नाहीं बंदिशाळ। कर्माची हे॥ ५९॥ परी अज्ञानाच्या पटीं। अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी। तेथ चितारणी हे त्रिपुटी। प्रसिद्ध जे कां॥ ४६०॥

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना।
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसङ्ग्रहः॥ १८॥

जें ज्ञान ज्ञाता ज्ञेय। हें जगाचें बीजत्रय। तें कर्माची निः-संदेह। प्रवृत्ति जाण॥ ६१॥ आतां ययाचि गा त्रया। व्यक्ती वेगळालिया। आइकें धनंजया। करूं रूप॥ ६२॥ तरी जीवसूर्यबिंबाचे। रश्मी श्रोत्रादिकें पांचें। धांवोनि विषयपद्माचे। फोडिती मढ॥ ६३॥ कीं जीवनृपाचे वारु उपलाणें। घेऊनि इंद्रियांचीं कें‍काणें। विषयदेशींचें नागवणें। आणीत जे॥६४॥ हें असो इहीं इंद्रियीं राहटे। जें सुखदुःखेंसीं जीवा भेटे। तें सुषुप्तिकाळीं वोहटे। जेथ ज्ञान॥६५॥ तया जीवा नांव ज्ञाता। आणि जें हें सांगितलें आतां। तेंचि एथ पंडुसुता। ज्ञान जाण॥ ६६॥ जें अविद्येचिये पोटीं। उपजतखेवों किरीटी। आपणयातें वांटी। तिहीं ठायीं॥ ६७॥ आपुलिये धांवे पुढां। घालूनि ज्ञेयाचा गुंडा। उभारी मागिलीकडां। ज्ञातृत्वातें॥ ६८॥ मग ज्ञातया ज्ञेया दोघां। तो नांदणुकेचा बगा। मार्जीं जालेनि पैं गा। वाहे जेणें॥ ६९॥ टाकूनि ज्ञेयाची शिंव। पुरे जयाची धांव। सकळ पदार्थां नांव। सूतसे जें॥ ४७०॥ तें गा सामान्यज्ञान। या बोला नाहीं आन। ज्ञेयाचेंही चिन्ह। आइक आतां॥ ७१॥ तरी शब्द स्पर्शु। रूप गंध रसु। हा पंचविध आभासु। ज्ञेयाचा जो॥ ७२॥ जैसें एकेंचि

चूतफळें। इंद्रियां वेगळवेगळें। रसें वर्णें परिमळें। भेटिजे स्पर्शें ॥७३॥ तैसें ज्ञेय तरी एकसरें। परी ज्ञान इंद्रियद्वारें। घे म्हणोनि प्रकारें। पांचें जालें ॥७४॥ आणि समुद्रीं वोघाचें जाणें। सरे लवणीपासीं धांवणें। कां फळीं सरे वाढणें। सस्याचें जेवीं ॥७५॥ तैसें इंद्रियांच्या वाहवटीं। धांवतया ज्ञाना जेथ ठी। होय तें गा किरीटी। विषय ज्ञेय ॥७६॥ एवं ज्ञातया ज्ञाना ज्ञेया। तिहीं रूप केलें धनंजया। हे त्रिविध सर्व क्रिया-। प्रवृत्ति जाण ॥७७॥ जे शब्दादि विषय। हें पंचविध जें ज्ञेय। तेंचि प्रिय कां अप्रिय। एके परीचें ॥७८॥ ज्ञान मोटकें ज्ञातया। दावी ना जंव धनंजया। तंव स्वीकारा की त्यजावया। प्रवर्तेचि तो ॥७९॥ परी मीनातें देखोनि बकु। जैसा निधानातें रंकु। कां स्त्री देखोनि कामुकु। प्रवृत्ति धरी ॥४८०॥ जैसें खालारा धांवे पाणी। भ्रमर पुष्पाचिये घाणीं। नाना सुटला सांजवणीं। वत्सुचि पां ॥८१॥ अगा स्वर्गींची उर्वशी। ऐकोनि जेवीं माणुसीं। वारत्या लावीजती आकाशीं। यागांचिया ॥८२॥ पैं पारिवा जैसा किरीटी। चढला नभाचिये पोटीं। पारवी देखोनि लोटी। आंगचि सगळें ॥८३॥ हें ना घनगर्जनासरिसा। मयूर वोवांडे आकाशा। ज्ञाता ज्ञेया देखोनि तैसा। धांवचि घे ॥८४॥ म्हणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता। हे त्रिविध गा पंडुसुता। होयचि कर्मा समस्तां। प्रवृत्ति येथ ॥८५॥ परी तेंचि ज्ञेय विपायें। जरी ज्ञातयातें प्रिय होये। तरी भोगावया न साहे। क्षणही विलंबु ॥८६॥ नातरी अवचटें। तेंचि विरुद्ध होऊनि भेटे। तरी युगांत वाटे। सांडावया ॥८७॥ व्याळा कां हारा। वरपडा

जालेया नरा। हरिखु आणि दरारा। सरसाचि उठी ॥८८॥ तैसें ज्ञेय प्रियाप्रियें। देखिलेनि ज्ञातया होये। मग त्यागस्वीकारीं वाहे। व्यापारातें ॥८९॥ तेथ रागी प्रतिमल्लाचा। गोसांवी सर्वदळाचा। रथु सांडूनि पायांचा। होय जैसा ॥४९०॥ तैसें ज्ञातेपणें जे असे। तें ये कर्ता ऐसिये दशे। जेवितें बैसलें जैसें। रंधन करूं ॥९१॥ कां भंवरेंचि केला मळा। वरकलुचि जाला अंकसळा। नाना देवो रिगाला देउळा-। चिया कामा ॥९२॥ तैसा ज्ञेयाचिया हांवा। ज्ञाता इंद्रियांचा मेळावा। राहाटवी तेथ पांडवा। कर्ता होय ॥९३॥ आणि आपण होउनी कर्ता। ज्ञाना आणी करणता। तेथें ज्ञेयचि स्वभावतां। कार्य होय ॥९४॥ ऐसा ज्ञानाचिये निजगती। पाल्टु पडे गा सुमती। डोळ्यांची शोभा रातीं। पाल्टे जैसी ॥९५॥ कां अदृष्ट जाल्या उदासु। पाल्टे श्रीमंताचा विलासु। पुनिवेपाठीं शीतांशु। पाल्टे जैसा ॥९६॥ तैसा चाळितां करणें। ज्ञाता वेष्टिजे कर्तेपणें। तेथिंचीं तियें लक्षणें। ऐक आतां ॥९७॥ तरी बुद्धि आणि मन। चित्त अहंकार हन। हें चतुर्विध चिन्ह। अंतः-करणाचें ॥९८॥ बाह्य त्वचा श्रवण। चक्षु रसना घ्राण। हें पंचविध जाण। इंद्रियें गा ॥९९॥ तेथ आंतुलें तंव करणें। कर्ता कर्तव्या घे उमाणें। मग तैं जरी जाणें। सुखा येतें ॥५००॥ तरी बाहेरिलें तियेंही। चक्षुरादिकें दाहाही। उठौनि लवलाहीं। व्यापारा सूये ॥१॥ मग तो इंद्रियकदंबु। करविजे तंव राबु। जंव कर्तव्याचा लाभु। हातासि ये ॥२॥ ना तें कर्तव्य जरी दुःखें। फळेल ऐसें देखे। तो लावी त्यागमुखें। तियें दाहाही ॥३॥ मग फिटे दुःखाचा

ठावो। तंव राहटवी रात्रिंदिवो। विकणवातें कां रावो। जयापरी ॥४॥ तैसेनि त्यागस्वीकारीं। वाहातां इंद्रियांची धुरी। ज्ञातयातें अवधारीं। कर्ता म्हणिपे ॥५॥ आणि कर्तयाच्या सर्व कर्मीं। आउतांचिया परी क्षमी। म्हणोनि इंद्रियांतें आम्ही। करणें म्हणों ॥६॥ आणि हेचि करणेंवरी। कर्ता क्रिया ज्या उभारी। तिया व्यापे तें अवधारीं। कर्म एथ ॥७॥ सोनाराचिया बुद्धी लेणें। व्यापे चंद्रकरीं चांदिणें। कां व्यापे वेल्हाळपणें। वेली जैसी ॥८॥ नाना प्रभा व्यापे प्रकाशु। गोडिया इक्षुरसु। हें असो अवकाशु। आकाशीं जैसा ॥९॥ तैसें कर्तयाचिया क्रिया। व्यापलें जें धनंजया। तें कर्म गा बोलावया। आन नाहीं ॥५१०॥ एवं कर्ता कर्म करण। या तिहींचेंही लक्षण। सांगितलें तुज विचक्षण। शिरोमणी ॥११॥ एथ ज्ञाता ज्ञान ज्ञेय। हें कर्माचें प्रवृत्तित्रय। तैसेंचि कर्ता करण कार्य। हा कर्मसंचयो ॥१२॥ वन्हीं ठेविला असे धूमु। आथी बीजीं जेवीं द्रुमु। कां मनीं जोडे कामु। सदा जैसा ॥१३॥ तैसा कर्ता क्रिया करणीं। कर्माचें आहे जिंतवणीं। सोनें जैसें खाणी। सुवर्णाचिये ॥१४॥ म्हणोनि हें कार्य मी कर्ता। ऐसें आथि जेथ पंडुसुता। तेथ आत्मा दूरी समस्तां। क्रियांपासीं ॥१५॥ यालागीं पुढतपुढती। आत्मा वेगळाचि सुमती। आतां असो हे किती। जाणतासि तूं ॥१६॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः।
प्रोच्यते गुणसङ्ख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥ १९ ॥

परी सांगितलें जें ज्ञान। कर्म कर्ता हन। तिन्ही तिहीं ठायीं भिन्न। गुणीं आहाती ॥१७॥ म्हणोनि ज्ञाना कर्मा कर्तया। पातेजों

नये धनंजया। जे दोनी बांधती सोडावया। एकचि प्रौढ ॥१८॥ तें सात्त्विक ठाउवें होये। तो गुणभेदु सांगो पाहें। जो सांख्यशास्त्रीं आहे। उवाइला ॥१९॥ जें विचारक्षीरसमुद्र। स्वबोधकुमुदिनीचंद्र। ज्ञानडोळसां नरेंद्र। शास्त्रांचा जें ॥५२०॥ कीं प्रकृतिपुरुष दोनीं। मिसळलीं दिवोरजनीं। तियें निवडितां त्रिभुवनीं। मार्तंडु जें ॥२१॥ जेथ अपारा मोहराशी। तत्त्वांच्या मापीं चोविसीं। उमाणा घेऊनि परेशीं। सुखाडिजे ॥२२॥ अर्जुना तें सांख्यशास्त्र। पढे जयाचें स्तोत्र। तें गुणभेदचरित्र। ऐसें आहे ॥२३॥ जे आपुलेनि आंगिकें। त्रिविधपणाचेनि अंकें। दृश्यजात तितुकें। अंकित केलें ॥२४॥ एवं सत्त्वरजतमा। तिहींची एवढी असे महिमा। जे त्रैविध्य आदी ब्रह्मा। अंतीं कृमी ॥२५॥ परी विश्वींची आघवी मांदी। जेणें भेदलेनि गुणभेदीं। पडिली ते तंव आदी। ज्ञान सांगों ॥२६॥ जे दिठी जरी चोख कीजे। तरी भलतेंही चोख सुजे। तैसें ज्ञानें शुद्धे लाहिजे। सर्वही शुद्ध ॥२७॥ म्हणोनि तें सात्त्विक ज्ञान। आतां सांगों दे अवधान। कैवल्यगुणनिधान। श्रीकृष्ण म्हणे ॥२८॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम्॥ २०॥

तरी अर्जुना गा तें फुडें। सात्त्विक ज्ञान चोखडें। जयाच्या उदयीं ज्ञेय बुडे। ज्ञातेनिसीं ॥२९॥ जैसा सूर्य न देखे आंधारें। सरिता नेणिजती सागरें। कां कवळिलिया न धरे। आत्मच्छाया ॥५३०॥ तयापरी जया ज्ञाना। शिवादि तृणावसाना। इया भूतव्यक्ति भिन्ना। नाडळती ॥३१॥ जैसें हातें चित्र पाहातां। होय पाणियें मीठ धुतां।

कां चेवोनि स्वप्ना येतां। जैसें होय॥३२॥ तैसें ज्ञानें जेणें। करितां ज्ञातव्यातें पाहाणें। जाणता ना जाणणें। जाणावें उरे॥३३॥ पैं सोनें आटूनि लेणीं। न काढिती आपुलिया आयणी। कां तरंग न घेपती पाणी। गाळूनि जैसें॥३४॥ तैसी जया ज्ञानाचिया हाता। न लगेचि दृश्यकथा। तें ज्ञान जाण सर्वथा। सात्त्विक गा॥३५॥ आरिसा पाहों जातां कोडें। जैसें पाहातेंचि कां रिगे पुढें। तैसें ज्ञेय लटेटोनि पडे। ज्ञाताचि जें॥३६॥ पुढतीं तेंचि सात्त्विक ज्ञान। जें मोक्षलक्ष्मीचें भुवन। हें असो ऐक चिन्ह। राजसाचें॥३७॥

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान्।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम्॥२१॥

तरी पार्था परियेस। तें ज्ञान गा राजस। जे भेदाची कांस। धरूनि चालें॥३८॥ विचित्रता भूतांचिया। आपण आंतोनि ठिकरिया। बहु चकै ज्ञातया। आणिली जेणें॥३९॥ जैसें साचा रूपाआड। घालूनि विसराचें कवाड। मग स्वप्नाचें काबाड। ओवी निद्रा॥५४०॥ तैसें स्वज्ञानाचिये पौळी-। बाहेरि मिथ्याचे महीं खळी। तिहीं अवस्थाचिया वाह्याळी। दावी जें जीवा॥४१॥ अलंकारपणें झांकलें। बाळा सोनें कां वायां गेलें। तैसें नामीं रूपीं दुरावलें। अद्वैत जया॥४२॥ अवतरली गाडग्या घडां। पृथ्वी अनोळख जाली मूढां। वन्हि जाला कानडा। दीपत्वासाठी॥४३॥ कां वस्त्रपणाचेनि आरोपें। मूर्खाप्रति तंतु हारपे। नाना मुग्धा पटु लोपे। दाऊनि चित्र॥४४॥ तैशी जया ज्ञाना। जाणोनि भूतव्यक्ती भिन्ना। ऐक्यबोधाची भावना। निमोनि गेली॥४५॥ मग इंधनीं भेदला

अनलु। फुलांवरी परिमळु। कां जळभेदें सकळु। चंद्रु जैसा ॥४६॥ तैसे पदार्थभेद बहुवस। जाणोनि ल्हान थोर वेष। आंतलें तें राजस। ज्ञान येथ ॥४७॥ आतां तामसाचेंही लिंग। सांगेन तें वोळख चांग। डावलावया मातंग-। सदन जैसें ॥४८॥

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम्।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम्॥ २२॥

तरी किरीटी जें ज्ञान। हिंडे विधीचेनि वस्त्रेंहीन। श्रुति पाठमोरी नग्न। म्हणौनि तया ॥४९॥ येरीही शास्त्र बटिकरी। जें निंदेचे विटाळवरी। बोळविलेंसे डोंगरीं। म्लेंच्छधर्माच्या ॥५५०॥ जें गा ज्ञान ऐसें। गुणग्रहें तामसें। घेतलें भोवे पिसें। होऊनियां ॥५१॥ जें सोयरिके बाधु नेणे। पदार्थी निषेधुं न म्हणे। निरोविलें जैसें सुणें। शून्यग्रामीं ॥५२॥ तया तोंडीं जें नाडळे। कां खातां जेणें पोळे। तेंचि एक वाळे। येर घेणेचि ॥५३॥ पाहीं सोनें चोरितां उंदीरु। न म्हणे थरुविथरु। नेणे मांसखाइरु। काळें गोरें ॥५४॥ नाना वनामाजीं बोहरी। कडसणी जेवीं न करी। कां जीत मेलें न विचारी। बैसतां माशी ॥५५॥ अगा वांता कां वाढिलेया। साजुक कां सडलिया। विवेकु कावळिया। नाहीं जैसा ॥५६॥ तैसें निषिद्ध सांडूनि द्यावें। कां विहित आदरें घ्यावें। हें विषयांचेनि नांवें। नेणेचि जें ॥५७॥ जेतुलें आड पडे दिठी। तेतुलें घेचि विषयासाठीं। मग तें स्त्री द्रव्य वाटी। शिश्नोदरां ॥५८॥ तीर्थातीर्थ हे भाष। उदकीं नाहीं सनोळख। तहान वोळे तेंचि सुख। वांचुनियां ॥५९॥ तयाचिपरी खाद्याखाद्य। न म्हणे निंद्यानिंद्य।

तोंडा आवडे तें मेध्य। ऐसाचि बोधु ॥५६०॥ आणि स्त्रीजात तितुकें। त्वचेंद्रियेंचि वोळखे। तियेविषयीं सोयरिके। एकचि बोधु ॥६१॥ पैं स्वार्थी जे उपकरे। तयाचि नाम सोयिरें। देहसंबंधु न सरे। जिये ज्ञानी ॥६२॥ मृत्यूचें आघवेंचि अन्न। आघवेंचि आगी इंधन। तैसें जगचि आपलें धन। तामसज्ञाना ॥६३॥ ऐसेनि विश्व सकळ। जेणें विषयोचि मानिलें केवळ। तया एक जाणें फळ। देहभरण ॥६४॥ आकाशपतिता नीरा। जैसा सिंधूचि येक थारा। तैसें कृत्यजात उदरा-। लागींचि बुझे ॥६५॥ वांचूनि स्वर्गु नरकु आथी। तया हेतु प्रवृत्ति निवृत्ती। इये आघवियेचि राती। जाणिवेची जें ॥६६॥ जें देहखंडा नाम आत्मा। ईश्वर पाषाणप्रतिमा। ययापरौती प्रमा। ढळों नेणे ॥६७॥ म्हणे पडिलेनि शरीरें। केलेंनिसीं आत्मा सरे। मा भोगावया उरे। कोण वेषें ॥६८॥ ना ईश्वरु पाहतां आहे। तो भोगवी हें जरी होये। तरी देवचि खाये। विकूनियां ॥६९॥ गांवींचें देवळेश्वर। नियामकचि होती साचार। तरी देशींचे डोंगर। उगे कां असती ॥५७०॥ ऐसा विपायें देवो मानिजे। तरी पाषाणमात्रचि जाणिजे। आणि आत्मा तंव म्हणिजे। देहातेंचि ॥७१॥ येरें पापपुण्यादिकें। तें आघवेंचि करोनि लटिकें। हित मानी अग्निमुखें। चरणें जें कां ॥७२॥ जे चामाचे डोळे दाविती। जें इंद्रियें गोडी लाविती। तेंचि साच हे प्रतीती। फुडी जया ॥७३॥ किंबहुना ऐसी प्रथा। वाढती देखसी पार्था। धूमाचि वेली वृथा। आकाशीं जैसी ॥७४॥ कोरडा ना वोला। उपेगा आथी गेला। तो वाढोनि मोडला। भेंडु जैसा ॥७५॥ नाना ऊंसांची कणसें। कां नपुंसकें

माणुसें। वन लागलें जैसें। साबरीचें॥७६॥ नातरी बाळकाचें मन। कां चोराघरींचें धन। अथवा गळास्तन। शेळियेचे॥७७॥ तैसें जें वायाणें। वोसाळ दिसे जाणणें। तयातें मी म्हणें। तामसज्ञान॥७८॥ तेंही ज्ञान इया भाषा। बोलिजे तो भावो ऐसा। जात्यंधाचा कां जैसा। डोळा वाडु॥७९॥ का बधिराचे नीट कान। अपेया नाम पान। तैसें आडनांव ज्ञान। तामसा तया॥५८०॥ हें असो किती बोलावें। तरी ऐसें जें देखावें। तें ज्ञान नोहे जाणावें। डोळस तम॥८१॥ एवं तिहीं गुणीं। भेदलें यथालक्षणीं। ज्ञान श्रोतेशिरोमणी। दाविलें तुज॥८२॥ आतां याचि त्रिप्रकारा। ज्ञानाचेनि धनुर्धरा। प्रकाशें होती गोचरा। कर्तयाच्या क्रिया॥८३॥ म्हणौनि कर्म पैं गा। अनुसरे तिहीं भागां। मोहरें जालिया वोघा। पाणी जैसें॥८४॥ तेंचि ज्ञानत्रयवशें। त्रिविध कर्म जें असे। तेथ सात्त्विक तंव ऐसें। परिस आधीं॥८५॥

नियतं सङ्गरहितमरागद्वेषत: कृतम्।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते॥ २३॥

तरी स्वाधिकाराचेनि मार्गें। आलें जें मानिलें आंगें। पतिव्रतेचेनि परिष्वंगें। प्रियातें जैसें॥८६॥ सांवळ्या आंगा चंदन। प्रमदालोचनीं अंजन। तैसें अधिकारासी मंडण। नित्यपणें जें॥८७॥ तें नित्य कर्म भलें। होय नैमित्तिकीं सावाइलें। सोनयासि जोडलें। सौरभ्य जैसें॥८८॥ आणि आंगा जीवाची संपत्ती। वेंचुनि बाळाची करी पाळती। परी जीवें उबगणें हे स्थिती। न पाहे माया॥८९॥ तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी। परी फळ न सूये दिठी। उखिती क्रिया पैठी।

ब्रह्मींचि करी ॥५९० ॥ आणि प्रिय आलिया स्वभावें। संबळ उरे वेचें ठाउवें नव्हे। तैलें सत्प्रसंगें करावें। पारुषे जरी ॥९१ ॥ तरी अकरणाचेनि खेदें। द्वेषातें जिवीं न बांधे। जालियाचेनि आनंदें। फुंजो नेणे ॥९२ ॥ ऐसेऐसिया हातवटिया। कर्म निफजे जें धनंजया। जाण सात्त्विक हें तया। गुणनाम गा ॥९३ ॥ ययावरी राजसाचें। लक्षण सांगिजेल साचें। न करी अवधानाचें। वाणेपण ॥९४ ॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहङ्कारेण वा पुनः।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥

तरी घरीं मातापितरां। धड बोलों नाहीं संसारां। येर विश्व भरी आदरा। मूर्खु जैसा ॥९५ ॥ कां तुळशीचिया झाडा। दुरूनि न घापे सिंतोडा। द्राक्षीचिया तरी बुडा। दूधचि लाविजे ॥९६ ॥ तैसी नित्यनैमित्तिकें। कर्मे जियें आवश्यकें। तयांचेविषीं न शके। बैसला उठूं ॥९७ ॥ येरां काम्याचेनि तरी नांवें। देह सर्वस्व आघवें। वेंचितांही न मनवे। बहु ऐसें ॥९८ ॥ अगा देवळी वाढी लाहिजे। तेथ मोल देतां न धाइजे। पेरितां पुरे न म्हणिजे। बीज जेवीं ॥९९ ॥ कां परिसु जालिया हातीं। लोहालागीं सर्वसंपत्ती। वेंचितां ये उन्नती। साधकु जैसा ॥६०० ॥ तैसीं फळें देखोनि पुढें। काम्यकर्मे दुवाडें। करी परी तें थोकडें। केलेंही मानी ॥१ ॥ तेणें फळकामुकें। यथाविधि नेटकें। काम्य कीजे तितुकें। क्रियाजात ॥२ ॥ आणि तयाही केलियाचे। तोंडीं लावी दौंडीचें। कर्मी या नामपाठाचे। वाणें सारी ॥३ ॥ तैसा भरे कर्माहंकारु। मग पिता अथवा गुरु। ते न मनी काळज्वरु। औषध जैसें ॥४ ॥ तैसेनि साहंकारें। फळाभिलाषियें

नरें। कीजे गा आदरें। जें जें कांहीं ॥५॥ परी तेंहि करणें बहुवसा। वळघोनि करी सायासा। जीवनोपावो कां जैसा। कोल्हाटियांचा ॥६॥ एका कणालागीं उंदीरु। आवघा उपसे डोंगरु। कां शेवाळोद्देशें दर्दुरु। समुद्रु डहुळी ॥७॥ पाहीं भिकेपरतें न लाहे। तऱ्ही गारुडी सापु वाहे। काय कीजे शीणुचि होये। गोडु येका ॥८॥ हें असो परमाणूचेनि लाभें। पाताळ लंघिती वोळंबे। तैसें स्वर्गसुखलोभें। विचंबणें जें ॥९॥ तें काम्य कर्म सक्लेश। जाणावें येथ राजस। आतां चिन्ह परिस। तामसाचें ॥६१०॥

अनुबन्धं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम्।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ २५ ॥

तरी तें गा तामस कर्म। जें निंदेचें काळें धाम। निषेधाचें जन्म। साच जेणें ॥११॥ जें निपजविल्यापाठीं। कांहींच न दिसे दिठी। रेघ काढिलिया पोटीं। तोयाचे जेवीं ॥१२॥ कां कांजी घुसळलिया। कां राखोंडी फुंकलिया। कांहीं न दिसे गाळिलिया। वाळु घाणां ॥१३॥ नाना उपणिलिया भूंस। कां विंधिलिया आकाश। नाना मांडिलिया पाश। वारयासी ॥१४॥ हें अवघेंचि जैसें। वांझें होऊनि नासे। जें केलिया पाठीं तैसें। वायांचि जाय ॥१५॥ एऱ्हवीं नरदेहाही येवढें। धन आटणीये पडे। जें कर्म निफजवितां मोडे। जगाचें सुख ॥१६॥ जैसा कमळवनीं फांसु। काढिलिया कांटसु। आपण झिजे नाशु। कमळां करी ॥१७॥ कां आपण आंगें जळे। आणि नागवी जगाचे डोळे। पतंगु जैसा सळें। दीपाचेनि ॥१८॥ तैसें सर्वस्व वायां जावो। वरी स्वदेहाही होय घावो। परी पुढीलां अपावो। निफजविजे

जेणें ॥१९॥ मासी आपणयातें गिळवी। परी पुढील वांती शिणवी। तें कश्मळ आठवी। आचरण जें ॥६२०॥ तेंही करावया दोषें। मज सामर्थ्य असे कीं नसे। हेंही पुढील तैसें। न पाहतां करी ॥२१॥ केवढा माझा उवावो। करितां कोण प्रस्तावो। केलियाही आवो। काय येथ ॥२२॥ इये जाणिवेची सोये। अविवेकाचेनि पायें। पुसोनियां होये। साटोप कर्मी ॥२३॥ आपुला वसौटा जाळुनी। बिसाटे जैसा वन्ही। कां स्वमर्यादा गिळोनि। सिंधु उठी ॥२४॥ मग नेणे बहु थोडें। न पाहे मागें पुढें। मार्गामार्ग येकवढे। करीत चाले ॥२५॥ तैसें कृत्याकृत्य सरकटित। आपपर नुरवित। कर्म होय तें निश्चित। तामस जाण ॥२६॥ ऐसी गुणत्रयभिन्ना। कर्माची गा अर्जुना। हे केली विवंचना। उपपत्तींसीं ॥२७॥ आतां ययाचि कर्मा भजतां। कर्माभिमानिया कर्ता। तो जीवुही त्रिविधता। पातला असे ॥२८॥ चतुराश्रमवशें। एकु पुरुषु चतुर्धा दिसे। कर्तया त्रैविध्य तैसें। कर्मभेदें ॥२९॥ परी तयां तिहींआंतु। सात्त्विक तंव प्रस्तुतु। सांगेन दत्तचित्तु। आकर्णी तूं ॥६३०॥

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥ २६ ॥

तरी फळोद्देशें सांडिलिया। वाढिती जेवीं सरळिया। शाखा कां चंदनाचिया। बावन्नया ॥३१॥ कां न फळतांही सार्थका। जैसिया नागलतिका। तैसिया करी नित्यादिकां। क्रिया जो कां ॥३२॥ परी फलशून्यता। नाहीं तया विफळता। पैं फळासीचि पांडुसुता। फळें कायिसी ॥३३॥ आणि आदरें करी बहुवसें। परी

कर्ता मी हें नुमसे। वर्षाकाळींचे जैसें। मेघवृंद॥३४॥ तेवींचि परमात्मलिंगा। समर्पावयाजोगा। कर्मकलापु पैं गा। निपजावया॥३५॥ तया काळातें नुलंघणें। देशशुद्धिही साधणें। कां शास्त्रांच्या वार्ती पाहणें। क्रियानिर्णयो॥३६॥ वृत्ती करणें येकवळा। चित्त जावों न देणें फळा। नियमांचिया सांखळा। वाहणें सदा॥३७॥ हा निरोधु साहावयालागीं। धैर्याचिया चांगचांगी। जिंतवणी जिती आंगीं। वाहे जो कां॥३८॥ आणि आत्मयाचिये आवडी। कर्मे करितां वरपडीं। देहसुखाचिये परवडी। येवों न लाहे॥३९॥ ऐसा निद्रा दुऱ्हावे। क्षुधा न बाणवे। सुरवाडु न पावे। आंगाचा ठावो॥६४०॥ तंव अधिकाधिक। उत्साहो धरी आगळीक। सोनें जैसें तुक। तुटलिया कसीं॥४१॥ जरी आवडी आथी साच। तरी जीवितही सलंच। आगीं घालितां रोमांच। देखिजती सतिये॥४२॥ मा आत्मयायेवढीया प्रिया। वालभेला जो धनंजया। देहही सिदतां तया। काय खेदु होईल॥४३॥ म्हणौनि विषयसुरवाडु तुटे। जंव जंव देहबुद्धि आटे। तंव तंव आनंदु दुणवटे। कर्मी जया॥४४॥ ऐसेनि जो कर्म करी। आणि कोणे एके अवसरीं। तें ठाके ऐसी परी। वाहे जरी॥४५॥ तरी कडाडीं लोटला गाडा। तो आपणपें न मनी अवघडा। तैसा ठाकलेनिही थोडा। नोहे जो कां॥४६॥ नातरी आदरिलें। अव्यंग सिद्धी गेलें। तरी तेंही जिंतिलें। मिरवूं नेणे॥४७॥ इया खुणा कर्म करितां। देखिजे जो पंडुसुता। तयातें म्हणिपे तत्त्वता। सात्त्विकु कर्ता॥४८॥ आतां राजसा कर्तेया। वोळखणें हें धनंजया। जे अभिलाषा जगाचिया। वसौटा तो॥४९॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥ २७ ॥

जैसा गांवींचिया कश्मळा। उकरडा होय येकवळा। कां स्मशानीं अमंगळां। आघवयांचि ॥६५०॥ तयापरी जो अशेषा। विश्वाचिया अभिलाषा। पायपाखाळणिया देखा। घरटा जाला ॥५१॥ म्हणोनि फळाचा लागु। देखे जिये असलागु। तिये कर्मीं चांगु। रोहो मांडी ॥५२॥ आणि आपण जालिये जोडी। उपखों नेदी कवडी। क्षणक्षणा कुरोंडी। जीवाची करी ॥५३॥ कृपणु चित्तीं ठेवा आपुला। तैसा दक्षु पराविया माला। बकु जैसा खुतला। मासेयासी ॥५४॥ आणि गोंवी गेलिया जवळी। झगटलिया अंग फाळी। फळे तरी आंतु पोळी। बोरांटी जैसी ॥५५॥ तैसें मने वाचा कायें। भलतया दुःख देतु जाये। स्वार्थु साधितां न पाहे। पराचें हित ॥५६॥ तेवींच आंगें कर्मीं। आचरणें नोहे क्षमी। न निघे मनोधर्मीं। अरोचकु ॥५७॥ कनकाचिया फळा। आंतु माज बाहेरी मौळा। तैसा सबाह्य दुबळा। शुचित्वें जो ॥५८॥ आणि कर्मजात केलिया। फळ लाहे जरी धनंजया। तरी हरिखें जगा यया। वांकुलिया वाये ॥५९॥ अथवा जें आदरिलें। हीनफळ होय केलें। तरी शोकें तेणें जिंतिलें। धिक्कारों लागे ॥६६०॥ कर्मीं राहाटी ऐसी। जयातें होती देखसी। तोचि जाण त्रिशुद्धीसी। राजस कर्ता ॥६१॥ आतां यया पाठी येरु। जो कुकर्माचा आगरु। तोही करूं गोचरु। तामस कर्ता ॥६२॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥ २८ ॥

तरी मियां लागल्या कैसें। पुढील जळत असे। हें नेणिजे हुताशें। जियापरी ॥६३॥ पैं शस्त्रें मियां तिखटें। नेणिजे कैसेनि निवटे। कां नेणिजे काळकूटें। आपलें केलें॥६४॥ तैसा पुढील्या आपुल्या। घातु करीत धनंजया। आदरी वोखटिया। क्रिया जो कां॥६५॥ तिया करितांही वेळीं। काय जालें हें न सांभाळी। चळला वायू वाहटुळी। चेष्टे तैसा॥६६॥ पैं करणिया आणि जया। मेळु नाहीं धनंजया। तो पाहुनी पिसेया। कैंची त्राय॥६७॥ आणि इंद्रियांचें वैरिलें। चरोनि राखें जो जियालें। बैलातळीं लागले। गोचिड जैसें॥६८॥ हांसया रुदना वेळु। नेणतां आदरी बाळु। राहाटे उच्छृंखळु। तयापरी॥६९॥ जो प्रकृती आंतलेपणें। कृत्याकृत्यस्वादु नेणे। फुगे केरें धालेपणें। उकरडा जैसा॥६७०॥ म्हणोनि मान्याचेनि नांवें। ईश्वराही परी न खालवे। स्तब्धपणें न मनवे। डोंगरासी॥७१॥ आणि मन जयाचें कलाली। राहटी फुडी चोरिली। दिठी कीर ते वोली। पण्यांगनेची॥७२॥ किंबहुना कपटाचें। देहचि वळिलें तयाचें। तें जिणें कीं जुवाराचें। टिटेघर॥७३॥ नोहे तयाचा प्रादुर्भावो। तो साभिलाष भिल्लांचा गांवो। म्हणोनि नये येवों जावों। तया वाटा॥७४॥ आणि आणिकांचें निकें केलें। विरु होय जया आलें। जैसें अपेय पया मिनलें। लवण करी॥७५॥ कां हींव ऐसा पदार्थु। घातला आगीआंतु। तेचि क्षणीं धडाडितु। अग्नि होय॥७६॥ नाना सुद्रव्यें गोमटीं। जालिया शरीरीं पैठीं। होऊनि ठाती किरीटी। मळुचि जेवीं॥७७॥ जैसें पुढिलाचें बरवें। जयाच्या भीतरीं पावे। आणि विरुद्धचि आघवें। होऊनि निगे॥७८॥ जो गुण घे दे दोष।

अमृताचें करी विष। दूध पाजिलिया देख। व्याळु जैसा ॥७९॥ आणि ऐहिकीं जियावें। जेणें परत्रा साच यावें। तें उचित कृत्य पावे। अवसरीं जिये ॥६८०॥ तेव्हां जया आपैसी। निद्रा ये ठेविली ऐसी। दुर्व्यवहारीं जैसी। विटाळें लोटे ॥८१॥ पैं द्राक्षरसा आम्ररसा। वेळे तोंड सडे वायसा। कां डोळे फुटती दिवसा। डुडुळाचे ॥८२॥ तैसा कल्याणकाळु पाहे। तैं तयातें आळसु खाये। ना प्रमादीं तरी होये। तो म्हणे तैसें ॥८३॥ जेवींचि सागराच्या पोटीं। जळे अखंड आगिठी। तैसा विषादु वाहे गांठीं। जिवाचिये जो ॥८४॥ लेंडोराआगीं धूमावधि। कां अपाना आंगीं दुर्गंधि। तैसा जो जीविताविधि। विषादें केला ॥८५॥ आणि कल्पांताचिया पारा। वेगळेंही जो वीरा। सूत्र धरी व्यापारा। साभिलाषा ॥८६॥ अगा जगाही परौती। शुचा वाहे पैं चित्तीं। करितां विषीं हातीं। तृणही न लगे ॥८७॥ ऐसा जो लोकाआंतु। पापपुंजु मूर्तु। देखसी तो अव्याहतु। तामसु कर्ता ॥८८॥ एवं कर्म कर्ता ज्ञान। या तिहींचे त्रिधा चिन्ह। दाविलें तुज सुजन-। चक्रवर्ती ॥८९॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु।
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनञ्जय ॥ २९ ॥

आतां अविद्येचां गांवीं। मोहाची वेढूनि मदवी। संदेहाचीं आघवीं। लेऊनि लेणीं ॥६९०॥ आत्मनिश्चयाची बरव। जया आरिसां पाहे सावयव। तिये बुद्धीचीही धांव। त्रिधा असे ॥९१॥ अगा सत्त्वादि गुणीं इहीं। काइ एक तिहीं ठायीं। न कीजेचि येथ पाहीं। जगामाजीं ॥९२॥ आगी न वसतां पोटीं। कवण काष्ठ असे

सृष्टी। तैसें तें कैचें दृश्यकोटीं। त्रिविधा जें नोहे ॥९३॥ म्हणौनि तिहीं गुणीं। बुद्धी केली त्रिगुणीं। धृतीसिही वांटणी। तैसीचि असे ॥९४॥ तेंचि येक वेगळालें। येथ चिन्हीं अळंकारलें। सांगिजेल उपाइलें। भेदलेपणें ॥९५॥ परी बुद्धि धृति इयां। दोहीं भागांमाजीं धनंजया। आधीं रूप बुद्धीचिया। भेदासि करूं ॥९६॥ तरी उत्तमा मध्यमा निकृष्टा। संसारासि गा सुभटा। प्राणियां येतियां वाटा। तिनी आथी ॥९७॥ जे अकरण काम्य निषिद्ध। ते हे मार्ग तिन्ही प्रसिद्ध। संसारभयें सबाध। जीवा ययां ॥९८॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये।
बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ॥ ३० ॥

म्हणौनि अधिकारें मानिलें। जें विधीचेनि बोधें आलें। तें येकचि येथ भलें। नित्य कर्म ॥९९॥ तेंचि आत्मप्राप्तिफळ। दिठी सूनि केवळ। कीजे जैसें कां जळ। सेविजे ताहने ॥७००॥ येतुलेनि ते कर्म। सांडी जन्मभय विषम। करूनि दे सुगम। मोक्षसिद्धि ॥१॥ ऐसें कर्म करी तो भला। संसारभयें सांडिला। करणीयत्वें आला। मुमुक्षुभागा ॥२॥ तेथ जे बुद्धि ऐसा। बळीया बांधे भरंवसा। मोक्षु ठेविला ऐसा। जोडेल येथ ॥३॥ म्हणौनि निवृत्तीचि मांडिली। सूनि प्रवृत्तितळीं। इये कर्मीं बुडकुळी। द्यावी कीं ना ॥४॥ तृषार्ता उदकें जिणें। कां पुरीं पडलिया पोहणें। अंधकूपीगती किरणें। सूर्याचेनि ॥५॥ नाना पथ्येंसीं औषध लाहे। तरी रोगें दाटलाही जिये। कां मीना जिव्हाळा होये। जळाचा जरी ॥६॥ तरी तयाच्या जीविता। नाहीं जेवीं अन्यथा। तैसें कर्मीं इये वर्ततां। जोडेचि मोक्षु ॥७॥ हें करणीयाचिया कडे।

जें ज्ञान आथी चोखडें। आणि अकरणीय हें फुडें। ऐसें जाण ॥८॥ जीं तियें काम्यादिकें। संसारभयदायकें। अकृत्यपणाचें आंबुखें। पडिलें जयां ॥९॥ तिये कर्मीं अकार्यीं। जन्ममरणसमर्यीं। प्रवृत्ति पळवी पार्यीं। मागिलीचि ॥७१०॥ पैं आगीमाजीं न रिघवे। अथार्वी न घलवे। धगधगीत नागवे। शूळ जेवीं ॥११॥ कां काळियानाग धुंधुवातु। देखोनि न घलवे हातु। न वचवे खोपेआंतु। वाघाचिये ॥१२॥ तैसें कर्म अकरणीय। देखोनि महाभय। उपजे निःसंदेह। बुद्धी जिये ॥१३॥ वाढिलें रांधूनि विखें। तेथें जाणिजे मृत्यु न चुके। तेवीं निषेधीं कां देखे। बंधातें जे ॥१४॥ मग बंधभयभरितीं। तियें निषिद्धीं प्राप्तीं। विनियोगु जाणे निवृत्ती। कर्मांचिये ॥१५॥ ऐसेनि कार्याकार्यविवेकी। जे प्रवृत्तिनिवृत्तिमापकीं। खरा कुडा पारखीं। जिया परी ॥१६॥ तैसी कृत्याकृत्यशुद्धी। बुझे जे निरवधी। सात्त्विक म्हणिपे बुद्धी। तेंचि तूं जाण ॥१७॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥

आणि बकांच्या गांवीं। घेपे क्षीरनीर सकळवी। कां अहोरात्रींची गोंवी। आंधळें नेणे ॥१८॥ जया फुलांचा मकरंदु फावे। तो काष्ठें कोरूं धांवे। परी भ्रमरपणा नव्हे। अव्हांटा जेवीं ॥१९॥ तैसीं इयें कार्याकार्यें। धर्माधर्मरूपें जियें। तियें न चोजवितां जाये। जाणती जे कां ॥७२०॥ अगा डोळांवीण मोतियें। घेतां पाडु मिळे विपायें। न मिळणें तें आहे। ठेविलें तेथें ॥२१॥ तैसें अकरणीय अवचटें। नोडवे तरीच लेटे। एऱ्हवीं जाणे एकवटें। दोन्ही जे

कां ॥२२॥ ते गा बुद्धि चोखविषीं। जाण येथ राजसी। अक्षत टाकिली जैसी। मांदियेवरी ॥२३॥

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥

आणि राजा जिया वाटा जाये। ते चोरांसि आडव होये। कां राक्षसां दिवो पाहे। राति होऊनि ॥२४॥ नाना निधानचि निदैवा। होये कोळसयाचा उडवा। पैं असतें आपणपें जीवा। नाहीं जालें ॥२५॥ तैसें धर्मजात तितुकें। जिये बुद्धीसी पातकें। साच तें लटिकें। ऐसेंचि सुझे ॥२६॥ ते आघवेचि अर्थ। करूनि घाली अनर्थ। गुण ते ते व्यवस्थित। दोषचि मानी ॥२७॥ किंबहुना श्रुतिजातें। अधिष्ठूनि केलें सरतें। तेतुलेंही उपरतें। जाणे जे बुद्धि ॥२८॥ ते कोणातेंही न पुसतां। तामसी जाणावी पांडुसुता। रात्री काय धर्मार्था। साच करावी ॥२९॥ एवं बुद्धीचे भेद। तिन्ही तुज विशद। सांगितले स्वबोध-। कुमुदचंद्रा ॥७३०॥ आतां याची बुद्धिवृत्ती। निष्टंकिला कर्मजातीं। खांदु मांडिजे धृती। त्रिविधा जया ॥३१॥ तिये धृतीचेही विभाग। तिन्ही यथालिंग। सांगिजती चांग। अवधान देई ॥३२॥

धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः।
योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥ ३३ ॥

तरी उदेलिया दिनकरु। चोरीसि थोके अंधारु। कां राजाज्ञा अव्यवहारु। कुंठवी जेवीं ॥३३॥ नाना पवनाचा साटु। वाजीनलिया नीटु। आंगेंसीं बोभाटु। सांडिती मेघ ॥३४॥ कां अगस्तीचेनि दर्शनें। सिंधु घेऊनी ठाती मौनें। चंद्रोदयीं कमळवनें। मिठी

देती ॥ ३५ ॥ हें असो पावो उचलिला। मदमुख न ठेविती खालां। गजौनि पुळां जाला। सिंहु जरी ॥ ३६ ॥ तैसा जो धीरु। उठलिया अंतरु। मनादिकें व्यापारु। सांडिती उभीं ॥३७॥ इद्रियांविषयांचिया गांठी। अपैसया सुटती किरीटी। मना मायेच्या पोटीं। रिगती दाहीं ॥३८॥ अधोर्ध्व गुढें काढी। प्राण नवांची पेंडी। बांधोनि घाली उडी। मध्यमेमार्जी ॥३९॥ संकल्पविकल्पांचें लुगडें। सांडूनि मन उघडें। बुद्धिही मागिलेकडे। उगीचि बैसे ॥७४०॥ ऐसी धैर्यराजें जेणें। मन प्राण करणें। स्वचेष्टांची संभाषणें। सांडविजती ॥४१॥ मग आधवींचि सडीं। ध्यानाच्या आंतुल्या मढीं। कोंडिजती निरवडी। योगाचिये ॥४२॥ परी परमात्मया चक्रवर्ती। उगाणिती जंव हातीं। तंव लांचु न घेतां धृती। धरिजती जिया ॥४३॥ ते गा धृती येथें। सात्त्विक हें निरुतें। आईक अर्जुनातें। श्रीकांतु म्हणे ॥४४॥

यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन।
प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥

आणि होऊनियां शरीरी। स्वर्गसंसाराच्या दोहीं घरीं। नांदे जो पोटभरी। त्रिवर्गोपायें ॥४५॥ तो मनोरथांच्या सागरीं। धर्मार्थकामांच्या तारुवावरी। जेणें धैर्यबळें करी। क्रियावाणिज्य ॥४६॥ जें कर्म भांडवल सूये। तयाची चौगुणी येती पाहे। येवढें सायास साहे। जया धृती ॥४७॥ ते गा धृती राजस। पार्था येथ परियेस। आतां आइक तामस। तिसरी जे कां ॥४८॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च।
न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ ३५ ॥

तरी सर्वाधमें गुणें। जयाचें कां रूपा येणें। कोळसा काळेपणें। घडला जैसा ॥४९॥ अहो प्राकृत आणि हीनु। तयाही कीं गुणत्वाचा मानु। परी न म्हणिजे पुण्यजनु। राक्षसु काई ॥७५०॥ पैं ग्रहांमाजीं इंगुळु। तयातें म्हणिजे मंगळु। तैसा तमीं धसाळु। गुणशब्दु हा ॥५१॥ जे सर्वदोषांचा वसौटा। तमचि कामऊनि सुभटा। उभारिला आंगवठा। जया नराचा ॥५२॥ तो आळसु सुनि असे कांखे। म्हणौनि निद्रे कहीं न मुके। पापें पोषितां दुःखें। न सांडिजे जेवीं ॥५३॥ आणि देहधनाचिया आवडी। सदा भय तयातें न सांडी। विसंबूं न सके धोंडीं। काठिण्य जैसें ॥५४॥ आणि पदार्थजातीं स्नेहो। बांधे म्हणोनि तो शोकें ठावो। केला न शके पाप जावों। कृतघ्नौनि जैसें ॥५५॥ आणि असंतोष जीवेंसीं। धरूनि ठेला अहर्निशीं। म्हणौनि मैत्री तेणेंसीं। विषादें केली ॥५६॥ लसणातें न सांडी गंधी। कां अपथ्यशीळातें व्याधी। तैसी केली मरणावधी। विषादें तया ॥५७॥ आणि वयसा वित्तकामु। ययांचा वाढवी संभ्रमु। म्हणौनि मदें आश्रमु। तोचि केला ॥५८॥ आगीतें न सांडी तापु। सळातें जातीचा सापु। कां जगाचा वैरी वासिपु। अखंडु जैसा ॥५९॥ नातरी शरीरातें काळु। न विसंबे कवणे वेळु। तैसा आथी अढळु। तामसीं मदु ॥७६०॥ एवं पांचही हे निद्रादिक। तामसाच्या ठाईं दोख। जिया धृती देख। धरिलें आहाती ॥६१॥ तिये गा धृती नांवें। तामसी येथ हें जाणावें। म्हणितलें तेणें देवें। जगाचेनि ॥६२॥ एवं त्रिविध जे बुद्धि। कीजे कर्मनिश्चयो आधि। तो धृती या सिद्धि। नेइजो येथ ॥६३॥ सूर्यें मार्गु गोचरु होये।

आणि तो चालती कीर पाये। परी चालणें तें आहे। धैर्यें जेवीं ॥६४॥ तैसी बुद्धि कर्मातें दावी। तें करणसामग्री निफजवी। परी निफजावया होआवी। धीरता जे॥६५॥ ते हे गा तुजप्रति। सांगितली त्रिविध धृति। यया कर्मत्रया निष्पत्ति। जालिया मग॥६६॥ येथ फळ जें एक निफजे। सुख जयातें म्हणिजे। तेंही त्रिविध जाणिजे। कर्मवशें॥६७॥ तरी फळरूप तें सुख। त्रिगुणीं भेदलें देख। विवंचूं आतां चोख। चोखीं बोलीं॥६८॥ परी चोखी ते कैसी सांगें। पैं घेवों जातां बोलबगें। कानींचियेही लागे। हातींचा मळु॥६९॥ म्हणौनि जयाचेनि अव्हेरें। अवधानही होय बाहिरें। तेणें आइक हो आंतरें। जिवाचेनि जीवें॥७७०॥ ऐसें म्हणौनि देवो। त्रिविधा सुखाचा प्रस्तावो। मांडला तो निर्वाहो। निरूपित असे॥७१॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति॥ ३६॥

म्हणे सुखत्रयसंज्ञा। सांगों म्हणौनि प्रतिज्ञा। बोलिलें तें प्राज्ञा। ऐक आतां॥७२॥ तरी सुख तें गा किरीटी। दाविजेल तुज दिठी। जें आत्मयाचिये भेटी। जीवासि होय॥७३॥ परी मात्रेचेनि मापें। दिव्यौषध जैसें घेपे। कां कथिलाचें कीजे रूपें। रसभावनीं॥७४॥ नाना लवणाचें जळु। होआवया दोनि चार वेळु। देऊनि सांडिजती ढाळु। तोयाचे जेवीं॥७५॥ तेवीं जालेंनि सुखलेशें। जीवु भाविलिया अभ्यासें। जीवपणाचें नासे। दुःख जेथें॥७६॥ तें येथ आत्मसुख। जालें असे त्रिगुणात्मक। तेही सांगों एकैक। रूप आतां॥७७॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्॥ ३७॥

आतां चंदनाचें बुड। सर्पी जैसें दुवाड। कां निधानाचें तोंड। विवसिया जेवीं॥७८॥ अगा स्वर्गींचें गोमटें। आडव यागसंकटें। कां बाळपण दासटें। त्रासकाळें॥७९॥ हें असो दीपाचिये सिद्धी। अवघड धू आधीं। नातरी तो औषधीं। जिभेचा ठावो॥७८०॥ तयापरी पांडवा। जया सुखाचा रिगावा। विषम तेथ मेळावा। यमदमांचा॥८१॥ देत सर्वस्नेहा मिठी। आंगीं ऐसें वैराग्य उठी। स्वर्गसंसारा कांटी। काढितची॥८२॥ विवेकश्रवणें खरपुसें। जेथ व्रताचरणें कर्कशें। करितां जाती भोकसे। बुद्ध्यादिकांचे॥८३॥ सुषुम्नेचेनि तोंडें। गिळिजे प्राणापानाचे लोंढे। बोहणियेसीचि येवढें। भारी जेथ॥८४॥ जें सारसांही विघडतां। होय वोहाहूनि वत्स काढितां। नव्हे भणंगु दवडितां। भाणयावरुनी॥८५॥ पैं मायेपुढौनि बाळक। काळें नेता एकुलतें एक। होय का उदक। तुटतां मीना॥८६॥ तैसें विषयांचें घर। इंद्रियां सांडितां थोर। युगांतु होय तें वीर। विराग साहाती॥८७॥ ऐसा जया सुखाचा आरंभु। दावी काठिण्याचा क्षोभु। मग क्षीराब्धीं लाभु। अमृताचा जैसा॥८८॥ पहिल्या वैराग्यगरळा। धैर्यशंभू वोडवी गळा। तरी ज्ञानामृतें सोहळा। पाहे जेथें॥८९॥ पैं कोल्हिताही कोपे ऐसें। द्राक्षांचें हिरवेपण असे। तें परिपाकीं कां जैसें। माधुर्य आते॥७९०॥ तें वैराग्यादिक तैसें। पिकल्या आत्मप्रकाशें। मग वैराग्येंसींही नाशे। अविद्याजात॥९१॥ तेव्हां सागरीं गंगा जैसी।

आत्मी मीनल्या बुद्धि तैसी। अद्वयानंदाची आपैसी। खाणी उघडे ॥९२॥ ऐसें स्वानुभवविश्रामें। वैराग्यमूळ जें परिणमे। तें सात्त्विक येणें नामें। बोलिजे सुख ॥९३॥

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ ३८ ॥

आणि विषयेंद्रियां। मेळु होतां धनंजया। जें सुख जाय थडिया। सांडूनि दोन्ही ॥९४॥ अधिकारिया रिगतां गांवो। होय जैसा उत्साहो। कां रिणावरी विवाहो। विस्तारिला ॥९५॥ नाना रोगिया जिभेपासीं। केळें गोड साखरेसीं। कां बचनागाची जैसी। मधुरता पहिली ॥९६॥ पहिलें संवचोराचें मैत्र। हाटभेटीचें कलत्र। कां लाघवियाचे विचित्र। विनोद ते ॥९७॥ तैसें विषयेंद्रियदोखीं। जें सुख जिवातें पोखी। मग उपडिला खडकीं। हंसु जैसा ॥९८॥ तैसी जोडी आघवी आटे। जीविताचा ठाय फिटे। सुकृताचियाही सुटे। धनाची गांठी ॥९९॥ आणिक भोगिलें जें कांहीं। तें स्वप्न तैसें होय नाहीं। मग हानिच्याचि घाई। लोळावें उरे ॥८००॥ ऐसें आपत्ती जें सुख। ऐहिकीं परिणमें देख। परत्रीं कीर विख। होऊनि परते ॥१॥ जे इंद्रियजाता लळा। दिधलिया धर्माचा मळा। जाळूनि भोगिजे सोहळा। विषयांचा जेथ ॥२॥ तेथ पातकें बांधिती थावो। तियें नरकीं देती ठावो। जेणें सुखें हा अपावो। परत्री ऐसा ॥३॥ पैं नामें विष महुरें। परी मारूनि अंतीं खरें। तैसें आदि जें गोडिरें। अंतीं कडू ॥४॥ पार्था तें सुख साचें। वळिलें आहे रजाचें। म्हणौनि न शिवें तयाचें। आंग कहीं ॥५॥

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥

आणि अपेयाचेनि पानें। अखाद्याचेनि भोजनें। स्वैरस्त्रीसंनिधानें। होय जें सुख ॥६॥ कां पुढीलांचेनि मारें। नातरी परस्वापहारें। जें सुख अवतरे। भाटांच्या बोलीं ॥७॥ जें आलस्यावरी पोखिजे। निद्रेमाजीं जें देखिजे। जयाच्या आद्यंतीं भुलिजे। आपुली वाट ॥८॥ तें गा सुख पार्था। तामस जाण सर्वथा। हें बहु न सांगोचि जे कथा। असंभाव्य हे ॥९॥ ऐसें कर्मभेदें मुदलें। फळसुखही त्रिधा जालें। तें हें यथागमें केलें। गोचर तुज ॥८१०॥ तें कर्ता कर्म कर्मफळ। ये त्रिपुटी येकी केवळ। वांचूनि कांहींचि नसे स्थूळ-। सूक्ष्मीं इये ॥११॥ आणि हे तंव त्रिपुटी। तिहीं गुणीं इहीं किरीटी। गुंफिली असे पटीं। तांतुवीं जैसी ॥१२॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः।
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥

म्हणौनि प्रकृतीच्या आलोकीं। न बंधिजे इहीं सत्त्वादिकीं। तैसी स्वर्गीं ना मृत्युलोकीं। आथी वस्तु ॥१३॥ कैंचा लोंवेवीण कांबळा। मातियेवीण मोदळा। कां जळेंवीण कल्लोळा। होणें आहे ॥१४॥ तैसें न होनि गुणाचें। सृष्टीच्या रचना रचे। ऐसें नाहींच गा साचें। प्राणिजात ॥१५॥ यालागीं हें सकळ। तिहीं गुणांचेंचि केवळ। घडलें आहे निखिळ। ऐसें जाण ॥१६॥ गुणीं देवां त्रयी लाविली। गुणीं लोकीं त्रिपुटी पाडिली। चतुर्वर्णा घातली। सिनानीं उळिगें ॥१७॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥

तेचि चारी वर्ण। पुससी जरी कोण कोण। तरी जयां मुख्य ब्राह्मण। धुरेचे कां ॥१८ ॥ येर क्षत्रिय वैश्य दोन्ही। तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानीं। जे ते वैदिकविधानीं। योग्य म्हणौनि ॥१९ ॥ चौथा शूद्रु जो धनंजया। वेदीं लागु कीर नाहीं तया। तऱ्ही वृत्ति वर्णत्रया-। अधीन तयाची ॥८२० ॥ तिये वृत्तीचिया जवळिका। वर्णा ब्राह्मणादिकां। शूद्रही कीं देखा। चौथा जाला ॥२१ ॥ जैसा फुलाचेनि सांगातें। तांतु तुरंबिजे श्रीमंतें। तैसें द्विजसंगें शूद्रातें। स्वीकारी श्रुती ॥२२ ॥ ऐसेसी गा पार्था। हे चतुर्वर्णव्यवस्था। करूं आतां कर्मपथा। यांचिया रूपा ॥२३ ॥ जिहीं गुणीं ते वर्ण चारी। जन्ममृत्यूचिये कातरी। चुकोनियां ईश्वरीं। पैठे होती ॥२४ ॥ जियें आत्मप्रकृतीचे इहीं। गुणीं सत्त्वादिकीं तिहीं। कर्मे चौघां चहूं ठांई। वांटिली वर्णा ॥२५ ॥ जैसें बापें जोडिलें लेंका। वांटिलें सूर्ये मार्ग पांथिकां। नाना व्यापार सेवकां। स्वामी जैसे ॥२६ ॥ तैसी प्रकृतीच्या गुणीं। जया कर्मांची वेल्हावणी। केली आहे वर्णीं। चहूं इहीं ॥२७ ॥ तेथ सत्त्वें आपल्या आंगीं। समीननिमीन भागीं। दोघे केले नियोगी। ब्राह्मण क्षत्रिय ॥२८ ॥ आणि रज परी सात्त्विक। तेथ ठेविले वैश्य लोक। रजचि तमभेसक। तेथ शूद्र ते गा ॥२९ ॥ ऐसा येकाचि प्राणिवृंदा। भेदु चतुर्वर्णधा। गुणींचि प्रबुद्धा। केला जाण ॥८३० ॥ मग आपलें ठेविलें जैसें। आइतेंचि दीपें दिसे। गुणभिन्न कर्म तैसें। शास्त्र दावी ॥३१ ॥ तेंचि आतां कोण कोण। वर्णविहिताचें लक्षण। हें सांगों ऐक श्रवण-। सौभाग्यनिधी ॥३२ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम्॥ ४२॥

तरी सर्वेंद्रियांचिया वृत्ती। घेऊनि आपल्या हातीं। बुद्धि आत्मया मिळे एकांतीं। प्रिया जैसी॥३३॥ ऐसा बुद्धीचा उपरमु। तया नाम म्हणिपे शमु। तो गुण गा उपक्रमु। जया कर्माचा॥३४॥ आणि बाह्येंद्रियांचें धेंडें। पिटूनि विधीचेनि दंडें। नेदिजे अधर्माकडे। कहींचि जावों॥३५॥ तो पैं गा शमा विरजा। दम गुण जेथ दुजा। आणि स्वधर्माचिया वोजा। जिणें जें कां॥३६॥ तेवींचि सटवीचिये राती। न विसंबिजे जेवीं वाती। तैसा ईश्वरनिर्णयो चित्तीं। वाहणें सदा॥३७॥ तया नाम तप। तें तिजया गुणाचें रूप। आणि शौचही निष्पाप। द्विविध जेथ॥३८॥ मन भावशुद्धी भरलें। आंग क्रिया अळंकारिलें। ऐसें सबाह्य जियालें। साजिरें जें कां॥३९॥ तया नाम शौच पार्था। तो कर्मीं गुण जये चौथा। आणि पृथ्वीचिया परी सर्वथा। सर्व जें साहाणें॥८४०॥ ते गा क्षमा पांडवा। गुण जेथ पांचवा। स्वरांमाजीं सुहावा। पंचमु जैसा॥४१॥ आणि वांकडेनि वोघेंसीं। गंगा वाहे उजूचि जैसी। कां पुढीं वळल्र ऊंसीं। गोडी जैसी॥४२॥ तैसा विषमांहि जीवां-। लागीं उजुकारु बरवा। तें आर्जव गा सहावा। जेथींचा गुण॥४३॥ आणि पाणियें प्रयत्नें माळी। अखंड जचे झाडामुळीं। परी तें आघवेंचि फळीं। जाणे जेवीं॥४४॥ तैसें शास्त्राचारें तेणें। ईश्वरुचि येक पावणें। हें फुडें जें कां जाणणें। तें येथ ज्ञान॥४५॥ तें गा कर्मीं जिये। सातवा गुण होये। आणि विज्ञान हें पाहें। एवंरूप॥४६॥ तरी सत्त्वशुद्धीचिये वेळे। शास्त्रें कां ध्यानबळें।

ईश्वरतत्त्वींचि मिळे। निष्टंकबुद्धी ।।४७।। हें विज्ञान बरवें। गुणरत्न जेथ आठवें। आणि आस्तिक्य जाणावें। नववा गुण ।।४८।। पैं राजमुद्रा आथिलीया। प्रजा भजे भलतया। तेवीं शास्त्रें स्वीकारिलिया। मार्गमात्रातें ।।४९।। आदरें जें कां मानणें। तें आस्तिक्य मी म्हणें। तो नववा गुण जेणें। कर्म तें साच ।।८५०।। एवं नवही शमादिक। गुण जेथ निर्दोष। तें कर्म जाण स्वाभाविक। ब्राह्मणाचें ।।५१।। तो नवगुणरत्नाकरु। या नवरत्नांचा हारु। न फेडित ले दिनकरु। प्रकाशु जैसा ।।५२।। नाना चांपा चांपौळी पूजिला। चंद्रु चंद्रिका धवळला। कां चंदनु निजें चर्चिला। सौरभ्यें जेवीं ।।५३।। तेवीं नवगुणटिकला। लेणे ब्राह्मणाचें अव्यंग। कहींचि न संडी आंग। ब्राह्मणाचें ।।५४।। आतां उचित तें क्षत्रिया। तेंही कर्म धनंजया। सांगों ऐक प्रज्ञेचिया। भरोवरी ।।५५।।

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्॥ ४३॥

तरी भानु हा तेजें। नापेक्षी जेवी विरजें। कां सिंहें न पाहिजे। जावळिया ।।५६।। ऐसा स्वयंभ जो जीवें लाठु। सावायेंवीण उद्भटु। तें शौर्य गा जेथ श्रेष्ठु। पहिला गुण ।।५७।। आणि सूर्याचेनि प्रतापें। कोडिही नक्षत्र हारपे। ना तो तरी न लोपे। सचंद्रीं तिहीं ।।५८।। तैसेनि आपुले प्रौढिगुणें। जगा या विस्मयो देणें। आपण तरी न क्षोभणें। कायसेनही ।।५९।। तें प्रागल्भ्यरूप तेजा। जिये कर्मीं गुण दुजा। आणि धीरु तो तिजा। जेथींचा गुण ।।८६०।। वरि पडलिया आकाश। बुद्धीचे डोळे मानस। झांकी ना तें परियेस। धैर्य जेथें ।।६१।। आणि पाणी हो भलतेतुकें। परी

तें जिणौनि पद्म फांके। कां आकाश उंचिया जिंके। आवडे तयातें॥६२॥ तेवीं विविधा अवस्था। पातल्या जिणौनि पार्था। प्रज्ञा फळतया अर्था। वेझ देणें जें॥६३॥ तें दक्षत्व गा चोख। जेथ चौथा गुण देख। आणि जुंझ अलौकिक। तो पांचवा गुण॥६४॥ आदित्याचीं झाडें। सदा सन्मुख सूर्याकडे। तेवीं समोर शत्रूपुढें। होणें सदा॥६५॥ माहेवणी प्रयत्नेंसी। चुकविजे सेजे जैसी। रिपू पाठी नेदिजे तैसी। समरांगणीं॥६६॥ हा क्षत्रियांचेया आचारीं। पांचवा गुणेंद्रु अवधारीं। चहूं पुरुषार्थां शिरीं। भक्ति जैसी॥६७॥ आणि जालेनि फुलें फळें। शाखिया जैसी मोकळे। का उदार परिमळें। पद्माकरु॥६८॥ नाना आवडीचेनि मापें। चांदिणें भलतेणें घेपे। पुढिलांचेनि संकल्पें। तैसें जें देणे॥६९॥ तें उमप गा दान। जेथ सहावें गुणरत्न। आणि आज्ञे एकायतन। होणें जें कां॥८७०॥ पोषूनि अवयव आपुले। करविजती मानविले। तेवीं पाळणें लोभविलें। जग जें भोगणें॥७१॥ तया नाम ईश्वरभावो। जो सर्वसामर्थ्याचा ठावो। तो गुणांमाजीं रावो। सातवा जेथ॥७२॥ ऐसें जें शौर्यादिकीं। इहीं सात गुणविशेखीं। अळंकृत सप्तऋषीं। आकाश जैसें॥७३॥ तैसें सप्तगुणीं विचित्र। कर्म जें जगीं पवित्र। तें सहज जाण क्षात्र। क्षत्रियाचें॥७४॥ नाना क्षत्रिय नव्हे नरु। तो सत्त्वसोनयाचा मेरु। म्हणौनि गुणस्वर्गां आधारु। सातां इयां॥७५॥ नातरी सप्तगुणार्णवीं। परिवारली बरवी। हे क्रिया नव्हे पृथ्वी। भोगीतसे तो॥७६॥ कां गुणांचे सातांही ओघीं। हे क्रिया ते गंगा जगीं। तया महोदधीचिया आंगीं। विलसे जैसी॥७७॥ परी हें बहु असो देख। शौर्यादि

गुणात्मक। कर्म गा नैसर्गिक। क्षत्रजातीसी ॥७८॥ आतां वैश्याचिये जाती। उचित जे महामती। तें ऐकें गा निरुती। क्रिया सांगों ॥७९॥

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्॥ ४४॥

तरी भूमि बीज नांगरु। यया भांडवलाचा आधारु। घेऊनि लाभु अपारु। मेळवणें जें ॥८८०॥ किंबहुना कृषी जिणें। गोधनें राखोनि वर्तणें। कां समर्घीची विकणें। महर्घी वस्तु ॥८१॥ येतुलाचि पांडवा। वैश्यातें कर्माचा मेळावा। हा वैश्यजातिस्वभावा-। आंतुला जाण ॥८२॥ आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण। हे द्विजन्मे तिन्हीं वर्ण। ययांचें जें शुश्रूषण। तें शूद्रकर्म ॥८३॥ पैं द्विजसेवेपरौतें धांवणें नाहीं शूद्रातें। एवं चतुर्वर्णोचितें। दाविलीं कर्में ॥८४॥

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु॥ ४५॥

आतां इयेचि विचक्षणा। वेगळालिया वर्णा। उचित जैसें करणां। शब्दादिक ॥८५॥ नातरी जळदच्युता। पाणिया उचित सरिता। सरितेंसीं पांडुसुता। सिंधु उचितु ॥८६॥ तैसें वर्णाश्रमवशें। जें करणीय आलें असे। गोरेया आंगा जैसें। गोरेपण ॥८७॥ तया स्वभावविहिता कर्मा। शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा। प्रवर्तावयालागीं प्रमा। अळळ कीजे ॥८८॥ पैं आपुलेंचि रत्न थितें। घेपे पारखियाचेनि हातें। तैसें स्वकर्म आपैतें। शास्त्रें करावें ॥८९॥ जैसी दिठी असे आपुलिया ठायीं। परी दीपेंवीण भोग नाहीं। मार्गु न लाहतां काई। पाय असतां होय ॥८९०॥ म्हणौनि ज्ञातिवशें साचारु।

सहज असे जो अधिकारु। तो आपुलालिया शास्त्रें गोचरु। आपण कीजे ॥९१॥ मग घरींचाचि ठेवा। जेवीं डोळ्या दावी दिवा। तरी घेतां काय पांडवा। आडळु असे ॥९२॥ तैसें स्वभावें भागा आलें। वरी शास्त्रें खरें केलें। तें विहित जो आपुलें। आचरे गा ॥९३॥ परी आळसु सांडुनी। फळकाम दवडुनी। आंगें जीवें मांडुनी। तेथेंचि भरु ॥९४॥ वोघीं पडिलें पाणी। नेणे आनानी वाहणी। तैसा जाय आचरणी। व्यवस्थोनी ॥९५॥ अर्जुना जो यापरी। तें विहित कर्म स्वयें करी। तो मोक्षाच्या ऐल्द्वारीं। पैठा होय ॥९६॥ जे अकरणा आणि निषिद्धा। न वचेचि कांहीं संबंधा। म्हणौनि भवा विरुद्धा। मुकला तो ॥९७॥ आणि काम्यकर्मांकडे। न परतेचि जेथ कोडें। तेथ चंदनाचेंही खोडें। न लेचि तो ॥९८॥ येर नित्य कर्म तंव। फलत्यागें वेंचिलें सर्व। म्हणौनि मोक्षाची शिंव। ठाकूं लाहे ॥९९॥ ऐसेनि शुभाशुभीं संसारीं। सांडिला तो अवधारी। वैराग्यमोक्षद्वारीं। उभा ठाके ॥९००॥ जें सकळ भाग्याची सीमा। मोक्षलाभाची जें प्रमा। नाना कर्ममार्गश्रमा। शेवटु जेथ ॥१॥ मोक्षफळें दिधली वोल। जें सुकृततरूचें फूल। तये वैराग्यीं ठेवी पाऊल। भंवरु जैसा ॥२॥ पाहीं आत्मज्ञानसुदिनाचा। वाधावा सांगतयां अरुणाचा। उदयो त्या वैराग्याचा। ठावो पावे ॥३॥ किंबहुना आत्मज्ञान। जेणें हाता ये निधान। तें वैराग्य दिव्यांजन। जीवें ले तो ॥४॥ ऐसी मोक्षाची योग्यता। सिद्धी जाय तया पांडुसुता। अनुसरोनि विहिता। कर्मा यया ॥५॥ हें विहित कर्म पांडवा। आपुला अनन्य वोलावा। आणि

हेचि परम सेवा। मज सर्वात्मकाची ॥६॥ पैं आघवाचि भोगेंसी। पतिव्रता क्रीडे प्रियेंसीं। कीं तयाची नामें जैसीं। तपें तिया केलीं ॥७॥ कां बाळका एकी माये-। वांचोनि जिणें काय आहे। म्हणौनि सेविजे कीं तो होये। पाटाचा धर्मु ॥८॥ नाना पाणी म्हणौनि मासा। गंगा न सांडितां जैसा। सर्वतीर्थसहवासा। वरपडा जाला ॥९॥ तैसें आपल्या विहिता। उपायो असे न विसंबितां। ऐसा कीजे कीं जगन्नाथा। आभारु पडे ॥९१०॥ अगा जया जें विहित। तें ईश्वराचें मनोगत। म्हणौनि केल्या निभ्रांत। सांपडेचि तो ॥११॥ पैं जीवाचे कसीं उतरली। ते दासी कीं गोसांवीण जाली। सिसे वेंची तया मविली। वही जेवीं ॥१२॥ तैसें स्वामीचिया मनोभावा। न चुकिजे हेचि परमसेवा। येर तें गा पांडवा। वाणिज्य करणें ॥१३॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥४६॥

म्हणोनि विहित क्रिया केली। नव्हे तयाची खूण पाळिली। जयापासूनि कां आलीं। आकारा भूतें ॥१४॥ जो अविद्येचिया चिंधिया। गुंडूनि जीव बाहुल्या। खेळवीतसे तिगुणिया। अहंकाररज्जू ॥१५॥ जेणें जग हें समस्त। आंत बाहेरी पूर्ण भरित। जालें आहे दीपजात। तेजें जैसें ॥१६॥ तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागीं ॥१७॥ म्हणौनि तिये पूजे। रिझलेनि आत्मराजे। वैराग्यसिद्धि देईजे। पसाय तया ॥१८॥ जिये वैराग्यदशे। ईश्वराचेनि वेधवशें। हें

सर्वही नावडे जैसें। वांत होय॥ १९॥ प्राणनाथाचिया आधी। विरहणीतें जिणेंही बाधी। तैसें सुखजात त्रिशुद्धी। दुःखचि लागे।।१२०।। सम्यक्ज्ञान नुदैजतां। वेधेंचि तन्मयता। उपजे ऐसी योग्यता। बोधाचि लाहे।।२१।। म्हणौनि मोक्षलाभालागीं। जो व्रतें वाहतसे आंगीं। तेणें स्वधर्मु आस्था चांगी। अनुष्ठावा।।२२॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्॥४७॥

अगा आपुला हा स्वधर्मु। आचरणीं जरी विषमु। तरी पाहावा तो परिणामु। फळेल जेणें।।२३॥ जैं सुखालागीं आपणपयां। निंबचि आधी धनंजया। तैं कडुवटपनणा तयाचिया। उबगिजेना॥२४॥ फळणया ऐलीकडे। केळीतें पाहतां आस मोडे। ऐसी त्यजिली तरी जोडे। तैसें कें गोमटें॥२५॥ तेवीं स्वधर्मु सांकडु। देखोनि केला जरी कडु। तरी मोक्षसुखाडु। अंतरला कीं।।२६।। आणि आपुली माये। कुब्ज जरी आहे। तरी जीजें तें नोहे। स्नेह कुन्हें कीं।।२७।। येरी जिया पराविया। रंभेहूनि बरविया। तिया काय कराविया। बाळकें तेणें॥२८॥ अगा पाणियाहूनि बहुवें। तुपीं गुण कीर आहे। परी मीना काय होये। असणें तेथें।।२९।। पैं आघविया जगा जें विख। तें विख कीडिया पीयूख। आणि जगा गुळ तें देख। मरण तया।।१३०॥ म्हणौनि जे विहित जया जेणें। फिटे संसाराचें धरणें। क्रिया कठोर तन्ही तेणें। तेचि करावी।।३१।। येरा पराचारा बरविया। ऐसें होईल टेंकलेया। पायांचें चाळणें डोइया। केलें जैसें॥३२॥ यालागीं

कर्म आपुलें। जें जातिस्वभावें असे आलें। ते करी तेणें जिंतिलें। कर्मबंधातें ॥३३॥ आणि स्वधर्मुचि पाळावा। परधर्मु तो गाळावा। हा नेमुही पांडवा। न कीजेचि मा ॥३४॥ तरी आत्मा दृष्ट नोहे। तंव कर्म करणें कां ठाये। आणि करणें तेथ आहे। आयासु आधीं ॥३५॥

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत्।
सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥

म्हणौनि भलतिये कर्मीं। आयासु जऱ्ही उपक्रमीं। तरी काय स्वधर्मीं। दोषु सांगें ॥३६॥ अगा उजू वाटा चालवें। तऱ्ही पायचि शिणवावे। ना आडरानें धांवावें। तऱ्ही तेंचि ॥ ३७॥ पैं शिळा कां सिदोरिया। दाटणें एक धनंजया। परी जें वाहतां विसांवया। मिळिजे तें घेपे ॥३८॥ एऱ्हवीं कणा आणि भूसा। कांडितांही सोसु सरिसा। जैंचि रंधन श्वानमांसा। तेंचि हवी ॥३९॥ दधी जळाचिया घुसळणा। व्यापार सारिखेचि विचक्षणा। वाळुवे तिळा घाणा। गाळणें एक ॥९४०॥ पैं नित्य होम देयावया। कां सैरा आगी सुवावया। फुंकितां धूम धनंजया। साहणें तेंचि ॥४१॥ परी धर्मपत्नी धांगडी। पोसितां जरी एकी वोढी। तरी कां अपरवडी। आणावी आंगा ॥४२॥ हां गा पाठीं लागला घायीं। मरण न चुकेचि पाहीं। तरी समोरला काई। आगळें न कीजे ॥४३॥ अकुळस्त्री दांड्याचे घाये। परघर रिगालीहिं जरी साहे। तरी स्वपतीतें वायें। सांडिलें कीं ॥४४॥ तैसें आवडतेंही करणें। न निपजे शिणल्याविणें। तरी विहित बा रे कोणें। बोलें भारी ॥४५॥ खरी थोडेंचि अमृत घेतां। सर्वस्व वेंचो कां पंडुसुता। जेणें जोडे

जीविता। अक्षय्यत्व ॥४६ ॥ येर काह्यां मोलें वेंचूनि। विष पियावें घेउनि। आत्महत्येसि निमोनि। जायिजे जेणें ॥४७॥ तैसें जाचूनियां इंद्रियें। वेचूनि आयुष्याचेनि दियें। सांचले पापीं आन आहे। दुःखावांचूनि ॥४८ ॥ म्हणोनि करावा स्वधर्मु। जो करितां हिरोनि घे श्रमु। उचित देईल परमु। पुरुषार्थराजु ॥४९ ॥ याकारणें किरीटी। स्वधर्माचिये रहाटी। न विसंबिजे संकटीं। सिद्धमंत्र जैसा ॥९५० ॥ कां नाव जैसी उदधीं। महारोगीं दिव्यौषधी। न विसंबिजे तया बुद्धी। स्वकर्म येथ ॥५१ ॥ मग ययाचि गा कपिध्वजा। स्वकर्माचिया महापूजा। तोषला ईशु तमरजा। झाडा करूनि ॥५२ ॥ शुद्धसत्त्वाचिया वाटा। आणी आपुली उत्कंठा। भव स्वर्ग काळकूटा। ऐसें दावी ॥५३ ॥ जिये वैराग्य येणें बोलें। मागां संसिद्धी रूप केलें। किंबहुना तें आपुलें। मेळवी खागें ॥५४ ॥ मग जिंतिल्या हे भोयें। पुरुष सर्वत्र जैसा होये। कां जाल्रही जें ल्हाहे। तें आतां सांगों ॥५५ ॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां सन्यासेनाधिगच्छति ॥ ४९ ॥

तरी देहादिक हें संसारें। सर्वही मांडलेंसे जें गुंफिरें। तेथ नातुडे तो वागुरे। वारा जैसा ॥५६ ॥ पैं परिपाकाचिये वेळे। फळ देठें ना देठू फळें। न धरें तैसें स्नेह खुळें। सर्वत्र होय ॥५७ ॥ पुत्र वित्त कलत्र। हे जाल्याही स्वतंत्र। माझें न म्हणे पात्र। विषाचें जैसें ॥५८ ॥ हें असो विषयजातीं। बुद्धी पोळली ऐसी माघौती। पाउलें घेऊनि एकांतीं। हृदयाच्या रिगे ॥५९ ॥ ऐसया अंतःकरण। बाह्य येतां तयाची आण। न मोडी समर्था भेण। दासी जैसी ॥९६० ॥

तैसें ऐक्याचिये मुठी-। माजिवडें चित्त किरीटी। करूनि वेधीं नेहटी। आत्मयाच्या ॥६१॥ तेव्हां दृष्टादृष्ट स्पृहे। निमणें जालेंचि आहे। आगी दडपल्या धुयें। राहिजे जैसें ॥६२॥ म्हणौनि नियमिल्या मानसीं। स्पृहा नासोनि जाय आपैसी। किंबहुना तो ऐसी। भूमिका पावे ॥६३॥ पैं अन्यथा बोधु आघवा। मावळोनि तया पांडवा। बोधमात्रींचि जीवा। ठावो होय ॥६४॥ धरवणी वेंचे सरे। तैसें भोगें प्राचीन पुरे। नवें तंव नुपकरे। कांहींचि करूं ॥६५॥ ऐशी कर्मसाम्यदशा। होय तेथ वीरेशा। मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गा ॥६६॥ रात्रीची चौपाहरी। वेंचलिया अवधारीं। डोळ्या तमारी। मिळे जैसा ॥६७॥ का येऊनि फळाचा घडु। पारुषवी केळीची वाढु। गुरु भेटोनि करी पाडु। बुभुत्सु तैसा ॥६८॥ मग आलिंगिला पूर्णिमा। जैसा उणीव सांडी चंद्रमा। तैसें होय वीरोत्तमा। गुरुकृपा तया ॥६९॥ तेव्हां अबोधुमात्र असे। तो तंव तया कृपा नासे। तेथ निशीसवें जैसें। आंधारें जाय ॥९७०॥ तैसी अबोधाचिये कुशी। कर्म कर्ता कार्य ऐशी। त्रिपुटी असे ते जैसी। गाभिणी मारिली ॥७१॥ तैसेंचि अबोधनाशासवें। नाशे क्रियाजात आघवें। ऐसा समूळ संभवे। संन्यासु हा ॥७२॥ येणें मूळाज्ञानसंन्यासें। दृश्याचा जेथ ठावो पुसे। तेथ बुझावें तें आपैसें। तोचि आहे ॥७३॥ चेइलियावरी पाहीं। स्वप्नींचिया तिये डोहीं। आपणयातें काई। काढूं जाइजे ॥७४॥ तैं मी नेणें आतां जाणेन। हें सरलें तया दुःस्वप्न। जाला ज्ञातृज्ञेयाविहीन। चिदाकाश ॥७५॥ मुखाभासेंसीं आरिसा। परौता नेलिया वीरेशा। पाहातेपणेंवीण जैसा। पाहाता ठाके ॥७६॥ तैसें नेणणें जें गेलें।

तेणें जाणणेंही नेलें। मग निष्क्रिय उरलें। चिन्मात्रचि ॥७७॥ तेथ स्वभावें धनंजया। नाहीं कोणीचि क्रिया। म्हणौनि प्रवादु तया। नैष्कर्म्यु ऐसा ॥७८॥ तें आपुलें आपणपें। असे तेंचि होऊनि आरोपे। तरंगु कां वायुलोपें। समुद्रु जैसा ॥७९॥ तैसें नहोणें निपजे। ते नैष्कर्म्यसिद्धि जाणिजे। सर्वसिद्धींत सहजें। परम हेचि ॥९८०॥ देउळाचिया कामा कळसु। परम गंगेसी सिंधुप्रवेशु। कां सुवर्णशुद्धी कसु। सोळावा जैसा ॥८१॥ तैसें आपुलें नेणणें। फेडीजे का जाणणें। तेंही गिळूनि असणें। ऐसी जे दशा ॥८२॥ तियेपरतें कांहीं। निपजणें येथ नाहीं। म्हणौनि म्हणिपे पाहीं। परमसिद्धि ते ॥८३॥ परी हेचि आत्मसिद्धि। जो कोणी भाग्यनिधि। श्रीगुरुकृपालब्धि-। काळीं पावे ॥८४॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥५०॥

उदयजतांचि दिनकरु। प्रकाशुचि आते आंधारु। कां दीपसंगें कापुरु। दीपुचि होय ॥८५॥ तया लवणाची कणिका। मिळतखेंवो उदका। उदकचि होऊनि देखा। ठाके जेवीं ॥८६॥ कां निद्रित चेवविलिया। स्वप्नेंसि निद वायां। जाऊनि आपणपया। मिळे जैसा ॥८७॥ तैसें जया कोण्हासि दैवें। गुरुवाक्य श्रवणाचिसवें। द्वैत गिळोनि विसंवे। आपणया वृत्ती ॥८८॥ कानावचनाचिये भेटी-। सरिसाचि पैं किरीटी। वस्तु होऊनि उठी। कवणि एकु जो ॥८९॥ तयासी मग करणें। हें बोलिजैलचि कवणें। आकाशा येणें जाणें। आहे काई ॥९९०॥ म्हणौनि तयासि कांहीं। त्रिशुद्धि

करणें नाहीं। परी ऐसें जरी हें कांहीं। नव्हे जया ॥९१ ॥ एऱ्हवीं स्वकर्माचेनि वन्ही। काम्यनिषिद्धाचिया इंधनीं। रजतमें कीर दोन्ही। जाळिलीं आधीं ॥९२ ॥ पुत्र वित्त परलोकु। यया तिहींचा अभिलाखु। घरीं होय पाइकु। हेंही जालें॥९३ ॥ इंद्रियें सैरा पदार्थीं। रिगतां विटाळलीं होतीं। तियें प्रत्याहार तीर्थीं। न्हाणिलीं कीर॥९४ ॥ आणि स्वधर्माचें फळ। ईश्वरीं अर्पूनि बळ। घेऊनि केलें अढळ। वैराग्यपद ॥९५ ॥ ऐसी आत्मसाक्षात्कारीं। लाभे ज्ञानाची उजरी। ते सामुग्री कीर पुरी। मेळविली ॥९६ ॥ आणि तेचि समयीं। सद्गुरु भेटले पाहीं। तेवींचि तिहीं कांहीं। वंचिजेना ॥९७ ॥ परी वोखद घेतखेंवो। काय लाभे आपुला ठावो। का उदयजतांचि दिवो। मध्यान्ह होय ॥९८ ॥ सुक्षेत्रीं आणि वोल्टे। बीजही पेरिलें गोमटें। तरी आलोट फळ भेटे। परी वेळे कीं गा ॥९९ ॥ जोडला मार्गु प्रांजळु। मिनला सुसंगाचाही मेळु। तरी पाविजे वांचूनि वेळु। लागेचि कीं॥१००० ॥ तैसा वैराग्यलाभु जाला। वरी सद्गुरुही भेटला। जीवीं अंकुरु फुटला। विवेकाचा ॥१ ॥ तेणें ब्रह्म एक आथी। येर आघवीचि भ्रांती। हेंही कीर प्रतीती। गाढी केली ॥२ ॥ परी तेंचि जें परब्रह्म। सर्वात्मक सर्वोत्तम। मोक्षाचेंही काम। सरे जेथ ॥३ ॥ यया तिन्ही अवस्था पोटीं। जिरवी जें गा किरीटी। तया ज्ञानासिही मिठी। दे जे वस्तु ॥४ ॥ ऐक्याचें एकपण सरे। जेथ आनंदकणुही विरे। कांहीचि नुरोनि उरे। जें कांहीं गा ॥५ ॥ तिये ब्रह्मीं ऐक्यपणें। ब्रह्मचि होऊनि असणें। तें क्रमेंचि करूनि तेणें। पाविजे पैं ॥६ ॥ भुकेलियापासीं। वोगरिलें षड्रसीं। तो तृप्ति प्रतिग्रासीं।

ल्हे जेवीं ॥७॥ तैसा वैराग्याचा वोल्रवा। विचाराचा तो दिवा। आंबुथितां आत्मठेवा। काढीची तो ॥८॥ तरी भोगिजे आत्मऋद्धी। येवढी योग्यतेची सिद्धी। जयाच्या आंगीं निरवधी। लेणें जाली ॥९॥ तो जेणें क्रमें ब्रह्म। होणें करी गा सुगम। तया क्रमाचें आतां वर्म। आईक सांगों ॥१०॥

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च।
शद्बादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च॥५१॥

तरी गुरु दाविलिया वाटा। येऊनि विवेकतीर्थतटा। धुऊनियां मळकटा। बुद्धीचा तेणें ॥११॥ मग राहूनें उगळिली। प्रभा चंद्रें आलिंगिली। तैसी शुद्धते जडली। आपणयां बुद्धि ॥१२॥ सांडूनि कुळें दोन्ही। प्रियासी अनुसरे कामिनी। द्वंद्वत्यागें स्वचिंतनीं। पडली तैसी ॥१३॥ आणि ज्ञाना ऐसें जिव्हार। नेवों नेवों निरंतर। इंद्रियीं केले थोर। शब्दादिक जे ॥१४॥ ते रश्मिजाळ काढलेया। मृगजळ जाय ल्या। तैसें धृतिरोधें तयां। पांचांही केलें ॥१५॥ नेणतां अधमाचिया अन्ना। खादलिया कीजे वमना। तैसीं वोकविलीं सवासना। इंद्रियें विषयीं ॥१६॥ मग प्रत्यगावृत्ती चोखटें। लाविलीं गंगेचेनि तटें। ऐसीं प्रायश्चित्तें धुवटें। केली येणें ॥१७॥ पाठीं सात्त्विकें धीरें तेणें। शोधारलीं तियें करणें। मग मनेंसीं योगधारणें। मेळविलीं ॥१८॥ तेवींचि प्राचीनें इष्टानिष्टें। भोगेंसीं येउनी भेटे। तेथ देखिलियाही वोखटें। द्वेषु न करी ॥१९॥ ना गोमटेंचि विपायें। तें आणूनि पुढां सूये। तयालागीं न होये। साभिलाषु ॥१०२०॥ यापरी इष्टानिष्टीं। रागद्वेष किरीटी। त्यजूनि गिरिकपाटीं। निकुंजीं वसे ॥२१॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः॥ ५२॥

गजबजा सांडिलिया। वसवी वनस्थळिया। अंगाचियाचि मांदिया। एकलेया॥२२॥ शमदमादिकीं खेळे। न बोलणेंचि चावळे। गुरुवाक्याचेनि मेळें। नेणे वेळु॥२३॥ आणि आंगा बळ यावें। नातरी क्षुधा जावें। कां जीभेचे पुरावे। मनोरथ॥२४॥ भोजन करितांविखीं। यया तिहींतें न लेखी। आहारीं मिती संतोषीं। माप न सूये॥२५॥ अशनाचेनि पावकें। हारपतां प्राणु पोखे। याचि भागु मोटकें। अशन करी॥२६॥ आणि परपुरुषें कामिली। कुळवधू आंग न घाली। निद्रालस्या न मोकली। अशन तैसें॥२७॥ दंडवताचेनि प्रसंगें। भुयीं हन अंग लागे। वांचूनि येर नेघे। राभस्य तेथ॥२८॥ देहनिर्वाहापुरतें। राहाटवी हातांपायांतें। किंबहुना आपैतें। सबाह्य केलें॥२९॥ आणि मनाचा उंबरा। वृत्तीसी देखों नेदी वीरा। तेथ कें वाग्व्यापारा। अवकाशु असे॥१०३०॥ ऐसेनि देह वाचा मानस। हे जिणौनि बाह्यप्रदेश। आकळिलें आकाश। ध्यानाचें तेणें॥३१॥ गुरुवाक्यें उठविला। बोधीं निश्चयो आपुला। न्याहाळी हातीं घेतला। आरिसा जैसा॥३२॥ पैं ध्याता आपणचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारीं। ध्येयत्वें घे हे अवधारीं। ध्यानरूढी गा॥३३॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता। ययां तिहीं एकरूपता। होय तंव पंडुसुता। कीजे तें गा॥३४॥ म्हणौनि तो मुमुक्षु। आत्मज्ञानीं जाला दक्षु। परी पुढां सूनि पक्षु। योगाभ्यासाचा॥३५॥ अपानरंध्रद्वया-। माझारीं धनंजया। पार्ष्णी

पिडूनियां। कांवरुमूळ ॥३६॥ आकुंचूनि अध। देऊनि तिन्हीं बंध। करूनि एकवद। वायुभेदी ॥३७॥ कुंडलिनी जागवूनि। मध्यमा विकाशूनि। आधारादि भेदूनि। आज्ञावरी ॥३८॥ सहस्त्रदळाचा मेघु। पीयूषें वर्षोनि चांगु। तो मूळवरी वोघु। आणूनियां ॥३९॥ नाचतया पुण्यगिरी। चिद्भैरवाच्या खापरीं। मनपवनाची खीचपुरी। वाढूनियां ॥१०४०॥ जाल्या योगाचा गाढा। मेळावा सूनि हा पुढां। ध्यान मागिलीकडां। स्वयंभ केलें ॥४१॥ आणि ध्यान योग दोन्ही। इये आत्मतत्त्वज्ञानीं। पैठी होआवया निर्विघ्नीं। आधींचि तेणें ॥४२॥ वीतरागतेसारिखा। जोडूनि ठेविला सखा। तो आघवियाचि भूमिका-। सवें चाले ॥४३॥ पाहावें तें दिसें तंववरी। दिठीतें न संडी दीप जरी। तरी कें आहे अवसरी। देखावया ॥४४॥ तैसें मोक्षीं प्रवर्तल्या। वृत्ती ब्रह्मीं जाय लया। तंव वैराग्य आथी तया। भंगु कैचा ॥४५॥ म्हणौनि सवैराग्यु। ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु। करूनि जाला योग्यु। आत्मलाभा ॥४६॥ ऐसी वैराग्याची अंगीं। बाणूनियां वज्रांगी। राजयोगतुरंगीं। आरूढला ॥४७॥ वरी आड पडिलें दिठी। सानें थोर निवटीं। तें बळी विवेकमुष्टीं। ध्यानाचें खांडें ॥४८॥ ऐसेनि संसाररणाआंतु। आंधारीं सूर्यु तैसा असे जातु। मोक्षविजयश्रीये वरैतु। होआवयालागीं ॥४९॥

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥५३॥

तेथ आडवावया आले। दोषवैरी जे थोपटिले। तयांमाजीं पहिले। देहाहंकारु ॥१०५०॥ जो न मोकली मारुनी। जीवों नेदी

उपजवोनी। विचंबवी खोडां घालुनी। हाडांचिया ॥५१॥ तयाचा देहदुर्ग हा थारा। मोडूनि घेतला तो वीरा। आणि बळ हा दुसरा। मारिला वैरी ॥५२॥ जो विषयाचेनि नांवें। चौगुणेंही वरी थांवे। जेणें मृतावस्था धांवे। सर्वत्र जगा ॥५३॥ तो विषयविषाचा अथावो। आघविया दोषांचा रावो। परी ध्यानखड्गांचा घावो। साहेल कैंचा ॥५४॥ आणि प्रियविषयप्राप्ती। करी जया सुखाची व्यक्ति। तेचि घालूनि बुंथी। आंगीं जो वाजे ॥५५॥ जो सन्मार्गु भुलवी। मग अधर्माच्या आडवीं-। सूनि वाघां सांपडवी। नरकादिकां ॥५६॥ तो विश्वासें मारितां रिपु। निवटूनि घातला दर्पु। आणि जयाचा अहा कंपु। तापसांसी ॥५७॥ क्रोधा ऐसा महादोखु। जयाचा देखा परिपाकु। भरिजे तंव अधिकु। रिता होय जो ॥५८॥ तो कामु कोणेच ठायीं। नसे ऐसें केले पाहीं। कीं तेंचि क्रोधाही। सहजें आलें ॥५९॥ मुळाचें तोडणें जैसें। होय कां शाखोद्देशें। कामु नाशलेनि नाशे। तैसा क्रोधु ॥१०६०॥ म्हणौनि काम वैरी। जाला जेथ ठाणोरी। तेथ सरली वारी। क्रोधाचीही ॥६१॥ आणि समर्थु आपुला खोडा। शिसें वाहवी जैसा होडा। तैसा भुंजौनि जो गाढा। परिग्रहो ॥६२॥ जो माथांचि पालाणवी। अंगा अवगुण घालवी। जीवें दांडी घेववी। ममत्वाची ॥६३॥ शिष्यशास्त्रादिविलासें। मठादिमुद्रेचेनि मिसें। घातले आहाती फांसे। निसंगा जेणें ॥६४॥ घरीं कुटुंबपणें सरे। तरी वनीं वन्य होऊनि अवतरे। नागवीयाही शरीरें। लागला आहे ॥६५॥ ऐसा दुर्जयो जो परिग्रहो। तयाचा फेडूनि ठावो।

भवविजयाचा उत्साहो। भोगीतसे जो ॥६६॥ तेथ अमानित्वादि आघवे। ज्ञानगुणाचे जे मेळावे। ते कैवल्यदेशींचे आघवे। रावो जैसे आले॥६७॥ तेव्हां सम्यक्‌ज्ञानाचिया। राणिवा उगाणूनि तया। परिवारु होऊनियां। राहत अंगें ॥६८॥ प्रवृत्तीचिये राजबिदीं। अवस्थाभेदप्रमदी। कीजत आहे प्रतिपदीं। सुखाचें लेण ॥६९॥ पुढां बोधाचिये कांबीवरी। विवेकु दृश्याची मांदी सारी। योगभूमिका आरती करी। येती जैसिया ॥१०७०॥ तेथ ऋद्धिसिद्धींची अनेगें। वृंदें मिळती प्रसंगें। तये पुष्पवर्षी आंगें। नाहातसे तो ॥७१॥ ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें। स्वराज्य येतां जवळिकें। झळंबित आहे हरिखें। तिन्ही लोक ॥७२॥ तेव्हां वैरिया कां मैत्रिया। तयासि माझें म्हणावया। समानता धनंजया। उरेचिही ना ॥७३॥ हें ना भलतेणें व्याजें। तो जयातें म्हणे माझें। तें नोडवेचि कां दुजें। अद्वितीय जाला ॥७४॥ पैं आपुलिया एकी सत्ता। सर्वही कवळूनिया पंडुसुता। कही न लगाती ममता। धाडिली तेणें ॥७५॥ ऐसा जिंतिलिया रिपुवर्ग। आपु मानल्यां हें जग। अपैसा योगतुरंग। स्थिर जाला ॥७६॥ वैराग्याचें गाढलें। अंगीं त्राण होतें भलें। तेंही नावेक ढिलें। तेव्हां करी ॥७७॥ आणि निवटी ध्यानाचें खांडें। तें दुजें नाहींचि पुढें। म्हणूनि हातु आसुडे। वृत्तीचाही ॥७८॥ जैसें रसौषध खरें। आपुलें काज करूनि पुरें। आपणही नुरे। तैसें होतसे ॥७९॥ देखोनि ठाकिता ठावो। धांवता थिरावे पावो। तैसा ब्रह्मसामीप्यें थांवो। अभ्यासु सांडी ॥१०८०॥ घडतां महोदधीसी। गंगा वेगें सांडिजे जैसी। कां कामिनी कांतापासीं। स्थिर होय ॥८१॥

नाना फळतिये वेळे। केळीची वाढी मांटुळें। कां गांवापुढें वळे। मार्गु जैसा ॥८२॥ तैसा आत्मसाक्षात्कारु। होईल देखोनि गोचरु। ऐसा साधनहतियेरु। हळूचि ठेवी ॥८३॥ म्हणौनि ब्रह्मेंसीं तया। ऐक्याचा समो धनंजया। होतसें तैं उपाया। वोहटु पडे ॥८४॥ मग वैराग्याची गोंधळुक। जे ज्ञानाभ्यासाचें वार्धक्य। योगफळाच्याही परिपाक। दशा जें कां ॥८५॥ ते शांति पैं गा सुभगा। संपूर्ण ये तयाचिया आंगा। तैं ब्रह्म होआवयाजोगा। होय तो पुरुषु ॥८६॥ पुनवेहूनी चतुर्दशी। जेतुलें उणेपण शशी। कां सोळेपाऊनि जैसी। पंधरावी वानी ॥८७॥ सागरींही पाणी वेगें। संचरे तें रूप गंगे। थेर निश्चळ जें उगें। तें समुद्र जैसा ॥८८॥ ब्रह्म आणि ब्रह्महोतिये। योग्यतें तैसा पाडु आहे। तेचि शांतीचेनि ल्वलाहें। होय तो गा ॥८९॥ पैं तेंचि होणेनवीण। प्रतीती आलें जें ब्रह्मपण। ते ब्रह्म होती जाण। योग्यता येथ ॥१०९०॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥५४॥

ते ब्रह्मभावयोग्यता। पुरुषु तो मग पंडुसुता। आत्मबोध-प्रसन्नता-। पदीं बैसे ॥९१॥ जेणें निपजे रससोय। तो तापुही जैं जाय। तैं ते कां होय। प्रसन्न जैसी ॥९२॥ नाना भरतिया लगबगा। शरत्काळीं सांडिजे गंगा। कां गीत राहतां उपांगा। वोहटु पडे ॥९३॥ तैसा आत्मबोधीं उद्यमु। करितां होय जो श्रमु। तोही जेथें समु। होऊनि जाय ॥९४॥ आत्मबोधप्रशस्ती। हे तिये दशेची ख्याती। ते भोगीतसे महामती। योग्यु तो गा ॥९५॥ तेव्हां आत्मत्वें

शोचावें। कांहीं पावावया कामावें। हें सरलें समभावें। भरितें तया ॥९६॥ उदया येतां गभस्ती। नाना नक्षत्रव्यक्ती। हारविजती दीप्ती। आंगिका जेवीं ॥९७॥ तेवीं उठतिया आत्मप्रथा। हे भूतभेदव्यवस्था। मोडीत मोडीत पार्था। वास पाहे तो ॥९८॥ पाटियेवरील अक्षरें। जैसीं पुसतां येती करें। तैसीं हारपती भेदांतरें। तयाचिये दृष्टी ॥९९॥ तैसेनि अन्यथाज्ञानें। जियें घेपती जागरस्वप्नें। तियें दोन्ही केलीं लीनें। अव्यक्तामाजीं ॥११००॥ मग तेंही अव्यक्त। बोध वाढता झिजत। पुरलां बोधीं समस्त। बुडोनि जाय ॥१॥ जैसी भोजनाच्या व्यापारीं। क्षुधा जिरत जाय अवधारीं। मग तृप्तीच्या अवसरीं। नाहींच होय ॥२॥ नाना चालीचिया वाढी। वाट होत जाय थोडी। मग पातला ठायीं बुडी। देऊनि निमे ॥३॥ कां जागृती जंव जंव उद्दीपे। तंव तंव निद्रा हारपे। मग जागीनलिया स्वरूपें। नाहींच होय ॥४॥ हें ना आपुलें पूर्णत्व भेटे। जेथ चंद्रासीं बाढी खुंटे। तेथ शुक्लपक्षु आटे। निःशेषु जैसा ॥५॥ तैसा बोध्यजात गिळितु। बोधु बोधें ये मज आंतु। मिसळला तेथ साद्यंतु। अबोधु गेला ॥६॥ तेव्हां कल्पांताचिये वेळे। नदी सिंधूचें पेंडवळें। मोडूनि भरलें जळें। आब्रह्म जैसें ॥७॥ नाना गेलिया घट मठ। आकाश ठाके एकवट। कां जळोनि काष्ठें काष्ठ। वन्हीचि होय ॥८॥ नातरी लेणियांचे ठसे। आटोनि गेलिया मुसे। नामरूपभेदें जैसें। सांडिजे सोनें ॥९॥ हेंही असो चेइलया। तें स्वप्न नाहीं जालिया। मग आपणचि आपणयां। उरिजे जैसें ॥१११०॥ तैसा मी एकवांचूनि कांहीं। तया तयाहीसकट नाहीं। हे चौथी भक्ति

पाहीं। माझी तो ल्महे ॥११॥ येर आर्तु जिज्ञासु अर्थार्थी। हे भजती जिये पंथीं। ते तिन्ही पावोनि चौथी। म्हणिपत आहे ॥१२॥ एऱ्हवीं तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती। पैं माझिये सहजस्थिति। भक्ति नाम ॥१३॥ जें नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यथात्वें मातें दाऊनि। सर्वही सर्वीं भजौनि। बुझावीतसे जें ॥१४॥ जो जेथ जैसें पाहों बैसे। तया तेथ तैसेंचि असे। हें उजियेडें कां दिसे। अखंडें जेणें ॥१५॥ स्वप्नाचें दिसणें न दिसणें। जैसें आपलेनि असलेपणें। विश्वाचें आहे नाहीं जेणें। प्रकाशे तैसें ॥१६॥ ऐसा हा सहज माझा। प्रकाशु जो कपिध्वजा। तो भक्ति या वोजा। बोलिजे गा ॥१७॥ म्हणौनि आर्ताच्या ठायीं। हे आर्ति होऊनि पाहीं। अपेक्षणीय जें कांहीं। तें मीचि केला ॥१८॥ जिज्ञासुपुढां वीरेशा। हेचि होऊनि जिज्ञासा। मी कां जिज्ञासु ऐसा। दाखविला ॥१९॥ हेचि होऊनि अर्थना। मीचि माझ्या अर्थीं अर्जुना। करूनि अर्थाभिधाना। आणी मातें ॥११२०॥ एवं घेऊनि अज्ञानातें। माझी भक्ति जे हे वर्ते। ते दावी मज द्रष्ट्यातें। दृश्य करूनि ॥२१॥ येथें मुखचि दिसे मुखें। या बोला कांहीं न चुके। परी दुजेपण हें लटिके। आरिसा करी ॥२२॥ दिठी चंद्रचि घे साचें। परी येतुलें हें तिमिराचें। जे एकचि असे तयाचे। दोनी दावी ॥२३॥ तैसा सर्वत्र मीचि मियां। घेपतसें भक्ति इया। परी दृश्यत्व हें वायां। अज्ञानवशें ॥२४॥ तें अज्ञान आतां फिटलें। माझें द्रष्टृत्व मज भेटलें। निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें ॥२५॥ पैं जेव्हांही असे किडाळ। तेव्हांही सोनेंचि अढळ। परी तें कीड गेलिया केवळ।

उरे जैसें ॥२६॥ हां गा पूर्णिमेआधीं कायी। चंद्रु सावयवुचि नाहीं। परी तिये दिवशीं भेटे पाहीं। पूर्णता तया ॥२७॥ तैसा मीचि अज्ञानद्वारें। दिसें परी हस्तांतरें। मग द्रष्टृत्वीं तें सरे। मियांचि मी लाभें ॥२८॥ म्हणौनि दृश्यपथा-। अतीतु माझा पार्था। भक्तियोगु चवथा। म्हणितला गा ॥२९॥

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥५५॥

या ज्ञानभक्ति सहज। भक्तु एकवटला मज। तो मीचि केवळ हें तुज। श्रुतही आहे ॥११३०॥ जे उभऊनियां भुजा। ज्ञानिया आत्मा माझा। हें बोलिलें कपिध्वजा। ससमाध्यायीं ॥३१॥ ते हे कल्पादीं भक्ति मियां। भागवतमिषें ब्रह्मया। उत्तम म्हणौनि धनंजया। उपदेशिली ॥३२॥ ज्ञानी इयेतें स्वसंविति। शैव म्हणती शक्ति। आम्ही परमभक्ति। आपुली म्हणों ॥३३॥ हे मज मिळतिये वेळे। तयां क्रमयोगियां फळे। मग समस्तही निखिळें। मियांचि भरे ॥३४॥ तेथ वैराग्यविवेकेंसीं। आटे बंध मोक्षेंसीं। वृत्ती तये आवृत्तीसीं। बुडोनि जाय ॥३५॥ घेऊनि ऐल्पणातें। परत्व हारपे जेथें। गिळूनि चाऱ्ही भूतें। आकाश जैसें ॥३६॥ तया परी थडथांद। साध्यसाधनातीत शुद्ध। तें मी होऊनि एकवद। भोगी तो मातें ॥३७॥ घडोनि सिंधूचिया आंगा। सिंधूवरी तळपे गंगा। तैसा पाडु तया भोगा। अवधारीजो ॥३८॥ का आरिसयासि आरिसा। उटूनि दाविलिया जैसा। देखणा अतिशयो तैसा। भोगणां तिये ॥३९॥ चेइलिया स्वप्न नाशे। आपलें ऐक्यचि दिसे। तें दुजेनवीण जैसें।

भोगिजे कां ॥१०४०॥ हें असो दर्पणु नेलिया। तो मुखबोधुही गेलिया। देखलेपण एकलेया। आस्वादिजे जेवीं ॥४१॥ तोचि जालिया भोगु तयाचा। न घडे हा भावो जयांचा। तिहीं बोलें केवीं बोलचा उच्चारु कीजे ॥४२॥ तयांच्या नेणों गांवीं। रवी प्रकाशी हन दिवी। कीं व्योमालागीं मांडवी। उभिली तिहीं ॥४३॥ हां गा राजत्व नव्हतां आंगीं। रावो रायपण काय भोगी। कां आंधारु हन आलिंगी। दिनकरातें ॥४४॥ आणि आकाश जें नव्हे। तया आकाश काय जाणवे। रत्नाचां रूपीं मिरवे। गुंजांचें लेणें ॥४५॥ म्हणौनि मी होणें नाहीं। तया मीचि आहे केहीं। मग भजेल हें कायी। बोलें कीर ॥४६॥ यालागीं तो क्रमयोगी। मी जालाचि मातें भोगी। तारुण्य कां तरुणांगीं। जियापरी ॥४७॥ तरंग सर्वांगीं तोय चुंबी। प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं। नाना अवकाश नभीं। लुंठतु जैसा ॥४८॥ तैसा रूप होऊनि माझें। मातें क्रियावीण तो भजे। अलंकारु का सहजें। सोनयातें जेवीं ॥४९॥ का चंदनाची द्रुती जैसी। चंदनीं भजे अपैसी। का अकृत्रिम शशीं। चंद्रिका ते ॥११५०॥ तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्ही अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचिजोगें नव्हे। बोलाऐसें ॥५१॥ तेव्हां पूर्वसंस्कारछंदें। जें कांहीं तो अनुवादे। तेणें आळविलेनि वो दें। बोलतां मीचि ॥५२॥ बोलतया बोलताचि भेटे। तेथें बोलिलें हें न घटे। तें मौन तंव गोमटें। स्तवन माझें ॥५३॥ म्हणौनि तया बोलतां। बोलें बोलतां मी भेटतां। मौन होय तेणें तत्त्वतां। स्तवी तो मातें ॥५४॥ तैसेंचि बुद्धी का दिठी। जें तो देखों जाय किरीटी। तें देखणें दृश्य लोटी। देखतेंचि

दावी ॥५५॥ आरिसया आधीं जैसें। देखतोंचि मुख दिसे। तयाचें देखणें तैसें। मेळवी द्रष्टें ॥५६॥ दृश्य जाउनियां द्रष्टें। द्रष्टयासीचि जैं भेटे। तैं एकलेपणें न घटे। द्रष्टेपणही ॥५७॥ तेथ स्वप्नींचिया प्रिया। चेवोनि झोंबों गेलिया। ठायिजे दोन्ही न होनियां। आपणचि जैसें ॥५८॥ का दोहीं काष्ठांचिये घृष्टी-। माजीं वन्हि एक उठी। तो दोन्हीं हे भाष आटी। आपणचि होय ॥५९॥ नाना प्रतिबिंब हातीं। घेऊं गेलिया गभस्ती। बिंबताही असती। जाय जैसी ॥११६०॥ तैसा मी होऊनि देखतें। तो घेऊं जाय दृश्यातें। तेथ दृश्य ने तिथें। द्रष्टृत्वेंसीं ॥६१॥ रवि आंधारु प्रकाशिता। नुरेचि जेवीं प्रकाश्यता। तेवीं दृश्यीं नाहीं द्रष्टृता। मी जालिया ॥६२॥ मग देखिजे ना न देखिजे। ऐसी जे दशा निपजे। ते तें दर्शन माझें। साचोकारें ॥६३॥ तें भलतयाही किरीटी। पदार्थाचिया भेटी। दृष्टृदृश्यातीता दृष्टी। भोगी तो सदा ॥६४॥ आणि आकाश हें आकाशें। दाटलें न ढळे जैसें। मिया आत्मेन आपणपें तैसें। जालें तया ॥६५॥ कल्पांतीं उदक उदकें। रुंधिलिया वाहों ठाके। तैसा आत्मेनि मियां येकें। कोंदला तो ॥६६॥ पावो आपणपयां वळघे। केवीं वन्हि आपणपयां लागे। आपणपां पाणी रिघे। स्नाना कैसें ॥६७॥ म्हणोनि सर्व मी जालेपणें। ठेलें तया येणेंजाणें। तेचि गा यात्रा करणें। अद्वया मज ॥६८॥ पैं जळावरील तरंगु। जरी धांविन्नला सवेगु। तरी नाहीं भूमिभागु। क्रमिला जेणें ॥६९॥ जें सांडावें कां मांडावें। जें चाल्यों जेणें चालावें। तें तोयचि एक आघवें। म्हणोनियां ॥११७०॥ गेलियाही भलतेउता। उदकपणें पंडुसुता। तरंगाची एकात्मता। न

मोडेचि जेवीं ॥७१॥ तैसा मीपणें हा ल्रेटल्र। तो आघवेंयाचि मज आतुं आल्रा। या यात्रा होय भल्र। कापडी माझा ॥७२॥ आणि शरीरस्वभाववशें। कांहीं येक करूं जरी बैसे। तरी मीचि तो तेणें मिषें। भेटें तया ॥७३॥ तेथ कर्म आणि कर्ता। हें जाऊनि पंडुसुता। मिंया आत्मेनि मज पाहतां। मीचि होय ॥७४॥ पैं दर्पणातें दर्पणें। पाहिल्रिया होय न पाहणें। सोनें झांकिल्रिया सुवर्णें। न झांके जेवीं ॥७५॥ दीपातें दीपें प्रकाशिजे। तें न प्रकाशणेंचि निपजे। तैसें कर्म मियां कीजे। तें करणें कैंचें ॥७६॥ कर्महीं करितचि आहे। जैं करावें हें भाषचि जाये। तैं न करणेंचि होये। तयाचें केलें ॥७७॥ क्रियाजात मी जालेपणें। घडे कांहींचि न करणें। तयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें ॥७८॥ म्हणौनि करीतयाही वोजा। तें न करणें हेंचि कपिध्वजा। निफजे तिया महापूजा। पूजी तो मातें ॥७९॥ एवं तो बोले तें स्तवन। तो देखे तें दर्शन। अद्वया मज गमन। तो चाले तेंचि ॥११८०॥ तो करी तेतुल्री पूजा। तो कल्पी तो जपु माझा। तो असे तेचि कपिध्वजा। समाधी माझी ॥८१॥ जैसें कनकेंसीं कांकणें। असिजे अनन्यपणें। तो भक्तियोगें येणें। मजसीं तैसा ॥८२॥ उदकीं कल्लोळु। कापुरीं परिमळु। रत्नीं उजाळु। अनन्यु जैसा ॥८३॥ किंबहुना तंतूसी पटु। कां मृत्तिकेसीं घटु। तैसा तो एकवटु। मजसीं माझा ॥८४॥ इया अनन्यसिद्धा भक्ती। या आघवाचि दृश्यजातीं। मज आपणपेंया सुमती। द्रष्ट्याते जाणें ॥८५॥ तिन्ही अवस्थांचेनि द्वारें। उपाध्युपहितआकारें। भावाभावरूप स्फुरे। दृश्य जें हें ॥८६॥ तें हें

आघवेंचि मी द्रष्टा। ऐसिया बोधाचा माजिवटा। अनुभवाचा सुभटा। थेंडा तो नाचे ॥८७॥ रज्जु जाल्या गोचरु। आभासतां तो व्याळाकारु। रज्जुच ऐसा निर्धारु। होय जेवीं ॥८८॥ भांगारापरतें कांहीं। लेणें गुंजहीभरी नाहीं। हें आटुनियां ठायीं। कीजे जैसें ॥८९॥ उदका येकापरतें। तरंग नाहींचि हें निरुतें। जाणोनि तया आकारातें। न घेपे जेवीं ॥११९०॥ नातरी स्वप्नविकारां समस्तां। चेऊनियां उमाणें घेतां। तो आपणयापरौता। न दिसे जैसा ॥९१॥ तैसें जें कांहीं आथी नाथी। येणें होय ज्ञेयस्फूर्ती। तें ज्ञाताचि मी हे प्रतीती। होऊनि भोगी ॥९२॥ जाणे अजु मी अजरु। अक्षयो मी अक्षरु। अपूर्व मी अपारु। आनंदु मी ॥९३॥ अचळु मी अच्युतु। अनंतु मी अद्वैतु। आद्यु मी अव्यक्तु। व्यक्तुही मी ॥९४॥ ईश्य मी ईश्वरु। अनादि मी अमरु। अभय मी आधारु। आधेय मी ॥९५॥ स्वामी मी सदोदितु। सहजु मी सततु। सर्व मी सर्वगतु। सर्वातीतु मी ॥९६॥ नवा मी पुराणु। शून्यु मी संपूर्णु। स्थूलु मी अणु। जें कांहीं तें मी ॥९७॥ अक्रियु मी येकु। असंगु मी अशोकु। व्याप्यु मी व्यापकु। पुरुषोत्तमु मी ॥९८॥ अशब्दु मी अश्रोत्रु। अरूपु मी अगोत्रु। समु मी स्वतंत्रु। ब्रह्म मी परु ॥९९॥ ऐसें आत्मत्वें मज एकातें। इया अद्वयभक्ती जाणोनि निरुतें। आणि याही बोधा जाणतें। तेंही मीचि जाणें ॥१२००॥ पैं चेइलेयानंतरें। आपुलें एकपण उरे। तेंही तोंवरी स्फुरे। तयाशींचि जैसें ॥१॥ कां प्रकाशतां अर्कु। तोचि होय प्रकाशकु। तयाही अभेदा द्योतकु। तोचि जैसा ॥२॥ तैसा वेद्याच्या विलयीं। केवळ वेदकु उरे पाहीं।

तेणें जाणवे तयातेंही। हेंही जो जाणे ॥३॥ तया अद्वयपणा आपुलिया। जाणती ज्ञप्ती जे धनंजया। ते ईश्वरचि मी हे तया। बोधासि ये ॥४॥ मग द्वैताद्वैतातीत। मीचि आत्मा एकु निभ्रांत। हें जाणोनि जाणणें जेथ। अनुभवीं रिघे ॥५॥ तेथ चेइल्यां येकपण। दिसे जें आपुल्यां आपण। तेंही जाता नेणों कोण। होईजे जेवीं ॥६॥ कां डोळां देखतिये क्षणीं। सुवर्णपण सुवर्णीं। नाटितां होय आटणी। अळंकाराचीही ॥७॥ नाना ल्वण तोय होये। मग क्षारता तोयत्वें राहे। तेही जिरतां जेवीं जाये। जालेपण तें ॥८॥ तैसा मी तो हें जें असे। ते स्वानंदानुभवसमरसें। काल्वूनियां प्रवेशे। मजचिमाजीं ॥९॥ आणि तो हे भाष जेथ जाये। तेथें मी हें कोण्हासी आहे। ऐसा मी ना तो तिये सामाये। माझ्याचि रूपीं ॥१२१०॥ जेव्हां कापुर जळों सरे। तयाचि नाम अग्नि पुरे। मग उभयातीत उरे। आकाश जेवीं ॥११॥ कां धाडलिया एका एकु। वाढे तो शून्य विशेखु। तैसा आहे नाहींचा शेखु। मीचि मग आथी ॥१२॥ तेथ ब्रह्म आत्मा ईशु। यया बोला मोडे सौरसु। न बोलणेयाही पैसु। नाहीं तेथ ॥१३॥ न बोलणेंही न बोलोनी। तें बोलिजे तोंड भरुनी। जाणिव नेणिव नेणोनी। जाणिजे तें ॥१४॥ तेथ बुझिजे बोधु बोधें। आनंदु घेपे आनंदें। सुखवरी नुसधे। सुखचि भोगिजे ॥१५॥ तेथ लाभु जोडला लाभा। प्रभा आलिंगिली प्रभा। विस्मयो बुडाला उभा। विस्मयामाजीं ॥१६॥ समु तेथ सामवला। विश्रामु विश्रांति आला। अनुभव वेडावला। अनुभूतिपणें ॥१७॥ किंबहुना ऐसें निखळ। मीपणा जोडे तया

फळ। सेवूनि येली वेल्हाळ। क्रमयोगाची ते ॥१८॥ पैं क्रमयोगा किरीटी। चक्रवर्तीचां मुकुटीं। मी चिद्रत्न ते साटोवाटीं। होय तो माझा ॥१९॥ कीं क्रमयोगप्रासादाचा। कळसु जो हा मोक्षाचा। तयावरील अवकाशाचा। उवावो जाला तो ॥१२२०॥ नाना संसार आडवीं। क्रमयोग वाट बरवी। जोडिली ते मदैक्यगांवीं। पैठी जालीसे ॥२१॥ हें असो क्रमयोगवोघे। तेणें भक्तचित्तें गांगें। मी स्वानंदोदधी वेगें। ठाकिला कीं गा ॥२२॥ हा ठायवरी सुवर्मा। क्रमयोगीं आहे महिमा। म्हणौनि वेळोवेळां तुम्हां। सांगतों आम्ही ॥२३॥ पैं देशें काळें पदार्थें। साधूनि घेईजे मातें। तैसा नव्हे मी आयतें। सर्वांचे सर्वही ॥२४॥ म्हणौनि माझ्या ठायीं। जाचावें न लगे कांहीं। मी लाभें इयें उपायीं। साचचि गा ॥२५॥ एक शिष्य एक गुरु। हा रूढला साच व्यवहारु। तो मत्प्राप्तिप्रकारु। जाणावया ॥२६॥ अगा वसुधेच्या पोटीं। निधान सिद्ध किरीटी। वन्हि सिद्ध काष्ठीं। वोहां दूध ॥२७॥ परी लाभें तें असतें। तया कीजे उपायातें। येर सिद्धचि तैसा येथें। उपायीं मी ॥२८॥ हा फळहीवरी उपावो। कां पां प्रस्तावीतसे देवो। हें पुसतां तरी अभिप्रावो। येथिंचा ऐसा ॥२९॥ जे गीतार्थाचें चांगावें। मोक्षोपायपर आघवें। आन शास्त्रोपाय कीं नव्हे। प्रमाणसिद्ध ॥१२३०॥ वारा आभाळचि फेडी। वांचूनि सूर्यातें न घडी। कां हातु बाबुळी धाडी। तोय न करी ॥३१॥ तैसा आत्मदर्शनीं आडळु। असे अविद्येचा जो मळु। तो शास्त्र नाशी येरु निर्मळु। मी प्रकाशें स्वयें ॥३२॥ म्हणोनि आघवींचि शास्त्रें। अविद्याविनाशाचीं पात्रें। वांचोनि न होती स्वतंत्रें। आत्मबोधीं ॥३३॥ तया अध्यात्मशास्त्रांसीं। जैं साचपणाची ये पुसी। तैं येइजे जया

ठायासी। ते हे गीता ॥३४॥ भानुभूषिता प्राचिया। सतेजा दिशा आघविया। तैसी शास्त्रेश्वरा गीता या। सनाथें शास्त्रें ॥३५॥ हें असो येणें शास्त्रेश्वरें। मागां उपाय बहुवे विस्तारें। सांगितला जैसा करें। घेवों ये आत्मा ॥३६॥ परी प्रथमश्रवणासवें। अर्जुना विपायें हें फावे। हा भावो सकणवे। धरूनि श्रीहरी ॥३७॥ तेंचि प्रमेय एक वेळ। शिष्यीं होआवया अढळ। सांगतसे मुकुळ-। मुद्रा आतां ॥३८॥ आणि प्रसंगें गीता। ठावोही हा संपता। म्हणौनि दावी आद्यंता। एकार्थत्व ॥३९॥ जे ग्रंथाच्या मध्यभागीं। नाना अधिकारप्रसंगीं। निरूपण अनेगीं। सिद्धांतीं केलें ॥१२४०॥ तरी तेतुलेही सिद्धांत। इये शास्त्रीं प्रस्तुत। हें पूर्वापर नेणत। कोण्ही जैं मानी ॥४१॥ तैं महासिद्धांताचा आवांका। सिद्धांतकक्षा अनेका। भिडऊनि आरंभु देखा। संपवितु असे ॥४२॥ एथ अविद्यानाशु हें स्थळ। तेणें मोक्षोपादान फळ। या दोहीं केवळ। साधन ज्ञान ॥४३॥ हें इतुलेंचि नानापरी। निरूपिलें ग्रंथविस्तारीं। तें आतां दोहीं अक्षरीं। अनुवादावें ॥४४॥ म्हणौनि उपेयही हातीं। जाल्या उपायस्थिती। देव प्रवर्तलें तें पुढती। येणेंचि भावें ॥४५॥

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ ५६ ॥

मग म्हणे गा सुभटा। तो क्रमयोगी या निष्ठा। मी होऊनी होय पैठा। माझ्या रूपीं ॥४६॥ स्वकर्माच्या चोखौळीं। मज पूजा करूनि भली। तेणें प्रसादें आकळी। ज्ञाननिष्ठेतें ॥४७॥ ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ति माझी उल्लासे। तिया मजसी समरसें। सुखिया होय ॥४८॥ आणि विश्वप्रकाशितया। आत्मया मंज

आपुलिया। अनुसरे जो करूनियां। सर्वत्रता हे ॥४९॥ सांडूनि आपला आडळ। ल्वण आश्रयी जळ। का हिंडोनि राहे निश्चळ। वायु व्योमीं ॥१२५०॥ तैसा बुद्धी वाचा कायें। जो मातें आश्रऊनि ठाये। तो निषिद्धेंही विपायें। कर्मे करूं ॥५१॥ परी गंगेच्या संबंधीं। बिदी आणि महानदी। ऐक्य तेवीं माझ्या बोधीं। शुभाशुभांसी ॥५२॥ का बावनें आणि घुरें। हा निवाडु तंवचि सरे। जंव न घेपती वैश्वानरें। कवळूनि दोन्ही ॥५३॥ नाना पांचिकें आणि सोळें। हें सोनया तंवचि आलें। जंव परिसु आंगमेळें। एकवटीना ॥५४॥ तैसें शुभाशुभ ऐसें। हें तंवचिवरी आभासे। जंव येकु न प्रकाशें। सर्वत्र मी ॥५५॥ अगा रात्री आणि दिवो। हा तंवचि द्वैतभावो। जंव न रिगिजे गांवो। गभस्तीचा ॥५६॥ म्हणौनि माझिया भेटी। तयाचीं सर्व कर्मे किरीटी। जाऊनि बैसे तो पाटीं। सायुज्याच्या ॥५७॥ देशें काळें स्वभावें। वेंचु जया न संभवे। तें पद माझें पावे। अविनाश तो ॥५८॥ किंबहुना पंडुसुता। मज आत्मयाची प्रसन्नता। ल्महे तेणें न पविजतां। ल्पभु कवणु असे ॥५९॥

चेतसा सर्वकर्माणि मयि सन्न्यस्य मत्परः।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥५७॥

याकारणें गा तुवां इया। सर्व कर्मा आपुलिया। माझ्या स्वरूपीं धनंजया। संन्यासु कीजे ॥१२६०॥ परी तोचि संन्यासु वीरा। करणीयेचा झणें करा। आत्मविवेकीं धरा। चित्तवृत्ति हे ॥६१॥ मग तेणें विवेकबळें। आपणपें कर्माविगळें। माझ्या स्वरूपीं निर्मळे। देखिजेल ॥६२॥ आणि कर्माची जन्मभोये।

प्रकृति जे का आहे। ते आपणयाहूनि बहुवे। देखसी दूरीं ॥६३॥ तेथ प्रकृति आपणयां-। वेगळी नुरे धनंजया। रूपेंवीण का छाया। जयापरी ॥६४॥ ऐसेनि प्रकृतिनाशु। जाल्या कर्मसंन्यासु। निफजेल अनायासु। सकारणु ॥६५॥ मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरें आपणपयां। तेथ बुद्धि घापे करूनियां। पतिव्रता ॥६६॥ बुद्धि अनन्यें येणें योगें। मजमाजीं जैं रिगे। तैं चित्त चैत्यत्यागें। मातेंचि भजे ॥६७॥ ऐसें चैत्यजातें सांडिलें। चित्त माझ्या ठायीं जडलें। ठाके तैसें वहिलें। सर्वदा करी ॥६८॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि।
अथ चेत्त्वमहङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि॥५८॥

मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियांचि भरेल जेव्हां। माझा प्रसादु जाण तेव्हां। संपूर्ण जाहला ॥६९॥ तेथ सकळदुःखधामें। भुंजीजती जियें मृत्युजन्में। तियें दुर्गमेंचि सुगमें। होती तुज ॥१२७०॥ सूर्याचेनि सावायें। डोळा सावाइला होये। तैं आंधाराचा आहे। पाडु तया ॥७१॥ तैसा माझेनि प्रसादें। जीवकणु जयाचा उपमर्दे। तो संसाराचेनि बाधे। बागुलें केवीं ॥७२॥ म्हणौनि धनंजया। तूं संसारदुर्गती यया। तरसील माझिया। प्रसादास्तव ॥७३॥ अथवा हन अहंभावें। माझें बोलणें हें आघवें। कानामनाचिये शिंवे। नेदिसी टेंकों ॥७४॥ तरी नित्य मुक्त अव्ययो। तूं आहासि तें होऊनि वावो। देहसंबंधाचा घावो। वाजेल आंगीं ॥७५॥ जया देहसंबंधाआंतु। प्रतिपदीं आत्मघातु। भुंजतां उसंतु। कहींच नाहीं ॥७६॥ येवढेनि दारुणें। निमणेनवीण निमणें। पडेल जरी बोलणें। नेघसी माझें ॥७७॥

यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥

पथ्यद्वेषिया पोषी ज्वरु। कां दीपद्वेषिया अंधकारु। विवेकद्वेषें अहंकारु। पोषूनि तैसा ॥७८॥ स्वदेहा नाम अर्जुनु। परदेहा नाम स्वजनु। संग्रामा नाम मलिनु। पापाचारु ॥७९॥ इया मती आपुलिया। तिघां तीन नामें ययां। ठेऊनियां धनंजया। न जुंझें ऐसा ॥१२८०॥ जीवामाजीं निष्टंकु। करिसी जो आत्यंतिकु। तो वायां धाडील नैसर्गिकु। स्वभावोचि तुझा ॥८१॥ आणि मी अर्जुनु हे आत्मिक। ययां वधु करणें हें पातक। हें माया वांचूनि तात्त्विक। कांहीं आहे ॥८२॥ आधीं जुंझार तुवां होआवें। मग जुंझावया शस्त्र घेयावें। कां न जुंझावया करावें। देवांगण ॥८३॥ म्हणौनि न जुंझणें। म्हणसी तें वायाणें। ना मानूं लोकपणें। लोकदृष्टीही ॥८४॥ तऱ्ही न जुंझें ऐसें। निष्टंकिसी जें मानसें। तें प्रकृति अनारिसें। करवीलचि ॥८५॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा।

कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ ६० ॥

पैं पूर्वे वाहतां पाणी। पव्हिजे पश्चिमेचे वाहणीं। तरी आग्रहो उरे तें आणी। आपुलिया लेखा ॥८६॥ का साळीचा कणु म्हणे। मी नुगवें साळीपणें। तरी आहे आन करणें। स्वभावासी ॥८७॥ तैसा क्षात्रसंस्कारसिद्धा। प्रकृती घडिलासी प्रबुद्धा। आतां नुठी म्हणसी हा धांदा। परी उठविजसीचि तूं ॥८८॥ पैं शौर्य तेज दक्षता। एवमादिक पंडुसुता। गुण दिधले जन्मतां। प्रकृती तुज ॥८९॥ तरी तयांचिया समवाया-। अनुरूप धनंजया। न करितां उगलिया।

नयेल असों ॥१२९०॥ म्हणौनियां तिहीं गुणीं। बांधलासि तूं कोदंडपाणी। त्रिशुद्धी निघसी वाहणीं। क्षात्राचिया ॥९१॥ ना हें आपुलें जन्ममूळ। न विचारीतचि केवळ। न जुंझें ऐसें अढळ। व्रत जरी घेसी ॥९२॥ तरी बांधोनि हात पाये। जो रथीं घातला होये। तो न चले तरी जाये। दिगंता जेवीं ॥९३॥ तैसा तूं आपुलियाकडुनी। मी कांहींच न करीं म्हणौनी। ठासी परी भरंवसेनि। तूंचि करिसी ॥९४॥ उत्तरु वैराटींचा राजा। पळतां तूं कां निघालासि जुंझा। हा क्षात्रस्वभावो तुझा। जुंझवील तुज ॥९५॥ महावीर अकरा अक्षौहिणी। तुवां येकें नागविले रणांगणीं। तो स्वभावो कोदंडपाणी। जुंझवील तूतें ॥९६॥ हां गा रोगु कायी रोगिया। आवडे दरिद्र दरिद्रिया। परी भोगविजे बळिया। अदृष्टें जेणें ॥९७॥ तें अदृष्ट अनारिसें। न करील ईश्वरवशें। तो ईश्वरुही असे। हृदयीं तुझ्या ॥९८॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया॥ ६१॥

सर्व भूतांच्या अंतरीं। हृदयमहाअंबरीं। चिद्वृत्तीच्या सहस्त्रकरीं। उदयला असे जो॥९९॥ अवस्थात्रय तिन्ही लोक। प्रकाशूनि अशेख। अन्यथादृष्टि पांथिक। चेवविले॥१३००॥ वेद्योदकाच्या सरोवरीं। फांकतां विषयकल्हारीं। इंद्रियषट्पदाचारी। जीवभ्रमराते॥१॥ असो रूपक हें तो ईश्वरु। सकल भूतांचा अहंकारु। पांघरोनि निरंतरु। उल्हासत असे॥२॥ स्वमायेचें आडवस्त्र। लावूनि एकला खेळवी सूत्र। बाहेरी नटी छायाचित्र। चौऱ्याशीं लक्ष॥३॥ तया ब्रह्मादिकीटांता। अशेषाही भूतजातां। देहाकार योग्यता। पावोनि

दावी ॥४॥ तेथ जें देह जयापुढें। अनुरूपपणें मांडे। तें भूत तया आरूढे। हें मी म्हणौनि ॥५॥ सूत सूतें गुंतलें। तृण तृणेंचि बांधलें। का आत्मबिंबा घेतलें। बाळकें जळीं ॥६॥ तयापरी देहाकारें। आपणपेंचि दुसरें। देखोनि जीव आविष्करे। आत्मबुद्धी ॥७॥ ऐसेनि शरीराकारीं। यंत्रीं भूतें अवधारीं। वाहूनि हाल्वी दोरी। प्राचीनाची ॥८॥ तेथ जया जें कर्मसूत्र। मांडूनि ठेविलें स्वतंत्र। तें तिये गती पात्र। होंचि लागे ॥९॥ किंबहुना धनुर्धरा। भूतांतें स्वर्गसंसारा-। मांजी भोवंडी तृणें वारा। आकाशीं जैसी ॥१३१०॥ भ्रामकाचेनि संगें। जैसे लोहो वेढा रिगे। तैसीं ईश्वरसत्तायोगें। चेष्टती भूतें ॥११॥ जैसे चेष्टा आपुलिया। समुद्रादिक धनंजया। चेष्टती चंद्राचिया। सन्निधी येकी ॥१२॥ तया सिंधू भरितें दाटे। सोमकांत पाझरु फुटे। कुमुदांचकोरांचा फिटे। संकोचु तो ॥१३॥ तैसीं बीजप्रकृतिवशें। अनेकें भूतें येकें ईशें। चेष्टविजती तो असे। तुझ्या हृदयीं ॥१४॥ अर्जुनपण न घेतां। मी ऐसें जें पंडुसुता। उठतसे तें तत्त्वता। तयाचें रूप ॥१५॥ यालागीं तो प्रकृतीतें। प्रवर्तवील हें निरुतें। आणि जुंझवील तूतें। न जुंझसी जन्ही ॥१६॥ म्हणोनि ईश्वरु तो गोसावी। तेणें प्रकृती हे नेमावी। तिया सुखें राबवावीं। इंद्रिये आपुलीं ॥१७॥ तूं करणें न करणें दोन्ही। लाऊनि प्रकृतीच्या मानीं। प्रकृतीही का अधीनी। हृदयस्था जया ॥१८॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ६२ ॥

तया अहं वाचा चित्त आंग। देऊनियां शरण रिग। महोदधी का गांग। रिगालें जैसें ॥ १९ ॥ मग तयाचेनि प्रसादें। सर्वोपशांतिप्रमदे। कांतु होऊनियां स्वानंदें। स्वरूपींच रमसी ॥१३२० ॥ संभूति जेणें संभवे। विश्रांति जेथें विसंवे। अनुभूतिही अनुभवे। अनुभवा जया ॥ २१ ॥ तिये निजात्मपदींचा रावो। होऊनि ठाकसी अव्ययो। म्हणे लक्ष्मीनाहो। पार्था तूं गा ॥ २२ ॥

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥

हें गीतानाम विख्यात। सर्ववाङ्मयाचे मथित। आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय ॥२३ ॥ ज्ञान ऐसिया रूढी। वेदांतें जयाची प्रौढी। वानितां कीर्ति चोखडी। पातली जगीं ॥२४ ॥ बुद्ध्यादिकें डोळसें। हें जयाचें का कडवसें। मी सर्वद्रष्टाही दिसें। पाहला जया ॥२५ ॥ तें हें गा आत्मज्ञान। मज गोप्याचेंही गुप्त धन। परी तूं म्हणूनि आन। केवीं करूं ॥२६ ॥ याकारणें गा पांडवा। आम्हीं आपला हा गुह्य ठेवा। तुज दिधला कणवा। जाकळिलेपणें ॥२७ ॥ जैसी भुलली वोरसें। माय बोले बाळादोषें। प्रीति ही परी तैसें। न करूंचि हो ॥२८ ॥ येथ आकाश आणि गाळिजे। अमृताही साली फेडिजे। का दिव्याकरवीं करविजे। दिव्य जैसें ॥२९ ॥ जयाचेनि अंगप्रकाशें। पाताळींचा परमाणु दिसे। तया सूर्याहि का जैसें। अंजन सूदलें ॥१३३० ॥ तैसें सर्वज्ञेंही मियां। सर्वही निर्धारूनियां। निकें होय तें धनंजया। सांगितलें तुज ॥३१ ॥ आतां तूं ययावरी। निकें हें निर्धारीं। निर्धारूनि करीं। आवडे तैसें ॥३२ ॥ यया

देवाचिया बोला। अर्जुनु उगाचि ठेला। तेथ देवो म्हणती भला। अवंचकु होसी ॥३३॥ वाढितया पुढें भुकेला। उपरोधें म्हणे मी धाला। तैं तोचि पीडे आपुला। आणि दोषुही तया ॥३४॥ तैसा सर्वज्ञु श्रीगुरु। भेटलिया आत्मनिर्धारु। न पुसिजे जैं आभारु। धरूनियां ॥३५॥ तैं आपणपेंचि वंचे। आणि पापही वंचनाचें। आपणयाचि साचे। चुकविलें तेणें ॥३६॥ पैं उगेपणा तुझिया। हा अभिप्रावो कीं धनंजया। जें एकवेळ आवांकुनियां। सांगावें ज्ञान ॥३७॥ तेथ पार्थु म्हणे दातारा। भलें जाणसी माझिया अंतरा। हें म्हणों तरी दुसरा। जाणता असे काई ॥३८॥ येर ज्ञेय हें जी आघवें। तूं ज्ञाता एकचि स्वभावें। मा सूर्यु म्हणौनि वानावें। सूर्यातें काई ॥३९॥ या बोला श्रीकृष्णें। म्हणितलें काय येणें। हेंचि थोडें गा वानणें। जे बुझतासि तूं ॥१३४०॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ ६४ ॥

तरी अवधान पघळ। करूनियां आणिक एक वेळ। वाक्य माझें निर्मळ। अवधारीं पां ॥४१॥ हें वाच्य म्हणौनि बोलिजे। का श्राव्य मग आयिकिजे। तैसें नव्हे परी तुझें। भाग्य बरवें ॥४२॥ कूर्मीचिया पिलियां। दिठी पान्हा ये धनंजया। का आकाश वाहे बापिया। घरींचें पाणी ॥४३॥ जो व्यवहारु जेथ न घडे। तयाचें फळचि तेथ जोडे। काय दैवें न सांपडे। सानुकूळें ॥४४॥ एऱ्हवीं द्वैताची वारी। सारूनि ऐक्याच्या परिवरीं। भोगिजे तें अवधारीं। रहस्य हें ॥४५॥ आणि निरुपचारा प्रेमा। विषय होय जें प्रियोत्तमा।

तें दुजें नव्हे कीं आत्मा। ऐसेंचि जाणावें ॥४६॥ आरिसाचिया देखिलया। गोमटें कीजे धनंजया। तें तया नोहे आपणयां-। लगीं जैसें ॥४७॥ तैसें पार्था तुझेनि मिषें। मी बोलें आपणयाचि उद्देशें। माझ्या तुझ्या ठाईं असे। मीतूंपण गा ॥४८॥ म्हणौनि जिव्हारींचें गुज। सांगतसें जीवासि तुज। हें अनन्यगतीचें मज। आथी व्यसन ॥४९॥ पैं जळा आपणपें देतां। लवण भुललें पंडुसुता। कीं आघवें तयाचें होतां। न लजेचि तें ॥१३५०॥ तैसा तूं माझ्या ठाईं। राखों नेणसीचि कांहीं। तरी आतां तुज काई। गोप्य मी करूं ॥५१॥ म्हणौनि आघवींचि गूढें। जें पाऊनि अति उघडें। तें गोप्य माझें चोखडें। वाक्य आइक ॥५२॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ ६५ ॥

तरी बाह्य आणि अंतरा। आपुलिया सर्व व्यापारा। मज व्यापकातें वीरा। विषयो करीं ॥५३॥ आघवां आंगीं जैसा। वायु मिळोनि आहे आकाशा। तूं सर्व कर्मीं तैसा। मजसीचि अस ॥५४॥ किंबहुना आपुलें मन। करीं माझें एकायतन। माझेनि श्रवणें कान। भरूनि घालीं ॥५५॥ आत्मज्ञानें चोखडीं। संत जे माझीं रूपडीं। तेथ दृष्टि पडो आवडी। कामिनी जैसी ॥५६॥ मी सर्व वस्तीचें वसौटें। माझीं नामें जियें चोखटें। तियें जीवा यावया वाटे। वाचेचिये लवीं ॥५७॥ हाताचें करणें। का पायांचें चालणें। तें होय मजकारणें। तैसें करीं ॥५८॥ आपुला अथवा परावा। ठायीं उपकरसी पांडवा। तेणें यज्ञें होईं बरवा। याज्ञिकु माझा ॥५९॥

हें एकैक शिकऊं काई। पैं सेवकैं आपुल्या ठाईं। उरौनि येर सर्वही। मी सेव्यंचि करीं॥१३६०॥ तेथ जाऊनिया भूतद्वेषु। सर्वत्र नमवैन मीचि एकु। ऐसेनि आश्रयो आत्यंतिकु। ल्लहसी तूं माझा॥६१॥ मग भरलेया जगाआंतु। जाऊनि तिजयाची मातु। होऊनि ठायील एकांतु। आम्हां तुम्हां॥६२॥ तेव्हां भल्लतिये अवस्थे। मी तूंतें तूं मातें। भोगिसीं ऐसें आइतें। वाढेल सुख॥६३॥ आणि तिजें आडळ करितें। निमालें अर्जुना जेथें। तैं मीचि म्हणौनि तूं मातें। पावसी शेखीं॥६४॥ जैसी जळींची प्रतिभा। जळनाशीं बिंबा। येतां गाभागोभा। कांहीं आहे॥६५॥ पैं पवनु अंबरा। कां कल्लोळु सागरा। मिळतां आडवारा। कोणाचा गा॥६६॥ म्हणौनि तूं आम्हीं। हें दिसताहे देहधर्मीं। मग ययाच्या विरामीं। मीचि होसी॥६७॥ यया बोलामाझारीं। होय नव्हे झणें करीं। येथ आन आथी तरी। तुझीच जाण॥६८॥ पैं तुझी आण वाहणें। हें आत्मलिंगातें शिवणें। प्रीतीची जाति ल्लाजणें। आठवों नेदी॥६९॥ एऱ्हवीं वेदु निष्प्रपंचु। जेणें विश्वाभासु हा साचु। आज्ञेचा नटनाचु। काळातें जिणें॥१३७०॥ तो देवो मी सत्यसंकल्पु। आणि जगाच्या हितीं बापु। मा आणेचा आक्षेपु। कां करावा॥७१॥ परी अर्जुना तुझेनि वेधें। मियां देवपणाचीं बिरुदें। सांडिलीं गा मी हें आर्धे। सगळेनि तुवां॥७२॥ पैं काजा आपुलिया। रावो आपुली आपणया। आण वाहे धनंजया। तैसें हें कीं॥७३॥ तेथ अर्जुनु म्हणे देवें। अचाट हें न बोलावें। जे आमचें काज नांवें। तुझेनि एकें॥७४॥ यावरी सांगों बैससी। कां सांगतां भाषही

देसी। या तुझिया विनोदासी। पारु आहे जी॥७५॥ कमळवना विकाशु। करी रवीचा एक अंशु। तेथ आघवाचि प्रकाशु। नित्य देतो॥७६॥ पृथ्वी निवऊनि सागर। भरीजती येवढें थोर। वर्षे तेथ मिषांतर। चातकु कीं॥७७॥ म्हणौनि औदार्या तुझेया। मज निमित्त ना म्हणावया। प्राप्ति असे दानीं राया। कृपानिधी॥७८॥ तंव देवो म्हणती राहें। या बोलाचा प्रस्तावो नोहे। पैं मातें पावसी उपायें। साचचि येणें॥७९॥ सैंधव सिंधू पडलिया। जो क्षणु धनंजया। तेणें विरेचि कीं उरावया। कारण कायी॥१३८०॥ तैसें सर्वत्र मातें भजतां। सर्व मी होतां अहंता। निःशेष जाऊनि तत्त्वता। मीचि होसी॥८१॥ एवं माझिये प्राप्तीवरी। कर्मालागोनि अवधारीं। दाविली तुज उजरी। उपायांची॥८२॥ जे आधीं तंव पांडुसुता। सर्व कर्मे मज अर्पितां। सर्वत्र प्रसन्नता। लाहिजे माझी॥८३॥ पाठीं माझ्या इये प्रसादीं। माझें ज्ञान जाय सिद्धी। तेणें मिसळिजे त्रिशुद्धी। स्वरूपीं माझ्या॥८४॥ मग पार्था तिये ठायीं। साध्य साधन होये नाहीं। किंबहुना तुज कांहीं। उरेचि ना॥८५॥ तरी सर्व कर्मे आपुलीं। तुवां सर्वदा मज अर्पिलीं। तेणें प्रसन्नता लाधली। आजि हे माझी॥८६॥ म्हणौनि येणें प्रसादबळें। नव्हे झुंजाचेनि आडळे। न ठकेचि येकेवेळे। भाळलों तुज॥८७॥ जेणें सप्रपंच अज्ञान जाये। येकु मी गोचरु होये। तें उपपत्तीचेनि उपायें। गीतारूप हें॥८८॥ मियां ज्ञान तुज आपुलें। नानापरी उपदेशिलें। येणें अज्ञानजात सांडीं वियालें। धर्माधर्म जें॥८९॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥६६॥

आशा जैसी दुःखातें। व्याली निंदा दुरितें। हें असो जैसें दैन्यातें। दुर्भगत्व ॥१३९० ॥ तैसें स्वर्गनरकसूचक। अज्ञान व्यालें धर्मादिक। तें सांडूनि घाली अशेख। ज्ञानें येणें ॥९१ ॥ हातीं घेऊनि तो दोरु। सांडिजे जैसा सर्पाकारु। कां निद्रात्यागें घराचारु। स्वप्नींचा जैसा ॥९२ ॥ नाना सांडिलेनि कवळें। चंद्रींचें धुपे पिंवळें। व्याधित्यागें कडुवाळें-। पण मुखाचें ॥९३ ॥ अगा दिवसा पाठीं देऊनी। मृगजळ घापे त्यजुनी। कां काष्ठत्यागें वन्ही। त्यजिजे जैसा ॥९४ ॥ तैसें धर्माधर्माचें टवाळ। दावी अज्ञान जें कां मूळ। तें त्यजूनि त्यजीं सकळ। धर्मजात ॥९५ ॥ मग अज्ञान निमाल्लिया। मीचि येकु असें अपैसया। सनिद्र स्वप्न गेल्लिया। आपणपें जैसें ॥९६ ॥ तैसा मी एकवांचूनि कांहीं। मग भिन्नाभिन्न आन नाहीं। सोहंबोधें तयाच्या ठायीं। अनन्यु होय ॥९७ ॥ पैं आपलेनि भेदेंविण। माझें जाणिजें जें एकपण। तयाचि नांव शरण। मज येणें गा ॥९८ ॥ जैसे घटाचेनि नाशें। गगनीं गगन प्रवेशे। मज शरण येणें तैसें। ऐक्य करी ॥९९ ॥ सुवर्णमणि सोनया। ये कल्लोळु जैसा पाणिया। तैसा मज धनंजया। शरण ये तूं ॥१४०० ॥ वांचूनि सागराच्या पोटीं। वडवानळु शरण आला किरीटी। जाळूं न ठाके तया गोठी। वाळूनि दे पां ॥१ ॥ मजही शरण रिघिजे। आणि जीवत्वेंचि असिजे। धिग् बोल्ली ईया न ल्जे। प्रज्ञा केवीं ॥२ ॥ अगा प्राकृताही राया। आंगीं पडे जें धनंजया। तें दासिरूंही कीं तया। समान होय ॥३ ॥ मा मी विश्वेश्वरु भेटे। आणि जीवग्रंथी न सुटे। हे बोल नको बोखटे। कानीं ल्लऊं ॥४ ॥ म्हणौनि मी होऊनि मातें। सेवणें आहे आयितें। तें करीं हातां येतें। ज्ञानें येणें ॥५ ॥ मग ताकौनिया काढिलें।

ल्मेणी मागौतें ताकीं घातलें। परी न घेपेचि कांहीं केलें। तेणें जेवीं ॥६॥ ल्मेह उभें खाय माती। तें परिसाचिये संगती। सोनें जाल्या पुळती। न शिविजे मळें ॥७॥ हें असो काष्ठापासोनी। मथूनि घेतल्या वन्ही। मग काष्ठेंही कोंडोनि। न ठके जैसा ॥८॥ तैसें अद्वयत्वें मज। शरण रिघालिया तुज। धर्माधर्म हे सहज। ल्मगतील ना ॥९॥ अर्जुना काय दिनकरु। देखत आहे अंधारु। कीं प्रबोधीं होय गोचरु। स्वप्नभ्रमु ॥१४१०॥ तैसें मजसीं येकवटलेया। मी सर्वरूप वांचूनियां। आन कांहीं उरावया। कारण असे ॥११॥ म्हणौनि तयाचें कांहीं। चिंतींना आपुल्या ठाईं। तुझें पापपुण्य पाहीं। मीचि होईन ॥१२॥ जळीं पडिल्या ल्वणा। सर्वही जळ होय विचक्षणा। तुज मी अनन्यशरणा। होईन तैसा ॥१३॥ तेथ सर्वबंधलक्षणें। पापें उरावें दुजेपणें। तें माझ्या बोधीं वायाणें। होऊनि जाईल ॥१४॥ येतुलेनि आपैसया। सुटल्मचि आहासी धनंजया। घेईं मज प्रकाशोनियां। सोडवीन तूतें ॥१५॥ याकारणें पुढती। हें आधी न याहें चित्तीं। मज एकासि ये सुमती। जाणोनि शरण ॥१६॥ ऐसें सर्वरूपरूपसें। सर्वदृष्टिडोळसें। सर्वदेशनिवासें। बोलिलें श्रीकृष्णें ॥१७॥ मग सांवळा सकंकणु। बाहु पसरोनि दक्षिणु। आलिंगिल्म स्वशरणु। भक्तराजु तो ॥१८॥ न पवतां जयातें। काखे सूनि बुद्धीतें। बोलणें मागौतें। वोसरलें ॥१९॥ ऐसें जें कांहीं एक। बोल्म बुद्धीसीही अटक। तें द्यावया मिख। खेवाचें केलें ॥१४२०॥ हृदया हृदय येक जालें। ये हृदयींचें ते हृदयीं घातलें। द्वैत न मोडितां केलें। आपणाऐसें अर्जुना ॥२१॥ दीपें दीपु ल्मविल्म। तैसा परिष्वंगु तो जाल्म। द्वैत न मोडितां केल्म। आपणपें पार्थु ॥२२॥ तेव्हां सुखाचा मग तया। पूरु आल्म

जो धनंजया। तेथ वाडु तऱ्हीं बुडोनियां। ठेला देवो ॥२३॥ सिंधु सिंधूतें पावों जाये। तें पावणें ठाके दुणा होये। वरी रिगे पुरवणिये। आकाशही ॥२४॥ तैसें तया दोघांचें मिळणें। दोघां नावरे जाणावें कवणें। किंबहुना श्रीनारायणें। विश्व कोंदलें ॥२५॥ एवं वेदाचें मूळसूत्र। सर्वाधिकारैकपवित्र। श्रीकृष्णें गीताशास्त्र। प्रकट केलें ॥२६॥ येथ गीता मूळ वेदां। ऐसें पां केवीं आलें बोधा। हें म्हणाल तरी प्रसिद्धा। उपपत्ति सांगों ॥२७॥ तरी जयाच्या निश्वासीं। जन्म झालें वेदराशी। तो सत्यप्रतिज्ञ पैजेसीं। बोलिला स्वमुखें ॥२८॥ म्हणौनि वेदां मूळभूत। गीता म्हणों हें होय उचित। आणिकही येकी येथ। उपपत्ति असे ॥२९॥ जें न नशतु स्वरूपें। जयाचा विस्तारु जेथ ल्पे। तें तयाचें म्हणिपे। बीज जगीं ॥१४३०॥ तरी कांडत्रयात्मकु। शब्दराशी अशेखु। गीतेमाजीं असे रुखु। बीजीं जैसा ॥३१॥ म्हणौनि वेदाचें बीज। श्रीगीता होये हें मज। गमे आणि सहज। दिसतही आहे ॥३२॥ जे वेदाचे तिन्ही भाग। गीते उमटले असती चांग। भूषणरत्नीं सर्वांग। शोभलें जैसें ॥३३॥ तियेंचि कर्मादिकें तिन्हीं। कांडें कोणकोणे स्थानीं। गीते आहाति तें नयनीं। दाखऊं आईक ॥३४॥ तरी पहिला जो अध्यावो। तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो। द्वितीयीं सांख्यसद्भावो। प्रकाशिला ॥३५॥ मोक्षदानीं स्वतंत्र। ज्ञानप्रधान हें शास्त्र। येतुलालें दुजीं सूत्र। उभारिलें ॥३६॥ मग अज्ञानें बांधलेयां। मोक्षपदीं बैसावया। साधनारंभु तो तृतीया-। ध्यायीं बोलिला ॥३७॥ जे देहाभिमानबंधें। सांडूनि काम्यनिषिद्धें। विहित परी अप्रमादें। अनुष्ठावें ॥३८॥ ऐसेनि सद्भावें कर्म करावें। हा तिजा अध्यावो जो देवें। निर्णय केला ते जाणावें। कर्मकांड

येथ ॥३९॥ आणि तेंचि नित्यादिक। अज्ञानाचें आवश्यक। आचरतां मोचक। केवीं होय पां ॥१४४०॥ ऐसी अपेक्षा जालिया। बद्ध मुमुक्षुते आलिया। देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया। सांगितली ॥४१॥ जे देहवाचामानसें। विहित निपजे जें जैसें। तें एक ईश्वरोद्देशें। कीजे म्हणितलें ॥४२॥ हेंचि ईश्वरीं कर्मयोगें। भजनकथनाचें खागें। आदरिलें शेषभागें। चतुर्थाचेनी ॥४३॥ तें विश्वरूप अकरावा। अध्यावो संपे जंव आघवा। तंव कर्में ईशु भजावा। हें जें बोलिलें ॥४४॥ तें अष्टाध्यायीं उघड। जाण येथें देवताकांड। शास्त्र सांगतसे आड। मोडूनि बोलें ॥४५॥ आणि तेणेंचि ईशप्रसादें। श्रीगुरुसंप्रदायलब्धें। साच ज्ञान उद्बोधे। कोंवळें जें ॥४६॥ तें अद्वेष्टादिप्रभृतिकीं। अथवा अमानित्वादिकीं। वाढविजे म्हणोनि लेखीं। बारावा गणूं ॥४७॥ तो बारावा अध्याय आदी। आणि पंधरावा अवधी। ज्ञानफळपाकसिद्धि। निरूपणासी ॥४८॥ म्हणौनि चहूंही इहीं। ऊर्ध्वमूळांतीं अध्यायीं। ज्ञानकांड ये ठायीं। निरूपिजे ॥४९॥ एवं कांडत्रयनिरूपणी। श्रुतीचि हे कोडिसवाणी। गीतापद्यरत्नांचीं लेणीं। लेयिली आहे ॥१४५०॥ हें असो कांडत्रयात्मक। श्रुति मोक्षरूप फळ येक। खोभावे जें आवश्यक। ठाकावें म्हणौनि ॥५१॥ तयाचेनि साधनज्ञानेंसीं। वैर करी जो प्रतिदिवशीं। तो अज्ञानवर्ग षोडशीं। प्रतिपादिजे ॥५२॥ तोचि शास्त्राचा बोळावा। घेवोनि वैरी जिणावा। हा निरोपु तो सतरावा। अध्याय येथ ॥५३॥ ऐसा प्रथमाल्रगोनी। सतरावा लर्णीं करूनी। आत्मनिश्वास विवरूनि। दाविला देवें ॥५४॥ तया अर्थजाता अशेषा। केला तात्पर्याचा आवांका। तो हा अठरावा देखा। कळशाध्यायो ॥५५॥ एवं

सकळसांख्यसिंधु। श्रीभगवद्गीताप्रबंधु। हा औदार्यें आगळा वेदु। मूर्तु जाण ॥५६॥ वेदु संपन्नु होय ठाईं। परी कृपणु ऐसा आनु नाहीं। जे कानीं लागला तिहीं। वर्णांच्याचि ॥५७॥ येरां भवव्यथा ठेलियां। स्त्रीशूद्रादिकां प्राणियां। अनवसरू मांडूनियां। राहिला आहे ॥५८॥ तरी मज पाहतां तें मागील उणें। फेडावया गीतापणें। वेदु वेठला भलतेणें। सेव्य होआवया॥ ५९॥ नव्हे अर्थे रिगोनि मनीं। श्रवणें लागोनि कानीं। जपमिषें वदनीं। वसोनियां॥ १४६०॥ ये गीतेचा पाठु जो जाणे। तयाचेनि सांगातीपणें। गीता लिहोनि वाहाणें। पुस्तकमिषें॥ ६१॥ ऐसैसा मिसकटा। संसाराचां चोहटां। गवादी घालीत चोखटा। मोक्षसुखाची॥ ६२॥ परी आकाशीं वसावया। पृथ्वीवरी बैसावया। रविदीप्ती राहाटावया। आवारु नभ॥ ६३॥ तेवीं उत्तम अधम ऐसें। सेवितां कवणातेंही न पुसे। कैवल्यदानें सरिसें। निववीत जगा॥६४॥ यालागीं मागिली कुटी। भ्याला वेदु गीतेच्या पोटीं। रिगाला आतां गोमटी। कीर्ति पातला॥ ६५॥ म्हणौनि वेदाची सुसेव्यता। ते हे मूर्त जाण श्रीगीता। श्रीकृष्णें पांडुसुता। उपदेशिली॥६६॥ परी वत्साचेनि वोरसें। दुभतें होय घरोद्देशें। जालें पांडवाचेनि मिषें। जगदुद्धरण॥६७॥ चातकाचिये कणवे। मेघु पाणियेसिं धांवे। तेथ चराचर आघवें। निवालें जेवीं॥६८॥ कां अनन्यगतीकमळा-। लागीं सूर्य ये वेळोवेळां। कीं सुखिया होइजे डोळां। त्रिभुवनींचां॥६९॥ तैसें अर्जुनाचेनि व्याजें। गीता प्रकाशूनि श्रीराजें। संसाराएवढें थोर ओझें। फेडिलें जगाचें॥१४७०॥ सर्वशास्त्ररत्नदीप्ती। उजळिता हा त्रिजगती। सूर्यु

नव्हे लक्ष्मीपती-। वक्त्राकाशींचा ॥७१॥ बाप कुळ तें पवित्र। जेथिंचा पार्थु या ज्ञाना पात्र। जेणें गीता केलें स्वतंत्र। आवारु जगा ॥७२॥ हें असो मग तेणें। सद्गुरुश्रीकृष्णें। पार्थाचें भिसळणें। आणिलें द्वैता ॥७३॥ पाठीं म्हणतसे पांडवा। शास्त्र हें मानलें कीं जीवा। तेथ येरु म्हणे देवा। आपुलिया कृपा ॥७४॥ तरी निधान जोडावया। भाग्य घडे गा धनंजया। परि जोडिलें भोगावया। विपायें होय ॥७५॥ पैं क्षीरसागरायेवढें। अविरजी दुधाचें भांडें। सुरां असुरां केवढें। मथितां जालें ॥७६॥ ते सायासही फळा आले। जें अमृतही डोळां देखिलें। परी वरिलें चुकले। जतने ते ॥७७॥ तेथ अमरत्वा वोगरिलें। तें मरणाचिलागीं जालें। भोगों नेणतां जोडले। ऐसें आहे ॥७८॥ नहुषु स्वर्गाधिपति जाहला। परी राहाटीं भांबावला। तो भुजंगत्व पावला। नेणासी कायी ॥७९॥ म्हणौनि बहुत पुण्य तुवां। केलें तेणें धनंजया। आजि शास्त्रराजा इया। जालासि विषयो ॥१४८०॥ तरी ययाचि शास्त्राचेनी। संप्रदायें पांघुरौनी। शास्त्रार्थु हा निकेनी। अनुष्ठीं हो ॥८१॥ एऱ्हवीं अमृतमंथना-। सारिखें होईल अर्जुना। जरी रिघसी अनुष्ठाना। संप्रदायेंवीण ॥८२॥ गाय धड जोडे गोमटी। ते तैंचि पिवों ये किरीटी। जैं जाणिजे हातवटी। सांजवणीची ॥८३॥ तैसा गुरु प्रसन्नु होये। शिष्य विद्याही कीर लाहे। परी ते फळे संप्रदायें। उपासिलिया ॥८४॥ म्हणौनि शास्त्रीं जो इये। उचितु संप्रदायो आहे। तो ऐक आतां बहुवें। आदिरेंसी ॥८५॥

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।

न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ ६७ ॥

तरी तुवां हें जें पार्था। गीताशास्त्र लाधलें आस्था। तें तपोहीना सर्वथा। सांगावें ना हो ॥८६ ॥ अथवा तापसुही जाला। परी गुरुभक्ती जो ढिला। तो वेदीं अंत्यजु वाळिला। तैसा वाळी ॥८७॥ नातरी पुरोडाशु जैसा। न घापे वृद्ध तरी वायसा। गीता नेदी तैसी तापसा। गुरुभक्तिहीना ॥८८ ॥ का तपही जोडे देहीं। भजे गुरुदेवांच्या ठायीं। परी आकर्णनीं नाहीं। चाड जरी ॥८९ ॥ तरी तो मागील दोहीं आंगीं। उत्तम होय कीर जगीं। परी या श्रवणालागीं। योग्यु नोहे ॥१४९० ॥ मुक्ताफळ भलतैसें। हो परी मुख नसे। तंव गुण प्रवेशे। तेथ कायी ॥९१ ॥ सागरु गंभीरु होये। हें कोण ना म्हणत आहे। परी वृष्टि वायां जाये। जाली तेथ ॥९२ ॥ धाल्यिा दिव्यान्न सुवावें। मग जें वायां धाडावें। तें आर्ती कां न करावें। उदारपण ॥९३ ॥ म्हणौनि योग्य भलतैसें। होतु परी चाड नसे। तरी झणें वानिवसें। देसी हें तयां ॥९४॥ रूपाचा सुजाणु डोळा। वोडवूं ये कायि परिमळा। जेथ जें माने सें फळा। तेथचि ये गा ॥९५ ॥ म्हणौनि तपी भक्ति। पाहावे ते सुभद्रापति। परी शास्त्रश्रवणीं अनासक्ति। वाळावेचि ते ॥९६ ॥ नातरी तपभक्ति। होऊनि श्रवणीं आर्ति। आथी ऐसीही आयती। देखसी जरी ॥९७॥ तरी गीताशास्त्रनिर्मिता। जो मी सकळलोकशास्ता। तया मातें सामान्यता। बोलेल जो ॥९८ ॥ माझ्या सज्जनेंसिं मातें। पैशून्याचेनि हाते। येक आहाती तयांतें। योग्य न म्हण ॥९९ ॥ तयांची येर आघवी। सामग्री ऐसी

जाणावी। दीपेंवीण ठाणदिवी। रात्रीची जैसी॥१५००॥ अंग गोरें आणि तरुणें। वरि लेइलें आहे लेणें। परी येकलेनि प्राणें। सांडिलें जेवीं॥१॥ सोनयाचें सुंदर। निर्वाळिलें होय घर। परी सर्पांगना द्वार। रुंधलें आहे॥२॥ निपजे दिव्यान्न चोखट। परी माजीं असे काळकूट। असो मैत्री कपट-। गर्भिणी जैसी॥३॥ तैसी तपभक्तिमेधा। तयाची जाण प्रबुद्धा। जो माझियांची कां निंदा। माझीचि करी॥४॥ याकारणें धनंजया। तो भक्तु मेधावी तपिया। तरी नको बापा इया। शास्त्रा आतळों देवों॥५॥ काय बहु बोलों निंदका। योग्य स्रष्ट्याहीसारिखा। गीता हे कवतिका। लागींही नेदी॥६॥ म्हणौनि तपाचा धनुर्धरा। तळीं दाटोनि गाडोरा। वरी गुरुभक्तीचा पुरा। प्रासादु जो जाला॥७॥ आणि श्रवणेच्छेचा पुढां। दारवंटा सदा उघडा। वरी कलशु चोखडा। अनिंदारत्नांचा॥८॥

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः॥६८॥

ऐशा भक्तालयीं चोखटीं। गीतारत्नेश्वरु हा प्रतिष्ठीं। मग माझिया संवसाटी। तुकसी जगीं॥९॥ का जे एकाक्षरपणेंसीं। त्रिमात्रकेचिये कुशीं। प्रणवु होतां गर्भवासीं। सांकडला॥१५१०॥ तो गीतेचिया बाहळीं। वेदबीज गेलें पाहाळीं। कीं गायत्री फुली फळीं। श्लोकांच्या आली॥११॥ ते हे मंत्ररहस्य गीता। मेळवी जो माझिया भक्तां। अनन्यजीवना माता। बाळका जैसी॥१२॥ तैसी भक्तां गीतेसीं। भेटी करी आदरेंसीं। तो देहापाठीं मजसीं। येकचि

होय ॥१३॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि॥ ६९॥

आणि देहाचेंही लेणें। लेऊनि वेगळेपणें। असे तंव जीवेंप्राणें। तोचि पढिये ॥१४॥ ज्ञानियां कर्मठां तापसां। यया खुणेचिया माणुसां-। माजीं तो एकु गा जैसा। पढिये मज ॥१५॥ तैसा भूतळीं आघवा। आन न देखें पांडवा। जो गीता सांगे मेळावा। भक्तजनांचा ॥१६॥ मज ईश्वराचेनि लोभें। हे गीता पढतां अक्षोभें। जो मंडन होय सभे। संतांचिये ॥१७॥ नवपल्लवीं रोमांचितु। मंदानिळें कांपवितु। आमोदजळें वोलवितु। फुलांचे डोळे ॥१८॥ कोकिळाकलरवाचेनि मिषें। सद्गद बोलवीत जैसें। वसंत का प्रवेशे। मद्भक्तआरामीं ॥१९॥ का जन्माचें फळ चकोरां। होतु चंद्र ये अंबरा। नाना नवघन मयूरां। वो देत पावे ॥१५२०॥ तैसा सज्जनांच्या मेळापीं। गीतापद्यरत्नीं उमपीं। वर्षे जो माझ्या रूपीं। हेतु ठेऊनि ॥२१॥ मग तयाचेनि पाडें। पढियंतें मज फुडें। नाहींचि गा मागेंपुढें। न्याहाळितां ॥२२॥ अर्जुना हा ठायवरी। मी तयातें सूयें जिव्हारीं। जो गीतार्थाचें करी। परगुणें संतां ॥२३॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः॥ ७०॥

पैं माझिया तुझिया मिळणीं। चाळीनली जे हे कहाणी। मोक्षधर्म का जिणीं। आलासे जेथें ॥२४॥ तो हा सकळार्थप्रबोधु। आम्हां दोघांचा संवादु। न करितां पदभेदु। पाठेंचि जो पढे ॥२५॥

तेणें ज्ञानानळीं प्रदीप्तीं। मूळ अविद्येचिया आहुती। तोषविला होय सुमती। परमात्मा मी ॥२६॥ घेऊनि गीतार्थ उगाणा। ज्ञानिये जें विचक्षणा। ठाकिती तें गाणावाणा। गीतेचा तो लाहे ॥२७॥ गीतापाठकासि असे। फळ अर्थज्ञाचि सरिसें। गीतामाउलियेसि कीं नसे। जाणें तान्हें ॥२८॥

श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥ ७१ ॥

आणि सर्वमार्गीं निंदा। सांडूनि आस्था पैं शुद्धा। गीताश्रवणीं श्रद्धा। उभारी जो ॥२९॥ तयाच्या श्रवणपुटीं। गीतेचीं अक्षरें जंव पैठीं। होतीना तंव उठाउठीं। पळेचि पाप ॥१५३०॥ अटवियेमाजीं जैसा। वन्हि रिघतां सहसा। लंघिती का दिशा। वनौकें तियें ॥३१॥ का उदयाचळकुळीं। झळकतां अंशुमाळी। तिमिरें अंतराळीं। हारपती ॥३२॥ तैसा कानाच्या महाद्वारीं। गीता गजर जेथ करी। तेथ सृष्टीचिये आदीवरी। जायचि पाप ॥३३॥ ऐसी जन्मवेली धुवट। होय पुण्यरूप चोखट। याहीवरी अचाट। लाहे फळ ॥३४॥ जे इयें गीतेचीं अक्षरें। जेतुलीं का कर्णद्वारें। रिघती तेतुले होती पुरे। अश्वमेध कीं ॥३५॥ म्हणौनि श्रवणें पापें जाती। आणि धर्म धरी उन्नती। तेणें स्वर्गराज्यसंपत्ति। लाहेचि शेखीं ॥३६॥ तो पैं मज यावयालागीं। पहिलें पेणें करी स्वर्गीं। मग आवडे तंव भोगी। पाठीं मजचि मिळे ॥३७॥ ऐसी गीता धनंजया। ऐकतया आणि पढतया। फळे महानंदें मियां। बहु काय बोलों ॥३८॥ याकारणें हें असो। परी जयालागीं शास्त्रातिसो। केला तें तंव तुज पुसों।

काज तुझें ॥३९॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा।
कच्चिदज्ञानसम्मोहः प्रनष्टस्ते धनञ्जय ॥७२॥

तरी सांग पां पांडवा। हा शास्त्रसिद्धांतु आघवा। तुज एकचित्तें फावा। गेला आहे ॥१५४०॥ आम्हीं जैसें जया रीती। उगाणिलें कानांच्या हातीं। येरीं तैसेंचि तुझ्या चित्तीं। पैठें केलें कीं ॥४१॥ अथवा माझारीं। गेलें सांडिविखुरी। किंवा उपेक्षेवरी। वाळूनि सांडिलें ॥४२॥ जैसें आम्हीं सांगितलें। तैसेंचि हृदयीं पावलें। तरी सांग पां वहिलें। पुसेन तें मी ॥४३॥ तरी स्वाज्ञानजनितें। मागिलें मोहें तूतें। भुलविलें तो येथें। असे कीं नाहीं ॥४४॥ हें बहु पुसो काई। सांगें तूं आपल्या ठाईं। कर्माकर्म कांहीं। देखतासी ॥४५॥ पार्थु स्वानंदैकरसें। विरेल ऐसा भेददशे। आणिला येणें मिषें। प्रश्नाचेनि ॥४६॥ पूर्णब्रह्म जाला पार्थु। तरी पुढील साधावया कार्यार्थु। मर्यादा श्रीकृष्णनाथु। उल्लंघों नेदी ॥४७॥ एऱ्हवीं आपुलें करणें। सर्वज्ञ काय तो नेणे। परी केलें पुसणें। याचिलागीं ॥४८॥ एवं करोनियां प्रश्न। नसतेंचि अर्जुनपण। आणूनियां जालें पूर्णपण। तें बोलवी स्वयें ॥४९॥ मग क्षीराब्धीतें सांडितु। गगनीं पुंजुमंडितु। निवडे जैसा न निवडितु। पूर्णचंद्र ॥१५५०॥ तैसा ब्रह्म मी हें विसरे। तेथ जगचि ब्रह्मत्वें भरे। हेंही सांडी तरी विरे। ब्रह्मपणही ॥५१॥ ऐसा मोडतु मांडतु ब्रह्में। तो दुःखें देहाचिये सीमे। मी अर्जुन येणें नामें। उभा ठेला ॥५२॥ मग कापतां करतळीं। दडपूनि रोमावळी। पुलिका

स्वेदजळीं। जिरुऊनियां ॥५३॥ प्राणक्षोभें डोलतया। आंगा आंगचि टेंकया। सूनि स्तंभु चाळया। भुलौनियां ॥५४॥ नेत्रयुगुळाचेनि वोतें। आनंदामृताचें भरितें। वोसंडत तें मागुतें। काढूनियां ॥५५॥ विविधा औत्सुक्यांची दाटी। चीप दाटत होती कंठीं। ते करूनियां पैठी। हृदयामाजीं ॥५६॥ वाचेचें वितुळणें। सांवरूनि प्राणें। अक्रमाचें श्वसणें। ठेऊनि ठायीं ॥५७॥

अर्जुन उवाच

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव॥७३॥

मग अर्जुन म्हणे काय देवो। पुसताति आवडे मोहो। तरी तो सकुटुंब गेला जी ठावो। घेऊनि आपला ॥५८॥ पासीं येऊनि दिनकरें। डोळ्यातें आंधारें। पुसिजे हें कायि सरे। कोणे गांवीं ॥५९॥ तैसा तूं श्रीकृष्णराया। आमुचिया डोळ्यां। गोचर हेंचि कायिसया। न पुरे तंव ॥१५६०॥ वरी लोभें मायेपासूनी। तें सांगसी तोंड भरूनी। जें कायिसेनिही करूनी। जाणूं नये ॥६१॥ आतां मोह असे कीं नाहीं। हें ऐसें जी पुससी काई। कृतकृत्य जाहलों पाहीं। तुझेपणें ॥६२॥ गुंतलों होतों अर्जुनगुणें। तो मुक्त जालों तुझेपणें। आतां पुसणें सांगणें। दोन्ही नाहीं ॥६३॥ मी तुझेनि प्रसादें। लाधलेनि आत्मबोधें। मोहाचे तया कांदे। नेदीच उरों ॥६४॥ आतां करणें का न करणें। हें जेणें उठी दुजेपणें। तें तूं वांचूनि नेणें। सर्वत्र गा ॥६५॥ येविषयीं माझ्या ठायीं। संदेहाचें नुरेचि कांहीं। त्रिशुद्धी कर्म जेथ नाहीं। तें मी जालों ॥६६॥ तुझेनि मज

मी पावोनी। कर्तव्य गेलें निपटूनी। परी आज्ञा तुझी वांचोनी। आन नाहीं प्रभो ॥६७॥ कां जें दृश्य दृश्यातें नाशी। जें दुजें द्वैतातें ग्रासी। जें एक परी सर्वदेशीं। वसवी सदा॥६८॥ जयाचेनि संबंधें बंधु फिटे। जयाचिया आशा आस तुटे। जें भेटल्या सर्व भेटे। आपणपांचि॥६९॥ तें तूं गुरुलिंग जी माझें। जें थेंकलेपणींचें विरजें। जयालागीं वोलांडिजे। अद्वैतबोधु॥१५७०॥ आपणचि होऊनि ब्रह्म। सारिजे कृत्याकृत्यांचें काम। मग कीजे का निःसीम। सेवा जयाची॥७१॥ गंगा सिंधु सेवूं गेली। पावतांचि समुद्र जाली। तेवीं भक्तां सेल दिधली। निजपदाची॥७२॥ तो तूं माझा जी निरुपचारु। श्रीकृष्णा सेव्य सद्गुरु। मा ब्रह्मतेचा उपकारु। हाचि कां मानी॥७३॥ जें मज तुम्हां आड। होतें भेदाचें कवाड। तें फेडोनि केलें गोड। सेवासुख॥७४॥ तरी आतां तुझी आज्ञा। सकळदेवाधिदेवराज्ञा। करीन देईं अनुज्ञा। भलतियेविषयीं॥७५॥ यया अर्जुनाचिया बोला। देवो नाचे सुखें भुलला। म्हणे विश्वफळा जाला। फळ हा मज॥७६॥ उणेनि उमचला सुधाकरु। देखुनी आपला कुमरु। मर्यादा क्षीरसागरु। विसरेचिना॥७७॥ ऐसें संवादाचां बहुलां। लग्न दोघांचिया आंतुला। लागलें देखोनि जाला। निर्भरु संजयो॥७८॥ तेणें उचंबळलेपणें। संजय धृतराष्ट्रातें म्हणें। जी कैसें बादरायणें। रक्षिलें दोघे॥७९॥ आजि तुमतें अवधारा। नाहीं चर्मचक्षूही संसारा। कीं ज्ञानदृष्टिव्यवहारा। आणिलेंती॥१५८०॥ आणि रथींचिये राहाटी। घेईजो घोडेयासाठीं। तया आम्हां या गोष्टी। गोचरा होती॥८१॥ वरी जुंझाचें निर्वाण।

मांडलें असे दारुण। दोहीं हारीं आपण। हारपिजे जैसें ॥८२॥ येवळा जिये सांकडां। कैसा अनुग्रहो पैं गाढा। जे ब्रह्मानंदु उघडा। भोगवीतसे ॥८३॥ ऐसें संजय बोलिला। परी न द्रवे येरु उगला। चंद्रकिरणीं शिवतला। पाषाणु जैसा ॥८४॥ हे देखोनि तयाची दशा। मग करीचि ना सरिसा। परी सुखें जाला पीसा। बोलतसे ॥८५॥ भुलविला हर्षवेगें॥ म्हणौनि धृतराष्ट्रा सांगें। एऱ्हवीं नव्हे तयाजोगें। हें कीर जाणे ॥८६॥

सञ्जय उवाच

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः।
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥७४॥

मग म्हणे पैं कुरुराजा। ऐसा भ्रातृपुत्र तो तुझा। बोलिला तें अधोक्षजा। गोड जालें ॥८७॥ अगा पूर्वापर सागर। हा नामासीचि सिनार। येर आघवें तें नीर। एक जैसें ॥८८॥ तैसा श्रीकृष्ण पार्थ ऐसें। हें आंगाचिपासीं दिसे। मग संवादीं जी नसे। कांहींचि भेदु ॥८९॥ पैं दर्पणाहूनि चोखें। दोन्ही होती सन्मुखें। तेथ येरीं येर देखे। आपणपें जैसें ॥१५९०॥ तैसा देवेंसीं पंडुसुतु। आपणपें देवीं देखतु। पांडवेंसीं देखे अनंतु। आपणपें पार्थीं ॥९१॥ देवो देवभक्तालागीं। जिये विवरू देखे आंगीं। येरुही तियेची भागीं। दोन्ही देखे ॥९२॥ आणिक कांहींच नाहीं। म्हणौनि करिती काई। दोघे एकपणें पाहीं। नांदताती ॥९३॥ आतां भेदु जरी मोडे। तरी प्रश्नोत्तर का घडे। ना भेदुचि तरी जोडे। संवादसुख कां ॥९४॥ ऐसें बोलतां दुजेपणें। संवादीं द्वैत गिळणें। तें ऐकिलें

बोलणें। दोघांचें मियां ॥९५॥ उटूनि दोन्ही आरसे। वोडविलीया सरिसे। कोण कोणा पाहातसे। कल्पावें पां ॥९६॥ का दीपासन्मुखु। ठेविल्या दीपकु। कोण कोणा अर्थिकु। कोण जाणे ॥९७॥ नाना अर्कापुढें अर्कु। उदयल्या आणिकु। कोण म्हणे प्रकाशकु। प्रकाश्य कवण ॥९८॥ हें निर्धारूं जातां फुडें। निर्धारासि ठक पडे। ते दोघे जाले येवढे। संवादें सरिसे ॥९९॥ जी मिळतां दोन्ही उदकें। माजीं लवण वारूं ठाके। कीं तयासींही निमिखें। तेंचि होय ॥१६००॥ तैसे श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही। संवादलें तें मनीं। धरितां मजही वानी। तेचि होतसे ॥१॥ ऐसें म्हणे ना मोटकें। तंव हिरोनि सात्त्विकें। आठव नेला नेणों कें। संजयपणाचा ॥२॥ रोमांच जंव फरके। तंव तंव आंग सुरके। स्तंभ स्वेदातें जिंके। एकला कंपु ॥३॥ अद्वयानंदस्पर्शे। दिठी रसमय जाली असे। ते अश्रु नव्हती जैसें। द्रवत्वचि ॥४॥ नेणों काय न माय पोटीं। काय नेणों गुंफे कंठीं। वागर्था पडत मिठी। उससांचिया ॥५॥ किंबहुना सात्त्विकां आठां। चाचरु मांडतां उमेठा। संजयो जालासे चोहटा। संवादसुखाचा ॥६॥ तया सुखाची ऐसी जाती। जे आपणचि धरी शांती। मग पुढती देहस्मृती। लाधली तेणें ॥७॥

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम्।
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयत: स्वयम् ॥७५॥

तेव्हां बैसतेनि आनंदें। म्हणें जी जें उपनिषदें। नेणती तें व्यासप्रसादें। ऐकिलें मियां ॥८॥ ऐकतांचि ते गोठी। ब्रह्मत्वाची पडिली मिठी। मीतूंपणेंसीं दिठी। विरोनि गेली ॥९॥ हे आवघेचि

का योग। जया ठाया येती मार्ग। तयाचें वाक्य सवंग। केलें मज व्यासें ॥१६१०॥ अहो अर्जुनाचेनि मिषें। आपणपेंचि दुजें ऐसें। नटोनि आपणया उद्देशें। बोल्लिले जें देव ॥११॥ तेथ कीं माझे श्रोत्र। पाटाचे जाले जी पात्र। काय वानूं स्वतंत्र। सामर्थ्य गुरूचें ॥१२॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम्।
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥७६॥

राया हें बोलतां विस्मित होये। तेणेंचि मोडावला ठाये। रत्नीं कीं रत्नकिळा ये। झांकोळित जैसी ॥१३॥ हिमवंतींचीं सरोवरें। चंद्रोदयीं होती काश्मीरें। मग सूर्यागमीं माघारें। द्रवत्व ये ॥१४॥ तैसा शरीराचिया स्मृती। तो संवादु संजय चित्तीं। धरी आणि पुढती। तेंचि होय ॥१५॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः।
विस्मयो मे महान्राजन्हृष्यामि च पुनः पुनः ॥७७॥

मग उठोनी म्हणे नृपा। श्रीहरीचिया विश्वरूपा। देखिलया उगा कां पां। असों लाहासी ॥१६॥ न देखणेनि जें दिसे। नाहींपणेंचि जें असे। विसरें आठवे तें कैसें। चुकवूं आतां ॥१७॥ देखोनि चमत्कारु। कीजे तो नाहीं पैसारु। मजहीसकट महापुरु। नेत आहे ॥१८॥ ऐसा श्रीकृष्णार्जुन-। संवादसंगमीं स्नान। करूनि देतसे तिळदान। अहंतेचें ॥१९॥ तेथ असंवरें आनंदें। अलौकिककही कांहीं स्फुंदे। श्रीकृष्ण म्हणे सद्गदें। वेळोवेळां ॥१६२०॥ या अवस्थांची कांहीं। कौरवातें परी नाहीं। म्हणौनि रायें तें कांहीं। कल्पावें जंव ॥२१॥ तंव जाला सुखलाभु। आपणपां करूनि

स्वयंभु। बुझाविला अवष्टंभु। संजयें तेणें ॥२२॥ तेथ कोणी येकी अवसरी। होआवी ते करूनि दुरी। रावो म्हणे संजया परी। कैशी तुझी गा ॥२३॥ तेणें तूंतें येथें व्यासें। बैसविलें कासया उद्देशें। अप्रसंगामाजीं ऐसें। बोल्सी काई ॥२४॥ रानींचें राऊळा नेलिया। दाही दिशा मानी सुनिया। कां रात्री होय पाहल्या। निशाचरां ॥२५॥ जो जेथिंचें गौरव नेणे। तयासि तें भिंगुळवाणें। म्हणौनि अप्रसंगु तेणें। म्हणावा कीं तो ॥२६॥ मग म्हणे सांगें प्रस्तुत। उदयलेंसे जें उत्कळित। तें कोणासि बा रे जैत। देईल शेखीं ॥२७॥ एऱ्हवीं विशेषें बहुतेक। आमुचें ऐसें मानसिक। जे दुर्योधनाचें अधिक। प्रताप सदा ॥२८॥ आणि येरांचेनि पाडें। दळही यांचें देव्हडें। म्हणौनि जैत फुडें। आणील ना तें ॥२९॥ आम्हां तंव गमे ऐसें। मा तुझें जोतीष कैसें। तें नेणों संजया असे। तैसें सांग प्रां ॥१६३०॥

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥

यया बोला संजयो म्हणे। जी येरयेरांचें मी नेणें। परी आयुष्य तेथें जिणें। हें फुडें कीं गा ॥३१॥ चंद्र तेथें चंद्रिका। शंभु तेथें अंबिका। संत तेथें विवेका। असणें कीं जी ॥३२॥ रावो तेथें कटक। सौजन्य तेथें सोइरीक। वन्हि तेथें दाहक। सामर्थ्य कीं ॥३३॥ दया तेथें धर्मु। धर्मु तेथें सुखागमु। सुखीं पुरुषोत्तमु। असे जैसा ॥३४॥ वसंत तेथें वनें। वन तेथ सुमनें। सुमनीं पालिंगनें। सारंगांचीं ॥३५॥ गुरु तेथ ज्ञान। ज्ञानीं आत्मदर्शन। दर्शनीं समाधान। आथी जैसें ॥३६॥ भाग्य तेथ विलासु। सुख तेथें उल्लासु। हें असो तेथ प्रकाशु। सूर्य जेथें ॥३७॥ तैसें सकळ पुरुषार्थ। जेणें स्वामी का सनाथ। तो श्रीकृष्ण रावो जेथ। तेथ

लक्ष्मी ॥३८॥ आणि आपलेनि कांतेंसीं। ते जगदंबा जयापासीं। अणिमादिकी काय दासी। नव्हती तयातें ॥३९॥ कृष्ण विजयस्वरूप निजांगें। तो राहिला असे जेणें भागें। तैं जयो लागेंवेगें। तेथेंचि आहे ॥१६४०॥ विजयी नामें अर्जुन विख्यातु। विजयस्वरूप श्रीकृष्णनाथु। श्रियेसीं विजय निश्चितु। तेथेंचि असे ॥४१॥ तयाचिये देशींच्या झाडीं। कल्पतरूतें होडी। न जिणावें कां येवढी। मायबापे असतां ॥४२॥ ते पाषाणही आघवे। चिंतारत्नें कां नोहावे। तिये भूमिके कां न यावें। सुवर्णत्व ॥४३॥ तयाचिया गांवींचिया। नदी अमृतें वाहाविया। नवल कायि राया। विचारीं पां ॥४४॥ तयाचे बिसाट शब्द। सुखें म्हणों येती वेद। सदेह सच्चिदानंद। कां नोहावा तो ॥४५॥ पैं स्वर्गापवर्ग दोन्ही। इयें पदें तया अधीनीं। जे श्रीकृष्ण बाप जननी। कमळा जया ॥४६॥ म्हणौनि जिया वाहीं उभा। तो लक्ष्मियेचा वल्लभा। तेथ सर्वसिद्धी स्वयंभा। येर मी नेणें ॥४७॥ आणि समुद्राचा मेघु। उपयोगें तयाहूनि चांगु। तैसा पार्थीं आजि लागु। आहे तये ॥४८॥ कनकत्वदीक्षागुरू। लोहा परिसु होय किरू। परी जगा पोसिता व्यवहारू। तेंचि जाणें ॥४९॥ येथ गुरुत्वा येतसे उणें। ऐसें झणें कोण्ही म्हणे। वन्हि प्रकाश दीपपणें। प्रकाशी आपला ॥१६५०॥ तैसा देवाचिया शक्ती। पार्थु देवासीचि बहुती। परी माने इये स्तुती। गौरव असे ॥५१॥ आणि पुत्रें मी सर्व गुणीं। जिणावा हे बापा शिराणी। तरी ते शारंगपाणी। फळा आली ॥५२॥ किंबहुना ऐसा नृपा। पार्थु जालासे कृष्णकृपा। तो जयाकडे साक्षेपा। रीति आहे ॥५३॥ तोचि गा विजयासि ठावो। येथ तुज कोपा संदेहो। तेथ न ये तरी वावो। विजयोचि होय ॥५४॥ म्हणौनि जेथ श्री

तेथे श्रीमंतु। जेथ तो पंडूचा सुतु। तेथ विजय समस्तु। अभ्युदयो तेथ॥ ५५॥ जरी व्यासाचेनि साचें। थिरे मन तुमचें। तरी या बोलाचें। ध्रुवचि माना॥ ५६॥ जेथ तो श्रीवल्लभु। जेथ भक्तकदंबु। तेथ सुख आणि लाभु। मंगळाचा॥ ५७॥ या बोला आन होये। तरी व्यासाचा अंकु न वाहें। ऐसें गाजोनि बाहे। उभिली तेणें॥ ५८॥ एवं भारताचा आवांका। आणूनि श्लोका येका। संजयें कुरुनायका। दिधला हातीं॥ ५९॥ जैसा नेणों केवढा वन्ही। परी गुणाग्रीं ठेऊनी। आणिजे सूर्याची हानी। निस्तरावया॥ १६६०॥ तैसें शब्दब्रह्म अनंत। जाले सवालक्ष भारत। भारताचें शतें सात। सर्वस्व गीता॥ ६१॥ तयाही सातां शतांचा। इत्यर्थु हा श्लोक शेषींचा। व्यासशिष्य संजयाचा। पूर्णोद्धारु जो॥६२॥ येणें येकेंचि श्लोकें। राहे तेणें असकें। अविद्याजाताचें निकें। जिंतिलें होय॥६३॥ ऐसे श्लोक शतें सात। गीतेचीं पदें आंगें वाहत। पद्में म्हणो कीं परमामृत। गीताकाशींचें॥६४॥ कीं आत्मराजाचिये सभे। गीते वोडवले खांबे। मज श्लोक प्रतिभे। ऐसे येत॥६५॥ कीं गीता हे सप्तशती। मंत्रप्रतिपाद्य भगवती। मोहमहिषा मुक्ती। आनंदली असे॥६६॥ म्हणौनि मनें कायें वाचा। जो सेवक होईल इयेचा। तो स्वानंदसाम्राज्याचा। चक्रवर्ती करी॥६७॥ कीं अविद्यातिमिररोखें। श्लोक सूर्यातें पैजा जिंके। ऐसे प्रकाशिले गीतामिखें। रायें श्रीकृष्णें॥६८॥ कीं श्लोकाक्षरद्राक्षलता। मांडव जाली आहे गीता। संसारपथश्रांता। विसंवावया॥६९॥ कीं सभाग्यसंतीं भ्रमरीं। सेविली श्लोक कल्हारीं। श्रीकृष्णाख्यसरोवरीं। सासन्नली हे॥१६७०॥ कीं श्लोक नव्हती आन। गमे गीतेचें महिमान। वाखाणिते

बंदिजन। उदंड जैसे ॥७१॥ कीं श्लोकाचिया आवारा। सात शतें करूनि सुंदरा। सर्वांगम गीतापुरा। वसों आले॥७२॥ कीं निजकांता आत्मया। आवडी गीता मिळावया। श्लोक नव्हती बाह्या-। पसरु का जो॥७३॥ कीं गीताकमळींचे भृंग। कीं हे गीतासागरतरंग। कीं हरीचे तुरंग। गीतारथींचे॥७४॥ कीं श्लोक सर्वतीर्थसंघातु। आला श्रीगीतेगंगेआंतु। जे अर्जुन सिंहस्थु। जाला म्हणौनि॥७५॥ कीं नोहे हे श्लोकश्रेणी। अचिंत्यचित्तचिंतामणी। कीं निर्विकल्पां लावणी। कल्पतरूंची॥७६॥ ऐसिया शतें सात श्लोकां। परि आगळा येकयेका। आतां कोण वेगळिका। वानावा पां॥७७॥ दीपा आगिलु मागिलु। सूर्यु धाकुटा वडीलु। अमृतसिंधु खोलु। उथळु कायसा॥७८॥ तान्ही आणि पारठी। इया कामधेनूतें दिठी। सूनि जैसिया गोठी। कीजतीना॥७९॥ तैसे पहिले सरते। श्लोक न म्हणावे गीते। जुनीं नवीं पारिजातें। आहाती काई॥१६८०॥ आणि श्लोका पाडु नाहीं। हें कीर समर्थु काई। येथ वाच्य वाचकही। भागु न धरी॥८१॥ जे इये शास्त्रीं येकु। श्रीकृष्णाचि वाच्य वाचकु। हें प्रसिद्ध जाणे लोकु। भलताही॥८२॥ येथें अर्थे तेंचि पाठें। जोडे येवढेनि धटें। वाच्यवाचक येकवटें। साधितें शास्त्र॥८३॥ म्हणौनि मज कांहीं। समर्थनीं आतां विषय नाहीं। गीता जाणा हे वाङ्मयी। श्रीमूर्ति प्रभूची॥८४॥ शास्त्र वाच्यें अर्थें फळे। मग आपण मावळे। तैसें नव्हे हें सगळें। परब्रह्मचि॥८५॥ कैसा विश्वाचिया कृपा। करूनि महानंद सोपा। अर्जुनव्याजें रूपा। आणिला देवें॥८६॥ चकोराचेनि निमित्तें। तिन्ही भुवनें संतसें। निववविलीं कळावंतें। चंद्रें जेवीं॥८७॥ कां गौतमाचेनि मिषें। कळिकाळज्वरितोद्देषें। पाणिढाळु गिरीशें।

गंगेचा केला ॥८८॥ तैसें गीतेचें हें दुभतें। वत्स करूनि पार्थातें। दुभीनली जगापुरतें। श्रीकृष्णगाय ॥८९॥ येथें जीवें जरी नाहाल। तरी हेंचि कीर होआल। नातरी पाठमिषें तिंबाल। जीभचि जरी ॥१६९०॥ तरी लोह एके अंशें। झगटलिया परिसें। येरीकडे आपैसें। सुवर्ण होय ॥९१॥ तैसी पाठाची ते वाटी। श्लोकपाद लावा ना जंव वोठीं। तंव ब्रह्मतेची पुष्टी। येईल आंगा ॥९२॥ ना येणेंसीं मुख वांकडें। करूनि ठाकाल कानवडें। तरी कानींही घेतां पडे। तेचि लेख ॥९३॥ जे हे श्रवणें पाठें अर्थें। गीता नेदी मोक्षाआरौतें। जैसा समर्थ दाता कोणातें। नास्ति न म्हणे ॥९४॥ म्हणौनि जाणतया सवा। गीताचि येकी सेवा। काय कराल आघवां। शास्त्रीं येरीं ॥९५॥ आणि कृष्णार्जुनीं मोकळी। गोठी चावळिली जे निराळीं। ते श्रीव्यासें केली करतळीं। घेवों ये ऐसी ॥९६॥ बाळकातें वोरसें। माय जैं जेवऊं बैसे। तैं तया ठाकती तैसे। घांस करी ॥९७॥ कां अफाटा समीरणा। आपैतेपण शाहाणा। केलें जैसें विंजणा। निर्मूनियां ॥९८॥ तैसें शब्दे जें न लभे। तें घडूनियां अनुष्टुभें। स्त्रीशूद्रादि प्रतिभे। सामाविलें ॥९९॥ स्वातीचेनि पाणियें। न होती जरी मोतियें। तरी अंगीं सुंदराचियें। का शोभतीं तियें ॥१७००॥ नादु वाद्या न येतां। तरी कां गोचरु होता। फुलें न होतां घेपता। आमोदु केवीं ॥१॥ गोडी न होतीं पक्वान्नें। तरी कां फावती रसनें। दर्पणावीण नयनें। नयनु का दिसे ॥२॥ द्रष्टा श्रीगुरुमूर्ती। न रिगता दृश्यपंथीं। तरी काह्या उपास्ती। आकळता तो ॥३॥ तैसें वस्तु जें असंख्यात। तया संख्या शतें सात। न होती तरी कोणा येथ। फावों शकतें ॥४॥ मेघ सिंधूचें पाणी वाहे। तरी जग तयातेंचि पाहे। कां उमप तें नोहे।

ठाकतें कोण्हा ॥५॥ आणि वाचा जें न पवे। तें हे श्लोक न होते बरवे। तरी कानें मुखें फावे। ऐसें कां होतें ॥६॥ म्हणौनि श्रीव्यासाचा हा थोरु। विश्वासि जाला उपकारु। जे श्रीकृष्णउक्ती आकारु। ग्रंथाचा केला ॥७॥ आणि तोचि हा मी आतां। श्रीव्यासाचीं पदें पाहतां पाहतां। आणिला श्रवणपथा। म्हाठिया ॥८॥ व्यासादिकांचे उन्मेख। राहाटती जेथ साशंक। तेथ मीही रंक येक। वाचाळी करीं ॥९॥ परी गीता ईश्वरु भोळा। ले व्यासोक्तिकुसुममाळा। तरी माझिया दुर्वादळा। ना न म्हणे कीं ॥१७१०॥ आणि क्षीरसिंधूचिया तटा। पाणिया येती गजघटा। तेथ काय मुरकुटा। वारिजत तसे ॥११॥ पांख फुटे पाखिरूं। नुडे तरी नभींच थिरू। गगन आक्रमी सत्वरू। तो गरुडही तेथ ॥१२॥ राजहंसाचें चालणें। भूतळीं जालिया शाहाणें। आणिकें काय कोणें। चालावेंचिना ॥१३॥ जी आपुलेनि अवकाशें। अगाध जळ घेपे कलशें। चुळीं चूळपणा ऐसें। भरूनि न निघे ॥१४॥ दिवटीच्या आंगीं थोरी। तरी ते बहु तेज धरी। वाती आपुलिया परी। आणीच कीं ना ॥१५॥ जी समुद्राचेनि पैसें। समुद्रीं आकाश आभासे। थिलुरीं थिल्लराऐसें। बिंबेचि पैं ॥१६॥ तेवीं व्यासादिक महामती। वावरों येती इये ग्रंथीं। मा आम्ही ठाकों हे युक्ती। न मिळे कीर ॥१७॥ जिये सागरीं जळचरें। संचरती मंदराकारें। तेथ देखों शफरें येरें। पोहों लाहती ॥१८॥ अरुण आंगाजवळिके। म्हणोनि सूर्यातें देखे। मा भूतळींची न देखे। मुंगी काई ॥१९॥ यालागीं आम्हां प्राकृतां। देशिकारें बंधें गीता। म्हणणें हें अनुचिता। कारण नोहे ॥१७२०॥ आणि बापु पुढां जाये। ते घेत पाउलाची सोये। बाळ ये तरी न लाहे। पावों कायी ॥२१॥ तैसा व्यासांचा

मागोवा घेतु। भाष्यकारांतें वाट पुसतु। अयोग्यही मी न पवतु। कें जाईन ॥२२॥ आणि पृथ्वी जयाचिया क्षमा। नुबगे स्थावरजंगमा। जयाचेनि अमृतें चंद्रमा। निववी जग॥२३॥ जयाचें आंगिक अंशिकें। तेज लाहोनि अर्कें। आंधाराचें सावाइकें। लोटिजत आहे॥२४॥ समुद्रा जयाचें तोय। तोया जयाचें माधुर्य। माधुर्या सौंदर्य। जयाचेनि॥२५॥ पवना जयाचें बळ। आकाश जेणें पघळ। ज्ञान जेणें उज्वळ। चक्रवर्ती॥२६॥ वेद जेणें सुभाष। सुख जेणें सोल्लास। हें असो रूपस। विश्व जेणें॥२७॥ तो सर्वोपकारी समर्थु। सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु। राहाटत असे मजहीआंतु। रिघोनियां॥२८॥ आतां आयती गीता जगीं। मी सांगें मऱ्हाठिया भंगीं। येथ कें विस्मयालागीं। ठावो आहे॥२९॥ श्रीगुरूचेनि नांवें माती। डोंगरीं जयापासीं होती। तेणें कोळियें त्रिजगतीं। येकवद केली॥१७३०॥ चंदनें वेधलीं झाडें। जालीं चंदनाचेनि पाडें। वसिष्ठें मांडली कीं भांडे। भानूसीं शाटी॥३१॥ मा मी तव चित्ताथिला। आणि श्रीगुरु ऐसा दादुला। जो दिठीवेनि आपुला। बैसवी पदीं॥३२॥ आधींचि देखणी दिठी। वरी सूर्य पुरवी पाठी। तैं न दिसे ऐसी गोठी। केंही आहे॥३३॥ म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे। श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे॥३४॥ याकारणें मियां। श्रीगीतार्थ मऱ्हाठिया। केला लोकां यया। दिठीचा विषो॥३५॥ परी मऱ्हाठे बोल रंगें। कवळितां पैं गीतांगें। तैं गातयाचेनि पांगें। एकाव्यता नोहे॥३६॥ म्हणौनि गीता गावों म्हणे। तैं गाणिवें होती लेणें। ना मोकळे तरी उणें। गीताही आणित॥३७॥ सुंदर आंगीं लेणें न सूये। तैं तो मोकळा शृंगारु होये। ना लेइलें तरी आहे। तैसें कें उचित॥३८॥

कां मोतियांची जैसी जाती। सोनयाही मान देती। नातरी मानवती। अंगेंचि सडीं ॥३९॥ नाना गुंफिलीं कां मोकळीं। उणीं न होती परिमळीं। वसंतागमींचीं वाटोळीं। मोगरीं जैसीं ॥१७४०॥ तैसा गाणिवेनें मिरवी। गीतेवीणही रंगु दावी। तो लाभाचा प्रबंधु ओंवीं। केला मियां ॥४१॥ तेणें आबालसुबोधें। वोवीयेचेनि प्रबंधें। ब्रह्मरससुस्वादें। अक्षरें गुंथिलीं ॥४२॥ आतां चंदनाच्या तरुवरीं। परिमळालागीं फूलवरी। पारुखणें जियापरी। लागेना कीं ॥४३॥ तैसा प्रबंधु हा श्रवणीं। लागतखेंवो समाधि आणी। ऐकिलियाही वाखाणी। काय व्यसन न लवी ॥४४॥ पाठ करितां व्याजें। पांडित्यें येती वेषजे। तैं अमृतातें नेणिजे। फावलिया ॥४५॥ तैसेनि आइतेपणें। कवित्व जालें हें उपेणें। मनन निदिध्यास श्रवणें। जिंतिलें आतां ॥४६॥ हे स्वानंदभोगाची सेल। भलतयासीचि देईल। सर्वेंद्रियां पोषवील। श्रवणाकरवीं ॥४७॥ चंद्रातें आंगवणें। भोगूनि चकोर शहाणे। परी फावे जैसें चांदिणें। भलतया-ही ॥४८॥ तैसें अध्यात्मशास्त्रीं इये। अंतरंगचि अधिकारिये। परी लोकु वाक्चातुर्यें। होईल सुखिया ॥४९॥ ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें। गौरव आहे जी साचें। ग्रंथु नोहे हें कृपेचें। वैभव तये ॥१७५०॥ क्षीरसिंधुपरिसरीं। शक्तीच्या कर्णकुहरीं। नेणों कैं श्रीत्रिपुरारीं। सांगितलें जें ॥५१॥ तें क्षीरकल्लोळाआंतु। मकरोदरीं गुप्तु। होता तयाचा हातु। पैठें जालें ॥५२॥ तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं। भग्नावयवा चौरंगीं। भेटला कीं तो सर्वांगीं। संपूर्ण जाला ॥५३॥ मग समाधि अव्यत्यया। भोगावी वासना यया। ते मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं ॥५४॥ तेणें योगाब्जिनीसरोवरु। विषयविध्वंसैकवीरु। तिये पदीं का सर्वेश्वरु। अभिषेकिले ॥५५॥ मग तिहीं तें शांभव।

अद्वयानंदवैभव। संपादिलें सप्रभव। श्रीगहिनीनाथा ॥५६॥ तेणें कळि कंळितु भूतां। आला देखोनि निरुता। ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा। दिधली ऐसी ॥५७॥ ना आदिगुरु शंकरा-। लागोनि शिष्यपरंपरा। बोधाचा हा संसारा। जाला जो आमुतें ॥५८॥ तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां। सर्व प्रकारीं धांवा। करीं पां वेगीं ॥५९॥ आधींच तंव तो कृपाळु। वरी गुरुआज्ञेचा बोलु। जाला जैसा वर्षाकाळु। खवळणें मेघां ॥१७६०॥ मग आर्ताचेनि वोरसें। गीतार्थग्रंथनमिसें। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथु ॥६१॥ तेथ पुढा मी बापिया। मांडला आर्ती आपुलिया। कीं यासाठीं येवढिया। आणिलों यशा ॥६२॥ एवं गुरुक्रमें लाधलें। समाधिधन जें आपुलें। तें ग्रंथें बांधौनि दिधलें। गोसावी मज ॥६३॥ वांचूनि पढे ना वाची। ना सेवाही जाणे स्वामीची। ऐसिया मज ग्रंथाची। योग्यता कें असे ॥६४॥ परी साचचि गुरुनाथें। निमित्त करूनि मातें। प्रबंधव्याजें जगातें। रक्षिलें जाणा ॥६५॥ तऱ्ही पुरोहितगुणें। मी बोलिलों पुरें उणें। तें तुम्हीं माउलीपणें। उपसाहिजो जी ॥६६॥ शब्द कैसा घडिजे। प्रमेयीं कैसें पां चढिजे। अळंकारु म्हणिजे। काय तें नेणें ॥६७॥ सायिखडेयाचें बाहुलें। चालवित्या सूत्राचेनि चाले। तैसा मातें दावीत बोले। स्वामी तो माझा ॥६८॥ यालागीं मी गुणदोष-। विषीं क्षमाविना विशेष। जे मी संजात ग्रंथलों देख। आचार्यें कीं ॥६९॥ आणि तुम्हां संतांचिये सभे। जें उणिवंसी ठाके उभें। तें पूर्ण नोहे तैं लोभें। तुम्हांसीचि कोपें ॥१७७०॥ सिवतलियाही परिसें। लोहत्वाचिये अवदसे। न मूकिजे आयसें। तैं कोणा बोलु ॥७१॥ वोहळें हेंचि करावें। जे गंगेचें आंग ठाकावें। मगही गंगा जरी नोहावे। तैं तो काय करी ॥७२॥ म्हणौनि

भाग्ययोगें बहुवें। तुम्हां संतांचे मी पाये। पातलें आतां कें ल्राहे। उणें जगीं ॥७३ ॥ अहो जी माझेनि स्वामी। मज संत जोडुनि तुम्हीं। दिधलेति ते सर्वकामीं। परिपूर्ण जालें ॥७४॥ पाहा पां मातें तुम्हां सांगडें। माहेर तेणें सुरवाडें। ग्रंथाचें आळियाडें। सिद्धी गेलें ॥७५ ॥ जी कनकाचें निखळ। वोतूं येईल भूमंडळ। चिंतारत्नीं कुळाचळ। निर्मूं येती ॥७६ ॥ सातांही हो सागरातें। सोपें भरितां अमृतें। दुवाड नोहे तारांतें। चंद्र करितां ॥७७॥ कल्पतरूचे आराम। लावितां नाहीं विषम। परी गीतार्थाचें वर्म। निवडूं न ये॥७८॥ तो मी येकु सर्वमुका। बोलेनि म्हाठिया भाखा। करीं डोळेवरी लेकां। घेवों ये ऐसें जें॥७९॥ हा ग्रंथसागरु येव्हढा। उतरोनि पैलेंकडा। कीर्तिविजयाचा धेंडा। नाचे जो का ॥१७८०॥ गीतार्थाचा आवारु। कळशेंसीं महामेरु। रचूनि माजीं श्रीगुरु-। लिंग जें पूजी॥८१॥ गीता निष्कपट माय। चुकोनि तान्हें हिंडे जें वाय। ते मायपूता भेटी होय। हा धर्म तुमचा ॥८२॥ तुम्हां सज्जनांचें केलें। आकळुनी जी मी बोलें। ज्ञानदेव म्हणे थेंकुलें। तैसें नोहे॥८३॥ काय बहु बोलों सकळां। मेळविलें जन्मफळा। ग्रंथसिद्धीचा सोहळा। दाविला जो हा॥८४॥ मियां जैसजैसिया आशा। केला तुमचा भरंवसा। ते पुरवूनि जी बहुवसा। आणिलें सुखा॥८५॥ मजलागीं ग्रंथाची स्वामी। दुजी सृष्टी जे हे केली तुम्हीं। तें पाहोनि हांसों आम्ही। विश्वामित्रातेंही॥८६॥ जे असोनि त्रिशंकुदोषें। धातयाही आणावें वोसें। तें नासतें कीजे कीं ऐसें। निर्मावें नाहीं॥८७॥ शंभू उपमन्यूचेनि मोहें। क्षीरसागरूही केला आहे। येथ तोही उपमे नोहे। जे विषगर्भ कीं॥८८॥ अंधकारु निशाचरां। गिळितां सूर्यें चराचरां। धांवा केला तरी खरा। ताउनी कीं तो॥८९॥ तातलियाही

जगाकारणें। चंद्रें वेंचिलें चांदणें। तया सदोखा केवीं म्हणे। सारखें हें॥१७९०॥ म्हणौनि तुम्हीं मज संतीं। ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं। उपयोग केला तो पुढती। निरुपम जी॥९१॥ किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें। येथ माझें जी उरलें। पाईकपण॥९२॥ आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें॥९३॥ जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें॥९४॥ दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥९५॥ वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळीं। भेटो तयां भूतां॥९६॥ चलां कल्पतरूंचे आरव। चेतनाचिंतामणींचे गांव। बोलते जे अर्णव। पीयूषाचे॥९७॥ चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु॥९८॥ किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं। भजिजो आदिपुरुखीं। अखंडित॥९९॥ आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें। दृष्टादृष्टविजयें। होआवें जी॥१८००॥ येथ म्हणे श्रीविश्वेशरावो। हा होईल दानपसावो। येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला॥१॥ ऐसें युगीं परी कळीं। आणि महाराष्ट्रमंडळीं। श्रीगोदावरीच्या कूळीं। दक्षिणलिंगी॥२॥ त्रिभुवनैकपवित्र। अनादि पंचक्रोशक्षेत्र। जेथ जगाचें जीवसूत्र। श्रीमहालया असे॥३॥ तेथ यदुवंशविलासु। जो सकळकळानिवासु। न्यायातें पोषी क्षितीशु। श्रीरामचंद्र॥४॥ तेथ महेशान्वयसंभूतें। श्रीनिवृत्तिनाथसुतें। केलें ज्ञानदेवें गीते। देशीकार लेणें॥५॥ एवं भारताच्या गांवीं। भीष्मनाम प्रसिद्ध पर्वीं। श्रीकृष्णार्जुनीं बरवी। गोठी जे केली॥६॥ जें उपनिषदांचें सार। सर्व शास्त्रांचें माहेर। परमहंसीं सरोवर। सेविजे जें॥७॥ तिये गीतेचा कलशु। संपूर्ण हा अष्टादशु। म्हणे निवृत्तिदासु। ज्ञानदेवो॥८॥

पुढती पुढती पुढती। इया ग्रंथपुण्यसंपत्ती। सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजे ॥९॥ शके बाराशतें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें। सच्चिदानंदबाबा आदरें। लेखकु जाहला ॥१८१०॥

*इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां*

*अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥*

*॥ श्लोक ७८, ओंव्या १८१० ॥*

## श्रीएकनाथमहाराजांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथ संशोधन केल्यानंतर ज्ञानेश्वरीसंबंधानें केलेल्या ओंव्या.

श्रीशके पंधराशें साहोत्तरीं। तारणनामसंवत्सरीं। एकाजनार्दनें अत्यादरीं। गीताज्ञानेश्वरीप्रति शुद्ध केली ॥१॥ ग्रंथ पूर्वींच अतिशुद्ध। परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध। तो शोधूनियां एवंविध। प्रतिशुद्ध सिद्ध। ज्ञानेश्वरी ॥२॥ नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका। जयाची गीतेची वाचितां टीका। ज्ञान होय लोकां। अतिभाविकां ग्रंथार्थियां ॥३॥ बहुकाळपर्वणी गोमटी। भाद्रपदमास कपिलाषष्ठी। प्रतिष्ठानीं गोदातटीं। लेखनकामाठी संपूर्ण जाहली ॥४॥ ज्ञानेश्वरीपाठीं। जो ओंवी करील मऱ्हाटी। तेणे अमृताचे ताटीं। जाण नरोटी ठेविली ॥ ५ ॥

॥ श्रीसच्चिदानंदार्पणमस्तु ॥

**( ॥ समाप्तोऽयं ग्रंथः ॥ )**

# श्री स्वामी ज्ञानानन्दशास्त्रीविरचित
# ज्ञानेश्वरीची आरती

आरती माऊली ज्ञानेश्वरीची। देवता जी आहे मराठी भाषेची।
जय देवी जय देवी जय ज्ञानेश्वरी। श्रवणे पठणे मूढ जन तारी॥ धृ०॥
कृष्णाने अर्जुना उपदेश केला। शोक मोह त्याचा सारा नष्ट झाला।
देववाणी जेव्हां कळेना सर्वाला। ज्ञानदेवें तुज आणिले उदयाला॥ १॥
देवाचे मनोगत जाणोनी स्पष्ट। जगाच्या कल्याणा करुनी प्रगट।
मराठी भाषेत कैवल्याची वाट। तुजमाजीं सहज दाविली नीट॥ २॥
श्रुति व स्मृतींचा घेऊनी आधार। ऋषि मुनिंचाही करुनी आदर।
निज विचारांचा करुनी विस्तार। गुरुदेवापाशी मागितला वर॥ ३॥
तुझिया ज्ञानाचा घेऊनी अनुभव। साधुसंतांनी तुझा केला गौरव।
सर्वांनी तुजकडें घेतली धाव। सुखी करिशी तारुनी जड जीव॥ ४॥
जेथे श्रीमोहिनी राजसे सुंदरी। प्रवरेच्या तीरीं नेवासा नगरी।
ज्ञानदेव तेथे जें सांगे गीतेवरी। सच्चिदानंदें तुज लिहिले आदरी॥ ५॥
आरती विना नाहीं शांती मनाला। काया वाचा मनें ओवाळूं तुजला।
मान दे माऊली विनवणीला। ज्ञानानंद तुझा देई सर्वाला॥ ६॥

॥ हरिः ॐ तत्सत्॥

# श्रीमद्भगवद्गीतेची आरती

जय भगवद्गीते, जय भगवद्गीते।
हरि-हिय-कमल-विहारिणि सुन्दर सुपुनीते॥ जय०
कर्म-सुमर्म-प्रकाशिनि कामासक्तिहरा।
तत्त्वज्ञान-विकाशिनि विद्या ब्रह्म परा॥ जय०
निश्चल-भक्ति-विधायिनि निर्मल मलहारी।
शरण-रहस्य-प्रदायिनि सब विधि सुखकारी॥ जय०
राग-द्वेष-विदारिणि कारिणि मोद सदा।
भव-भय-हारिणि तारिणि परमानन्दप्रदा॥ जय०
आसुर-भाव-विनाशिनि नाशिनि तम-रजनी।
दैवी सद्गुणदायिनि हरि-रसिका सजनी॥ जय०
समता, त्याग सिखावनि, हरि-मुखकी बानी।
सकल शास्त्रकी स्वामिनि, श्रुतियोंकी रानी॥ जय०
दया-सुधा बरसावनि मातु! कृपा कीजै।
हरिपद-प्रेम दान कर अपनो कर लीजै॥ जय०

॥ हरिः ॐ तत्सत्॥

श्रीज्ञानेश्वर महाराजविरचित विश्वशांति प्रार्थना.

# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें॥ १३॥
जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मीं रती वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें॥ १४॥
दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥ १५॥
वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळीं। भेटतु भूतां॥ १६॥
चलां कल्पतरूंचे आरव। चेतनाचिंतामणीचे गांव।
बोलते जे अर्णव। पीयूषाचे॥ १७॥
चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु॥ १८॥
किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित॥ १९॥
आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें।
दृष्टादृष्टविजयें। होआवें जी॥ १८००॥
येथ म्हणे विश्वेशरावो। हा होईल दानपसावो।
येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला॥ १८०१॥